महाराष्ट्र मंडळ शिकागो

२०२३

MAHARASHTRA MANDAL CHICAGO

रचना

भाद्रपद शके १९४५

सप्टेंबर २०२३



महाराष्ट्र मंडळ शिकागो

VYAYAM and Icon Shakti Invite Your Participation

Come One, Come All with Family & Friends

Upcoming Events

May 14 & 21 Sundays

Yoga Poster Contest

For kids & adults. Win Prizes $50 / $35 / $25, No Entry Fee

June 2, 9, 16, 23, 30 Fridays

Free Sunrise Yoga in the Park

Fridays in June at Peterson Pool Park in Prairie View, IL.

June 18 Sunday

Yoga Speech Contest

For kids & adults. Win Prizes $50 / $35 / $25, No Entry Fee

June 24 Saturday

International Day of Yoga - IDY

Free Community Practice in Park and Wellness Walk

Info & Sign-up

vyayam.com

vidya@vyayam.com 847-537-4710 (landline)

अनुक्रमणिका

अध्यक्षीय	7
संपादकीय	9
आपल्यापेक्षा कुणीही बरं	21
नवाथेची बॅच	25
कणा	32
महाभारताचा लेखनिक - गणपती	42
आठवणी	44
International World Sanatan Dharma Conference 2023 - Varanasi	46
Krishnamurti Paddhati (K.P.) Astrology – An Advanced Stellar System	49
मोठे बाबा	52
My Ganapati Bappa and I	55
	56
मन-अवकाश	58
धुसर वाट	58
ओठांमधली गाणी	59
हरिनाम	59
झिजविला देह	60
क्षणस्थ	61
Sketch by Anjali More	62
शब्दकोडे	63
Falooda	66
कटलेट्स - कोणत्याही भाज्यांचे - शॅलो फ्राय ३	67

Cabbage Kofta Curry 68

Rice Fara 70

महाराष्ट्र मंडळ शिकागोचा पाच किलोमीटर धावणे वा चालणे स्पर्धा उपक्रम- एक ऐतिहासिक घटना 72

महाराष्ट्र मंडळ शिकागो-पिकनिक 75

MMC Master Chef Cooking Competition 78

MMC Nrityangan 80

मंडळाच्या ज्येष्ठ नागरिकांचे स्नेहसंमेलन 81

MMC मंगळागौर 83

'एका लग्नाची पुढची गोष्ट' - अनुभव 84

Sketch by Anjali More 85

शब्दकोडे- उत्तर 86

निखळलेले तारे 88

कार्यक्रम 90

Maharashtra Mandal Chicago Inc.
(Year of Establishment: 1969)
The first Maharashtra Mandal in United States of America, serving the community as non-profit organization

Website:
https://www.mahamandalchicago.org

Email Address for correspondence:
president@mahamandalchicago.org
karyakarini@mahamandalchicago.org

मुखपृष्ठ: वेदश्री नाईक

मुद्रित शोधन:
श्रद्धा भट
समीर कुलकर्णी

मांडणी आणि संकलन सहाय्य:
शिप्रा अथणीकर
श्रद्धा भट

महाराष्ट्र मंडळ शिकागो (MMC) बद्दल काही उल्लेखनीय नोंदी:
It is the first Maharashtra Mandal in the United States of America, serving local community as a non-profit organization, since 1969. It is the proud founder of (BMM) Bruhan Maharashtra Mandal, North America (http://www.bmmonline.org)
It is also initiator of BMM Newsletter – BMM Vrutta (https://bmmonline.org/vrutta-

साहित्य / मजकूर पाठविण्यासाठी संपर्क: rachana@mahamandalchicago.org

साहित्य / मजकूर पाठविण्यासाठी सूचना:

साहित्य लिहिताना मराठी फॉन्ट (उदा. मंगल - Mangal) आणि आकार १० असावा.
लिखाणात क्रमांक वापरल्यास ते मराठीत लिहावेत (उदा. १..२५ इ.)
अखेरीस आपले संपूर्ण नाव नमूद करावे.
आपले साहित्य 'मायक्रोसॉफ्ट वर्ड' किंवा 'गूगल डॉक' मध्ये लिहून पाठवावे.
साहित्य वरील ईमेल वरतीच पाठवावे.
ईमेल पाठवताना साहित्य अटॅचमेंट स्वरूपात पाठवणे.
सोबत आपला फोटो पाठवावा.

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते॥

अध्यक्षीय

। मराठा तितुका मेळवावा ।

आम्ही मराठी, हीच आमची Unity!
MMC ची एक Team आणि एक Community!

नमस्कार मंडळी!

सर्वप्रथम महाराष्ट्र मंडळाच्या २०२३ च्या कार्यकारिणीच्या वतीने तुम्हा सर्वांना गणेशोत्सवाच्या आणि नवरात्रीच्या हार्दिक शुभेच्छा देतो. बाप्पा तुम्हाला सुख-समृद्धीचं, समाधानाचं आणि आरोग्यदायी जीवन देवो. या वर्षात यापुढेही आम्ही भरपूर कार्यक्रम घेउन येत आहोत ह्याचा अंदाज तुम्हाला आला असेलच.

संक्रांत आणि गुढीपाडव्याचे दर्जेदार कार्यक्रम आणि त्याबरोबरच्या सुग्रास भोजनानंतर आपण आत्ताच गणेशोत्सवपण साजरा केला. It was another magnificent event, another Double धमाका!! २४ सप्टेंबरला सुप्रसिद्ध कलाकार **श्री. संकर्षण कऱ्हाडे** यांचे दोन अंकी नाटक '**नियम व अटी लागू**' श्रोत्यांच्या मनात घर करुन गेलं. ह्याचबरोबर आम्ही सारे गवय्येच्या गायकांनी, Y.O.U.T.H टीमच्या मुलामुलींनी आणि ढीपाडी ढीपांगच्या नृत्यांगनांनी आपले बहारदार कार्यक्रम साजरे करुन सगळ्यांची मने जिंकली. सर्व रसिक प्रेक्षकांच्या आशीर्वादाने आणि आपल्या धडाडीच्या कार्यकर्त्यांच्या सहकार्याने हा वैविध्यपूर्ण कार्यक्रम यशस्वी झाला. ह्याचबरोबर दरवर्षीप्रमाणे परंपरा टीमने यावेळीही गणरायाची मूर्तीस्थापना, पूजा आणि प्रसादाचे आयोजन केले होते. ह्यावेळी मंडळाच्या 'ढोल ताशा लेझीम झांज झेंडा' पथकाने जबरदस्त मिरवणूक काढून सर्व भक्तांना मंत्रमुग्ध केले. तर 'चायटाउन अंगत पंगत' टीमने मोदकाबरोबर सुग्रास मराठी जेवणाचा बेत आखला होता. तब्बल ६५० लोकांना अवघ्या दोन तासांमध्ये जेवण वाढून सगळ्या प्रेक्षकांना तृप्त केले. हा होता पहिला धमाका!

दुसरा धमाका आपण बघितला ३० सप्टेंबरला. आपली जोडगोळी मन्या (**श्री. प्रशांत दामले**) आणि मनी (**कविता लाड मेढेकर**) आले होते त्यांचे दोन अंकी नाटक '**एका लग्नाची पुढची गोष्ट - २.०**' घेउन. 'चायटाउन अंगत पंगत' टीमने ह्यावेळी देखील जिलेबीबरोबर सुग्रास जेवण देउन ६२५ रसिकांचे पोटदेखील तृप्त केले. ह्या Double धमाक्याचे अजून एक आकर्षण होते ते म्हणजे सजवलेले Photo booths. 'चमक धमक' टीमने सुंदर Photo booths बनवले होते. रंगमंच, नेपथ्य आणि Facility या टीम्सनी सर्वोत्तम कामगिरी बजावत श्रोत्यांबरोबर पाहुण्या कलाकारांची देखील शाब्बासकी मिळवली.

आता उर्वरित वर्षासाठी शिवराज्याभिषेकाचा ३५०वा वाढदिवस, दांडिया/गर्बा, दिवाळी आणि Indoor Box Cricket हे सर्व कार्यक्रम नक्कीच होतील.

या नव्या कार्यक्रमात शिकागो परिसरातल्या सर्व सदस्यांना (members) भाग घेता यावा म्हणून महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी अधिक विस्तारित केली आहे. कार्यकारी समितीमध्ये उत्तरेच्या आणि दक्षिणेच्या सदस्यांचा कटाक्षाने अंतर्भाव केला आहे. उत्तर आणि दक्षिण अशा दोन्ही बाजूंच्या उपनगरांमधले कार्यकारी समितीचे सदस्य, मंडळाचे विविध कट्टे आणि उपक्रम यांचे संपर्काधिकारी (Liaison) म्हणून काम करतील याची विशेष दक्षता आम्ही घेतली आहे. यामुळे दक्षिणेबरोबर शिकागो शहराच्या उत्तरेकडील उपनगरातील सदस्यांना कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेणं सोपं होईल. महाराष्ट्र मंडळाच्या आजवरच्या इतिहासात कधीही न झालेले अनेक नवे उपक्रम (साहित्य कट्टा, अध्यात्मपीठ, आम्ही सारे गवय्ये, इतिहास मंच, भ्रमणगाथा, आरोग्यधाम, अर्थविचार) आम्ही या वर्षीही चालू ठेवले आहेतच, आणि त्यांच्या यशापासून प्रेरणा घेऊन आम्ही योगसाधना, Fitness Club, शिकागोची बाग हे नवीन उपक्रमही चालू केले आहेत. अधिक माहितीसाठी कार्यकारिणीला नक्की संपर्क करा.

शिकागोजवळ स्थायिक असलेल्या सर्व मराठी आणि महाराष्ट्रीय लोकांना एकत्र आणायचा आमचा प्रयत्न राहील. महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमांचं यश हे तुमचं म्हणजे मंडळाच्या सदस्यांचं यश आहे. मंडळाच्या कार्यक्रमांना अधिकाधिक यश प्राप्त व्हावं यासाठी तुमच्या नवीन कल्पनांचं आम्ही स्वागतच करू. महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी तर प्रयत्न करतच राहील पण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तुमचा सहभाग आणि आशीर्वाद आवश्यक आहे. ह्या वर्षी आत्तापर्यंत तुम्ही सर्वांनी सर्व उपक्रमांमध्ये आणि कार्यक्रमांना मोठ्या संख्येने सहभागी होऊन महाराष्ट्र मंडळाला पाठिंबा दिलात. महाराष्ट्र मंडळावरचा तुमचा स्नेह, लोभ या वर्षीही रहावा, किंबहुना अधिक वृद्धिंगत व्हावा अशी अपेक्षा करतो आणि माझं मनोगत इथेच पूर्ण करतो.

धन्यवाद!

लवकरच प्रत्यक्ष भेट होईल या आशेसह,

आपलाच

प्रसाद अथणीकर

संपादकीय

नमस्कार मंडळी,

गणपती बाप्पा म्हणजे ज्ञानाची, विद्येची देवता.

तुम्हां सर्वांची, स्वप्नं पुरी होवोत आणि ती पूर्ण करण्यासाठी लागणारी शक्ती, बुद्धी आणि संपत्ती सर्वांना मिळो. हीच प्रार्थना आम्ही आपणां सर्वांसाठी आपल्या महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या बाप्पाकडे केली आणि आम्हांला खात्री आहे, तो तुम्हां सर्वांची स्वप्नं साकार करेलच.

आणि याच उत्सवात, आपल्या 'रचना'चा गणपती विशेषांक प्रसिद्ध करताना आम्हां सर्वांना मनापासून आनंद होत आहे.

कथा, कविता, लेख, स्वानुभव, कोडी आणि चित्रं अशा समृद्ध आणि माहितीपूर्ण साहित्याने सजलेला हा अंक तुम्हां सर्वांनाच आवडेल अशी आम्हांला आशा आहे. याव्यतिरिक्त सुद्धा तुम्हांला काही सूचना, अभिप्राय द्यायचा असेल, तर नक्की आम्हांला कळवा.

आपली स्वप्नं, इच्छा, फक्त 'ध्येय' असल्याने आणि "लक्ष केंद्रित कृती' केल्यानेच पूर्ण होऊ शकतात, सर्वांसाठी एका दिवसात चोवीस तासच असल्याने, कधी कधी, मन घट्ट करून, काही गोष्टींना नकार द्यावा लागतो कारण तरच स्वप्नपूर्तीसाठी काम करता येतं. मला लिखाणाची एक गंमत जाणवते ती म्हणजे, ते हवेत विरून जात नाही. शब्द कागदावर किंवा word मध्ये आले, की त्यांचं महत्त्व तर वाढतच पण जेव्हा ते 'रचना'च्या माध्यमातून कायमस्वरूपी रहातं आणि खूप लोकांपर्यंत पोचतं, त्याचं समाधान नक्कीच जास्त असतं.

आपला पुढचा 'रचना' अंक हा दिवाळी विशेषांक असेल आणि त्यासाठी आम्ही तुमच्या साहित्याची नक्की वाट पाहू.

आपली नम्र,

रत्नांगी निलेश मालपेकर

MMC Executive Committee

President: Prasad Athanikar *president@mahamandalchicago.org*

Chicagoland resident for over 16 years. Vice President in 2021 and 2022. Volunteering for Maharashtra/Marathi Mandals in USA over the past several years while leading Sports, Picnic, Maza News, IT, Itihas Manch, Facility and Lezim teams in MMC. Also, led Overall Facility Team during MMC's Golden Jubilee Celebrations in 2019. Looking forward to lead the energetic 2023 team and bringing together the Marathi community on MMC platform. Play Cricket, Badminton, Volleyball and many other sports.

Vice President: Sameer Bongale *karyakarini@mahamandalchicago.org*

I am Sameer Nivrutti Bongale, Chicagoland resident for 8+ years. Actively involved and volunteered for Maharashtra Mandal Chicago. I love music, passion for designing and to work for our community. As a Board of Director in 2022, I managed Maza news, MMC Dhol Tasha Zanj Pathak, and MMC Shala liaison. Looking forward to have a great fun filled journey with MMC 2023.

Vice President: Ratnangi Malpekar *karyakarini@mahamandalchicago.org*

I am Ratnangi Nilesh Malpekar, volunteer of MMC for last 8 years in various teams, like Decoration, Food, GJC-HR, Dhol-Tasha. I have been writing in Rachana and was Board of Director in 2020. I love working for our Maharashtrian community and our MMC.

Treasurer: Rajesh Hatkar *treasurer@mahamandalchicago.org*

Chicagoland resident for around 30 years. Has participated in various MMC programs since 1995, contributed in BMM magazine as well as recently in Rachana. Enjoys different genres of Indian music and a die-hard cricket fan. Looking forward to the fun filled 2023 with MMC team.

Secretary: Sheetal Deshpande *karyakarini@mahamandalchicago.org*

Chicagoland resident for 9 years. Has participated in various programs over last few years such as Y.O.U.T.H. Stage, Dhol Tasha. Marathi Teacher at MMC's Chicago Vidya Mandir. I love art and architecture. Excited to lead Y.O.U.T.H. ream. Looking forward to work with 2023 team and a memorable year ahead.



Board of Director: Madhav Gogawale *karyakarini@mahamandalchicago.org*

माधव गोगावले गेली २८ वर्षे शिकागो परिसरात रहिवासी आहेत. अमेरिकेत ते ४२ वर्षे आहेत. महाराष्ट्र मंडळात ते १९८१ पासून सक्रिय आहेत. १९८७ पासुन चिनमया मिशन मध्ये ते सेवक, बालविहार शिक्षक व अध्ययन गटात सक्रिय आहेत. महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२३ चे ते कार्यकारिनीचे सदस्य व Board of Directors. ह्य वर्षा ते अध्यात्म पीठ, साहित्य कट्टा, जेष्ठ नागरिक सेवादल, आणी इतिहास मंच या समुहात कार्यरत राहुन आपल्या सेवेसाठी वेग-वेगळे ऊपक्रम करण्याचा त्यांचा मानस आहे

Board of Director: Nilesh Joshi *karyakarini@mahamandalchicago.org*

Naperville-Aurora resident for 9+ years. Active MMC volunteer since 2015. Worked as a teacher in Chicago Marathi shala for 2 years. Participated and volunteered in numerous MMC activities. Key tasha player in MMC dhol-tasha team. Admin of MMC karaoke group. Music maniac, enjoys singing and conducting karaoke events. Looking forward to a fun-filled MMC 2023.

Board of Director: Manoj Joshi *karyakarini@mahamandalchicago.org*

I live in Chicago area since 2015. Active member of Maharashtra Mandal Chicago since 2016. I have been helping the stage and props team from quite some time. I have prepared props for the various MMC events. This year, I am very excited to lead the stage and props team to contribute to MMC 2023.

Board of Director: Vishal Navalkar *karyakarini@mahamandalchicago.org*

I have been living in Chicago since 2017. I have been associated with MMC through Marathi Shala volunteering activities from 2017. Helped itihaas Manch and volunteered in couple of programs in 2021 and 2022. I have been assigned to group of MMC Yoga and organization of various athletic activities and picnic. Looking forward to a fitness year of 2023!

Board of Director: Pradnya Joglekar *karyakarini@mahamandalchicago.org*

Bolingbrook resident for 22 years. Active MMC volunteer since 2010. Participated and volunteered in numerous MMC activities. MMC Lezim, Dance team, Food, GJC Registration. Looking forward to a fun-filled MMC 2023.

Board of Director: Deepa Sawant *karyakarini@mahamandalchicago.org*

Resident of the Chicagoland area for 25 years. Involved in MMC dance team for 6+ years. MMC Board of Director in 2021. In 2021 lead Parampara team and Graduation team. Re-elected in 2022. In 2022 lead Parampara, Graduation, and Flyer team. In 2023 leading Graduation and decoration team. Excited and looking forward to lead the Decoration team and Graduation team to bring the community together.
Looking forward to a fun filled MMC 2023.

Board of Director: Chetan Rege *karyakarini@mahamandalchicago.org*

Chicago resident for 16+ years. Bibliophile. Volunteered for various MMC activities - Secretary of 2022 MMC EC, Admin of Itihas Manch group since 2021; Admin of Adhyatma Peeth in 2021; Rachana Editor in 2019; Teacher at Chicago Marathi Vidyamandir. Directed, acted in and coordinated several plays, activities, and performances. Aiming to preserve our incredible Indian heritage and build a solid MMC community.

Board of Director: Sujit Kulkarni *karyakarini@mahamandalchicago.org*

I am living in Chicagoland from last 12 years. I am affiliated with MMC as member from last 6 plus years. I have written articles in Rachana, helped Rachana Editor for editing Rachana Articles, Involved in MMC Volunteering activities and last year worked on MMC Constitution Review Committee. Very excited to be part of this year's Executive Committee.

Board of Director: Ketki Deshpande *karyakarini@mahamandalchicago.org*

I have been residing in the Chicago area for almost 20 years. I have participated in and have choreographed various dances for MMC events since 2015. I am a trained Indian classical dancer and have been learning/ practicing Bharatnatyam since the age of 10. I am a Software Engineering professional and enjoy traveling. At home, I take care of four boys including our 2 years old golden lab.

Board of Director: Shweta Harankhedkar Shenoy *karyakarini@mahamandalchicago.org*

Chicagoland resident since 2020. Okstate alumna. My educational background is Environmental Science and Botany. I have actively volunteered for Maharashtra Mandal Chicago in Dance Team, Stage, Dhol Tasha, Bhramangatha, Parampara and various other events. I love to travel, dance and read. Together, let's make MMC scale new heights in 2023.

MMC Trustees

समीर सावंत

रामदास थत्ते

धनंजय काळे

उल्का नगरकर

राहुल थत्ते

MMC Investment Advisors

सुहास गोसावी

मिलिंद जोगळेकर

योगेश गायकर

बृहन्महाराष्ट्र मंडळ

अभिजित रायरीकर

(MMC's BMM Representative)

नितीन जोशी

(BMM Trustee)

MMC's शिकागो मराठी विद्यामंदिर

Coordinator

वैदेही देशपांडे

Trustee

लक्ष्मीनारायण महिसेकर

Treasurer

प्रसाद खरे

Naperville PoC

अभिषेक सोहनी

Schaumburg PoC

सुवर्णा गणपुले

Buffalo Grove PoC

दिप्ती मिश्रीकोटकर

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२३

MMC 2023 Ambassadors

Aahana Bhide
Abhijit Rayarikar
Advait Deshpande
Ahana Shedge
Alka Gadgil
Amit Kulkarni
Amol Shripal
Amruta Gupte
Amruta Joshi
Anagha Vasta
Aniket Sawant
Aniruddha Damle
Ankita Gawade
Anup Deshmukh
Anuradha Kelkar
Anurag Misraraj
Aparna Khaladkar
Archana Bhargave
Archana Bhide
Archana Shripal
Aryan Joglekar
Ashish Gundawar
Ashish Nagarkar
Ashtotra Rao
Ashwini Deshmukh
Ashwini Kunte
Ashwini Nade
Avani Deshpande
Bhagyashree Gupte
Bhaskar Shedge
Chaitanya Agashe
Chetan Rege
Chitra Shirke
Deepa Sawant
Deepak Bakane
Deepali Lande
Dhananjay Joshi
Dhanesh Gupte
Dipti Govardhan
Gauri Kulkarni
Hemalata Bakane
Hemant Hinge
Jayjeet Govardhan
Jyoti Gogawale
Kashmira Magar
Kavita Kulkarni
Ketki Deshpande
Latika Chaudhary
Leena Vaidya
Madhav Gogawale
Madhuri Parhad
Malhar Bhide
Mandar Joglekar
Mandar Pandit
Manasi Thatte
Manisha Pandit
Manoj Joshi
Milind Sali
Mitesh Kambli
Mugdha Hinge
Nameeta Vedak
Narasimha Kamath
Navin Shenoy
Neha Dalal
Nikhil Jadhav
Nilesh Joshi
Nilesh Malpekar
Nimesh Shirke
Nita Deshmukh
Nitin Nade
Pallavi Betsur
Prachi Pohare
Pradnya Joglekar
Prajakta Joshi
Pranil Vaidya
Pranjali Doshi
Prasad Athanikar
Prasad Naik
Priya Patankar
Priya Pathak
Priyesh Deshpande
Purva Kulkarni
Rahul Kolekar
Rahul Thatte
Rahul Visal
Rajani Patwari
Rajas Visal
Rajesh Hatkar
Ranjit Saudagar

Rashmi Chafekar
Rashmi Vadvalkar
Ratnangi Malpekar
Rekha Deodhar
Rohan Gandhi
Rohit Dalvi
Rupesh Pohare
Sakshi Mauskar
Sameer Betsur
Sameer Bongale
Sameer Khaladkar
Sameer Kulkarni
Sana Kulkarni
Santosh Taware
Sara Bongale
Shalaka Rege
Shalaka Sawant
Sheetal Deshpande
Shilpa Deshpande
Shipra Athanikar
Shraddha Bhat
Shruti Kulkarni
Shweta Harankhedkar
Shweta Kulkarni
Smita Bhole Patil
Snehal Vadvalkar
Soham Agashe
Soumil Pandit
Subhash Mantri
Sudarshan Iyengar
Sujata Mahajan
Sujit Kulkarni
Swapna Walunj
Tanvi Khare
Tejaswini Joshi
Trupti Taware
Ulka Nagarkar
Urmila Damle
Utsav Kale
Vaishali Belsare
Vaishnavi Navalkar
Varsha Visal
Vedashree Naik
Vinod Parhad
Vishal Navalkar
Vishnu Mahadeshwar
Vivek Walunj
Vrushali Khekale Kulkarni
Yatin Kulkarni
Yogendra Rao
Yogesh Kinikar
Yogita Landge
Yukta Rao

SPONSORS WALL

We wish to thank following people who have purchased Sponsorship Packages for 2023.

वैयक्तिक रुपेरी पान

Sheetal Jagtap
Manik Nambiar
Smita G

वैयक्तिक स्वर्णकमळ

Komal Swadas

दांपत्य रुपेरी पान

Swati and Mahesh Mohnalkar
Deepa and Yogesh Ajmire
Deepa and Narasimha Kamath
Sneha and Dilip Kulkarni
Ratnangi and Nilesh Malpekar
Sonali and Vishal Dahalkar
Pradnya and Yogendra Gupte

दांपत्य स्वर्णकमळ

Aparna and Sameer Khaladkar

दांपत्य हिरेकुडी

Anita and Hiren Kelekar
Aparna and Prasad Walawalkar

कुटुंब रुपेरी पान

Shilpa and Nilesh Joshi
Mrunal and Swanand Paranjape

कुटुंब स्वर्णकमळ

Shipra and Prasad Athanikar
Shweta and Sandeep Chavan

आजीव

Kamini and Vasant Shelke
Tejasi and Pranshu Adavadkar

आजीव Upgrade रुपेरी पान

Shamkant Sheth
Aditi and Prasad Adavadkar

आजीव Upgrade स्वर्णकमळ

Ashwini and Vivek Modak
Mohini and Chandrashekhar Joshi

आजीव Upgrade हिरेकुडी

Vaishali and Sanjay Wagh
Neela and Ashok Lele
Ulka and Ashish Nagarkar
Sangeeta and Rajesh Hatkar

देणगीदार

Laxmikant Mahishekar
Jayjeet Govardhan
Vidya and Sanjay Nahar
Madhuri Parhad
Vaishali Belsare
Shree Datt Raut
Neela and Ashok Lele

रचना

मुखपृष्ठ, मांडणी आणि संकलन सहाय्य

वेदश्री नाईक



शिप्रा अथणीकर

श्रद्धा भट

मुद्रित शोधन (मराठी)

श्रद्धा भट

मुद्रित शोधन (इंग्रजी)

समीर कुलकर्णी

संपादक

रत्नांगी निलेश मालपेकर

कथा

आपल्यापेक्षा कुणीही बरं

'आपल्यापेक्षा कुणीही बरं' हे क्षिप्राचं मनातल्या मनात उच्चारण्याचं वाक्य होतं. दिवसातून अनेकदा हे वाक्य तिच्या मनात उमटायचं. दर दिवशी प्रत्येक प्रसंगात ती स्वतःला तपासून पहायची, स्वतःला नापास करायची आणि मग हे वाक्य. आपल्या आजूबाजूला आपल्यासारख्या व्यक्ती तिला दिसत नव्हत्या. प्रत्येक जणाने जगण्याची एक रीत शोधून काढलेली दिसत होती. त्याप्रमाणे तो वागायचा, ज्यांनी हे शोधून काढलेलं नव्हतं त्यांना 'आसपासची चार माणसं जशी वागतील तसं आपण वागावं' एवढं तरी माहीत होतं, जमत होतं. ज्यांनी रीत शोधून काढली त्यांच्यामुळे आणि त्यांचं पाहून वागणा-या लोकांमुळे समाज होता, वेडावाकडा का होईना अस्तित्वात होता. पण क्षिप्रासारखे लोक - ज्यांना सतत प्रश्नच पडतात, एकाचं उत्तर शोधेपर्यंत दुसरा प्रश्न पडतो, उत्तरं सापडतच नाहीत. ऐन मोक्याच्या वेळी निर्णयक्षमता नसते, त्यांच्यावर कसं विसंबून रहावं समाजानं?

त्या दिवशी रात्री अकरा वाजता पश्याच्या घरून फोन आला, "पश्या सीरीयस. आयसीयूत ॲडमिट. पोचा लवकर" क्षिप्रासकट सगळे धावत पळत पोचले. बरेच जण आधीच जमले होते. पश्या म्हणजे क्षिप्राच्या भावाचा मित्र. अगदी घरगुती, जवळचे संबंध. सगळे तिथं दाटीवाटीने उभे राहिले. रात्रीची वेळ असल्याने बहुतेक पुरुषांची विमानं आकाशात होती. पश्याला हार्ट ॲटॅक आला होता. तो कसा आला, काय झालं हे कुजबुजत्या आवाजात सांगणं चालू होतं. खुद्द पश्याही हार्ट ॲटॅकपूर्वी 'विमाना'तच होता. पश्याचे एक नातेवाईक सर्व परिस्थितीची सूत्रं हातात घेऊन लोकांना सूचना देत होते. त्यांचे विमान आकाशात जरा जास्त उंचावर गेले होते. त्यामुळे ते दोन - तीनदा हॉस्पिटलच्या पाय-यांवरून पडता पडता वाचले.

पश्या जेमतेम पंचेचाळिशीचा होता. देहयष्टी किरकोळ. अधूनमधून दारू पिणं सोडल्यास व्यसनं नव्हती. दुखणी नव्हती. अशा माणसाला हार्ट ॲटॅक का यावा? त्याला उलट्या वगैरे झाल्या तरी खुद्द तोही दवाखान्यात यायला तयार नव्हता, "काय, ॲसिडीडी झालीय. होऊन जाईल बरं" वगैरे म्हणत. रेवा, त्याची मेव्हणी, तिथं होती. तिने 'ते काही नाही, आत्ताच्या आत्ता चला दवाखान्यात' करत त्याला पाठवून दिलं. हॉस्पिटलमध्ये त्याला व्हीलचेअरवरून जावं लागलं आणि तिथल्या टेबलवर झोपवताच तो श्वासासाठी तडफडू लागला, हातपाय झाडू लागला. लगेच ऑक्सिजन वगैरे सगळी व्यवस्था झाली. बीपी अतिशय खाली आलं होतं. पल्स लागत नव्हते. अशा परिस्थितीत थोड्या वेळाने डॉ. नी त्याची परिस्थिती 'क्रिटिकल' असल्याचं जाहीर केलं.

नंतर पुढच्या एक तासातच पश्या सगळ्यांतून मुक्त झाला. हॉस्पिटलच्या बाहेरच्या व्हरांड्यात क्षिप्रा उभी होती. पश्याचा भाऊ वरून "गेला, गेला" असं खूण करत आला. आणि मटकन खाली बसला. क्षिप्रा बधिर होऊन त्याच्याकडे पाहत राहिली. लोक भराभर गोळा झाले. पश्याच्या बायको - पोरांकडे धावले. पुढची सारी रात्र, कुठून कुठून जमा होणारी माणसं, खरं खोटं डोळ्यातलं पाणी, हुंदके, उसासे, तीच तीच वाक्यं... किती बाई चांगला होता. सर्वांशी हसून खेळून, कध्धी कुणाशी वाकडं नाही, बायकोपोरांचंही किती कौतुक... किती कष्ट करायचा, पुन्हा कायम हसतमुख, हां कधी रडका चेहरा नाही, नशिबाला दोष देणं नाही... रात्रभर हे चालूच.

पश्या खरोखरच असा होता. क्षिप्राच्या डोक्यात प्रश्न सुरू झाले. सगळ्यांत नैसर्गिक गोष्ट इतकी अनैसर्गिक का? कधी न कधी मरण्याचं वास्तव घेऊनच आपण जन्माला येतो तर मरण इतकं अनैसर्गिक का होऊन जातं? आपण का दुःख करतो, का रडतो? समाजातला प्रत्येक माणूस 'मरण' ही अनैसर्गिक गोष्ट

का मानतो? 'अरे, काल तर मला भेटला होता' अरे, काल भेटणारा आज मरू शकतो. थोड्या वेळापूर्वी बोलणारा एकदम गप्प होऊ शकतो. प्रत्येकाने आपल्या स्वतःसाठी किमान ऐंशी वर्षाचा लाईफस्पॅन धरलेला असतो. त्यात पहिली वर्षं शिक्षणाची, नंतर नोकरी आणि संसार, उतारवयात विरूपता येत येत कमकुवत होत जाणारं शरीर आणि मग मरण. म्हणून आपल्या भाषांमध्ये 'भविष्यकाळ' आहे आणि उद्या, परवा असे शब्दही आहेत.

त्यानंतरचे दोन - तीन दिवस मरणाचा विचार करण्यात गेले. गाडीतनं जाताना असं वाटायचं, आता एखादा ट्रक मागून ठोकेल. आपल्या शरीरावर ट्रकच्या चाकांचा दाब ती कल्पनेने अनुभवायची. कधी तिला आपण पाण्यात बुडतो आहोत, घुसमटून श्वास घेता येत नाहीये असं वाटायचं. मरण अनुभवण्याची प्रक्रिया सोसत नव्हती. 'मरण असणं' हे अनैसर्गिक वाटत नव्हतं. पुन्हा पुन्हा तिच्या मनात नेहमीचा विचार आपल्यापेक्षा कुणीही बरं. खळखळून रडतात आणि मरण आहे हे विसरून कामाला लागतात.

अशात पश्याचा 'दहावा' आला. सगळे घाटावर जमले. पश्याचा मुलगा पिंड हातात घेऊन घाटावर ठेवायला चालला. दुसरेही एक गृहस्थ वारले होते. त्यांचाही मुलगा पिंड घेऊन चालला होता.

पश्याच्या मुलाने पिंड ठेवताच कावळ्यांनी झडप घातली. खाऊन, पाणी - बिणी पिऊन कावळे समोरच्या झाडावर जाऊन बसले. दुस-या गृहस्थाचा पिंड ठेवताच कावळ्यांची बॅच नुसतीच जागच्या जागी काव काव करत बसली. किती किती वेळ गेला तरी मंडळी पिंडाजवळ यायला तयार नाहीत.

ही बातमी झपाझप पसरली. प्रत्येकजण दुस-याच्या कानाशी लागला. तिथल्या तिथं कुजबुजत चर्चा सुरू.

"पाहिलंत ना? किती वेळची वाट पहातायत ते लोक, कावळा शिवायला तयार नाही."

"हो ना. आणि याच्या पिंडाला काय पटकन् शिवला !"

"मला तर बाई टेन्शनच होतं. अकाली गेला. इच्छा असतीलच की कितीतरी. पण सगळ्यातून मुक्त झाला बिचारा."

"विश्वास होता त्याचा सगळ्यांवर. आपण नसलो तरी लोक काळजी घेतील आपल्या बायको - पोरांची."

"काय पण आश्चर्य आहे न?"

"अहो, हे तर काहीच नाही. काही काही वेळा दिवसभर बसलं तरी कावळे दाद देत नाहीत. आमच्या वडिलांचा पिंड तर ठेवू सुद्धा दिला नाही कावळ्यांनी. हातातनंच उचलून नेला."

क्षिप्रा वेड्यासारखी हे पाहत होती. तिला काही अर्थच लागत नव्हता या प्रकाराचा. हे तर्काला, बुद्धीला कुठेच पटत नव्हतं. पण कावळ्यांच्या वागण्याचा अर्थ काय घ्यायचा तेही समजत नव्हतं. आपल्यापेक्षा सगळं खरं मानणारे कुणीही खरे. तिला वाटलं. इतरांचं वागणं न पटूनही स्वतःबद्दल संशय वाटायचा.

मुलाच्या शाळेत ती जेव्हा जायची तेव्हा इतर बायका भेटायच्या.

"आमच्या वरुणला..."

"मी न् माझ्या शांभवीला..."

"आमचा केतन ना..."

"पौरवीला सुद्धा..."

असे त्यांच्यात संवाद सुरू असायचे या सर्व 'शहाणी मुलं' होत्या. म्हणजे त्या कर्तृत्ववान आया होत्या. त्या, मुलांना त्यांच्या महत्त्वाकांक्षेप्रमाणे अभ्यास करायला लावायच्या. पहिल्या नंबरसाठी मुलांपेक्षा

आयांमध्ये स्पर्धा असायची. त्याशिवाय त्यांची मुलं स्वीमिंग, तबला, गाणं, चित्रकला, गणित ऑलिम्पियाड, ट्रेकिंग असं काही ना काही करायचीच. लीलया एका क्लासहून दुस-या क्लासला जायची. या आयांची प्रचंड शिस्त त्या मुलांच्या वागण्यातनं झिरपत राहायची.

क्षिप्रा यातलं काहीच करत नव्हती. तिनं मुलाला स्वतःचा स्वतः अभ्यास करावा, वाचन करावं हे शिकवलं होतं. ती मन लावून स्वतःच्या अभ्यासात गढलेली असायची. अभ्यासासाठी कुणी कुणाच्या मागे का लागावं? मुलांच्या मागे का लागावं? गोष्ट सगळं समजून घेण्याचीच असते. प्रश्नोत्तरं कशाला पाठ करावी लागतात? हे तिला कळायचं नाही. पण प्रश्न एवढाच नव्हता. आपण मुलाला महत्त्वाकांक्षेमागे धावायला लावत नाही, हे चूक की बरोबर हे या बायकांना पाहिलं की, तिला ठरवता यायचं नाही. वर्गात तुमचा मुलगा सगळ्यांना हसवतो हे तिला खूप गंभीर चेहरा करून सांगितलं गेलं तर "हे इतकं सीरियस आहे का?" हा प्रश्न तर पडायचाच पण' हे इतकं सीरियस नाही. तुम्ही उगाच मुलाच्या मनात अपराधभाव निर्माण करू नका.' असंही ठाम होता यायचं नाही तिला. तिच्या संस्कारात जातिभेद कधीच आलेला नव्हता. तिच्या घरात अनेक जातिधर्मांची माणसं कायम यायची. साहजिकच मुलांच्याही संस्कारात जातिभेद झिरपला नाही. किंबहुना जात आणि धर्म या काय भानगडी असतात आणि त्या आपल्या जगण्याला समाजात एक वेगळं पोत आणतात हे ही मुलांना समाजात मिसळायला लागल्यावर कळलं. आपल्याकडे विशेष हेटाळणीच्या नजरेने पाहिलं जातं, आपला उल्लेख कुत्सितपणे होतो अशी मुलांची तक्रार यायला लागल्यावर क्षिप्रा भानावर आली. आपण मुलांना वास्तवाचं भान दिलं नाही, याची जाणीव तिला झाली. मुलांच्या सरळसोट, उघड प्रश्नांना तिच्या तत्त्वप्रणालीत उत्तरं नव्हती. प्रश्न उपस्थित करण्याचा बुद्धीचा खुलेपणा तिनेच मुलांना दिला होता पण वास्तव आणि तत्त्वप्रणाली यांची सांगड तिला घालता येत नव्हती. प्रश्नांना अंगावर घेण्याचा आणि मुसुंडी मारून उत्तरं शोधण्याचा धीटपणा तिच्यात नव्हता.

अशा वेळेस तिला वाटायचं, आपली वाढ ही अशी अर्धवट कशी झाली?

पश्याच्या जाण्यानंतर एक दिवस रेवा भेटली. वाईट मनःस्थितीत होती. पश्या जाण्यापूर्वी ती घरात होती. त्याच्याशी बोलली होती. रेवा सायकॉलॉजीची विद्यार्थिनी होती. ती क्षिप्राला म्हणाली, "मी खलास झालेय. त्या दिवशी त्याला उलट्या होत होत्या. मी बाहेरच्या हॉलमध्ये बसले होते. त्याला काय होतंय पहायला आत गेले. त्यानं एकदम माझ्याकडे पाहिलं." हे सांगताना रेवाचं अंग शहारलं. ती पुढे म्हणाली, "क्षिप्रा, मी त्याची ती नजर विसरूच शकत नाही. तसं त्याने माझ्याकडे कधीही पाहिलं नव्हतं. एका क्षणात मला कळलं, हा जगणार नाही. क्षिप्रा, ज्या घरात मरण, म्हणजे कुणी गेलेलं असतं ना, तिथे एक वेगळाच वास येतो. तसा वास मला घरात आला. आईशप्पथ, मी खोटं सांगत नाहीये. मी एवढा आग्रह का धरला त्याला दवाखान्यात नेण्याचा माहीताय?. पश्या सांगत होता मला, मी चाललो. कुत्री रडत होती त्या दिवशी. त्या दिवसापासून झोपच नाही मला. घरात एकटं बसायची भीती वाटते."

क्षिप्राला वाटलं, ही सायकॉलॉजीची विद्यार्थिनी. हिची ही अवस्था. ही तर पॅरासायकॉलीजत घुसतेय. मरणाचा सेन्स येणं, वाईट घटनेची चाहूल लागणं, याबद्दल किती लोक बोलतात. बरेचसे खोटारडे असतील पण रेवाला तर ती लहानपणापासून ओळखत होती. ती मनापासून बोलत होती.

खरंच कधी माणूस एवढा तरल होत असेल का? स्वतःचं शरीर सोडून त्याचं मन दुसरीकडे कुठे पोचू शकत असेल का?

रेवा म्हणाली, "माझ्या ओळखीतली एक दहावीतली मुलगी वारली. त्यांच्या दारात एक जांभळाचं

झाड होतं. खूप बहर यायचा त्याला. ती गेली त्या वर्षी झाडाने फळच धरलं नाही.''

शोक निसर्गात पसरतो? प्राणी, वनस्पती नक्कीच माणसापेक्षा जास्त संवेदनशील, तरल असतात. ते निसर्गातून काय जाणतात? कशाची चाहूल लागते त्यांना? कुठली अघटितपणाची लिपी त्यांना वाचता येते?

पुन्हा क्षिप्रा पहिल्या प्रश्नापाशी आली. प्राणी, वनस्पती आणि तरल संवेदनशीलतेचे लोक अघटिताची पावलं ओळखतात. पण एवढ्या सगळ्यांना अघटित वाटणारा मृत्यू अघटित असतो का? असला तर का असतो?

तिने रेवाची समजूत घातली. ''असं काही नसतं ग. उगाच घाबरू नकोस.'' रेवाची समजूत पटेना. तेव्हा तिने तिच्याच भाषेत तिला समजावलं, ''अग, पण तो तर मुक्त झाला. कावळा शिवला न पिंडाला.''

रेवाला हे चटकन् पटलं.

क्षिप्रा मनातल्या मनात दुखावली. ज्ञानाची परंपरा किती कुजक्या मुळांची आहे. फोफावतच नाहीये. आणि भ्रमांची, अंधश्रद्धांची मुळं किती पक्की. आपण या कुजक्या परंपरेचीच निर्मिती. आपल्या शिक्षणात ज्ञानाशी संबंधित काहीच नाही. नुसती माहितीची धोकंपट्टी. ज्ञानाला ज्ञानाचे फुटणारे धुमारे नाहीत.

'आपल्यापेक्षा कुणीही बरं' हा नेहमीचाच विचार तिच्या मनात आला. निर्णय असा आपण एवढाच घेऊ शकतो की आपल्यापेक्षा कुणीही बरं. यापलीकडे आपल्याला जाता येत नाही. शिवाय वेगवेगळ्या परिस्थितीत सारखी आपल्याला काहीतरी भूमिका घ्यावी लागते. भूमिकेशिवायचं जगणं इथं कठीण. इतिहासाने अर्धवट सोडून दिलेले विषय आपली पाठ पुरवतात. भूतकाळाचा नकोनकोसा सांधा जोडून वर्तमानाचा निर्णय द्यावा लागतो. वास्तवाशी फारकत घेऊनही चालत नाही. व्यवहाराच्या पटरीवरून गाडी घसरलेली चालत नाही. नुस्ते तत्त्वप्रणाली जपत जगणारे लोक कितीसे असतील. मेजॉरिटी तर तत्त्व - बित्त्व काही न मानता व्यवहार आणि भावना, श्रद्धा, आपल्या धारणांवर जगणारी आहे. आपण ना आयडिऑलॉजीज जपणारे ना मेजॉरिटीत मिसळणारे. आपल्यापेक्षा कुणीही बरं !

डॉ सुजाता महाजन

'शहरातला प्रत्येक' या कथासंग्रहातून

नवाथेची बॅच

पुणे नावाच्या एका आटपाट नगरातील विद्याश्रम हायस्कूल नावाच्या एका शाळेतील माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याची ही कहाणी. या शाळेत, दरवर्षी १० वी होऊन ४० वर्षं पूर्ण झाल्यावर त्या त्या बॅचचे विद्यार्थी एकत्र येण्याची एक प्रथा होती. या गेट-टुगेदर किंवा मेळाव्याचे आयोजन सर्व विद्यार्थीच करत असंत. अशाच एका तयारीची बैठक.

"माधव, अरे तू म्यूट आहेस. अनम्यूट कर," रवी.

"सॉरी, लक्षातच आलं नाही," माधव.

"आता लेटेस्ट फिगर सांगा. मागच्या आठवड्यात किती सापडले?", राहुल.

"लेटेस्ट फिगर १३२. मागच्या आठवड्यात २३ जण ॲड झाले. 'अ' तले ८, 'ब' तले ५ आणि 'क' तले १०," माधव

"शाम्या, पैसे किती जणांचे आले," रवी

"१०३ लोकांचे. एकूण जमा १ लाख १० हजार," श्याम

मकरंद लगेच म्हणाला, "ओ शामराव हिशोब चुकतोय. १ लाख ३ हजार व्हायला हवे."

"मक्या, अरे बरोबर हिशोबच सांगतोय. आपल्या काही परदेशी मित्रांची कृपा. त्यांनी फॉरेन एक्स्चेंजमध्ये पाठवलेले पैसे इथे पोचेपर्यंत वाढत गेले," श्याम

"स्कॉलरशिपचे पैसे किती जणांनी दिले?" रवी

"२८ जणांनी, म्हणजे तो आकडा आहे २ लाख ८० हजार," श्याम

"रवी, मुख्याध्यापकांना भेटलास का? आपल्या बॅचचा हजेरी पट मिळाला का?" माधव

"अर्धवटच मिळाला. फक्त ''अ तुकडीचा पूर्ण मिळाला. 'ब' चा मिळत नाही. 'क' ची २ पानंच मिळाली म्हणजे ५१ पैकी ३२ नावंच सापडतात," रवी, "फोटो पाठवतो आहे."

"माध्या, आता तुमच्या तुकडीचा सगळा पट तुम्हीच तयार करा रे. आणि मक्या तुमच्या तुकडीतली १९ नावं शोधा," श्याम.

"आमच्या 'अ' तुकडीतले ५२ पैकी ४१ सापडले सुद्धा. इतरांचा शोध सुरु आहे," राहुल

"नवाथे सापडला का रे?" मकरंद

"हो आणि नाहीही," राहुल

"म्हणजे?" श्याम

"म्हणजे असं की तो तळेगावला एका वृद्धाश्रमात रहातो असं समजलं पण तिथला फोन लागत नाही. 'प्लीज, चेक द नं यू हॅव डायल्ड' असं उत्तर मिळतंय," राहुल

"मला पत्ता दे. माझा भाऊ वडगावला कामाला जातो. त्याला सांगतो शोधायला," रवी.

"OK," राहुल

"नवाथे म्हणजे आपल्या बॅचला नवाथेची बॅच म्हणायचे तोच ना रे?" चंद्रकांत

"हो, तोच. आपल्या वेळेला १० वीला बोर्डात पहिला आला होता आणि ५ विषयातही पहिला आला होता. त्याचं रेकॉर्ड अजूनही अबाधित आहे," नंदन.

---- x ----

नंदन जेवायला बसणार तेवढ्यात रवीचा फोन वाजला.

"रव्या, लेका जरा शांतपणे जेवू दे की."

"नंद्या खूप सिरीयस बातमी आहे."

"काय झालं?"

"नवाथेचा शोध लागला."

"फँटॅस्टिक. कुठे भेटला? काय करतो?"

"तळेगावला, आधार वृद्धाश्रमात," रवी गंभीरपणे उत्तरला.

"वृद्धाश्रमात?" नंद्याला धक्का बसला.

"हो ना रे. लग्न नाही केलं. बहीण सांभाळायची ती करोनात गेली. तिच्या मुलांनी मग मामाची व्यवस्था वृद्धाश्रमात केली."

"so sad!"

"पुढे ऐक ... नवाथेच्या पाठीच्या मणक्याला कँसर झालाय."

"कासस्स्य?"

"हो. आणि उपचाराला पैसे नाहीयेत."

"रव्या, थांब आता. मला रडवू नकोस आणखी. मी जातो तळेगावला."

"नंद्या, जरा थांब. मी आत्ता तळेगावलाच आहे आणि तिथूनच तुला फोन केला आहे. त्याला घेऊनच मी पुण्याला येतोय. डॉ गांधींना तातडीनं दाखवलं पाहिजे."

"अश्विन कसाय? त्याला कळलंय?"

"हो. खूप हादरून गेलाय. माझ्या खांद्यावर डोकं ठेऊन ढसाढसा रडला. माझेही डोळे पाणावले रे! त्याला एकट्याला तळेगावला ठेऊन पाय निघतच नव्हता."

"मी डॉ गांधींशी बोलून अपॉइंटमेंट घेतो. तू त्याला घेऊन निघ आणि माझ्या घरीच ये."

---- x ----

२ दिवसाच्या सूचनेवर मिटिंगला ९२ जण उपस्थित होते. टेक्नॉलॉजीचा हा एक फायदा होता की एकत्र जमणं आता काही फार मोठी समस्या उरली नव्हती.

"मित्रांनो, आज तातडीने मिटिंग बोलावली आहे याचं कारण की काही अपरिहार्य कारणामुळे नंद्याला आणि मला सुकाणू समितीत काम करता येणार नाही, मेळाव्यालाही यायला जमणार नाहीये. त्यामुळे सुकाणू समितीची पुनर्रचना करावी लागणार आहे. तेच ठरवण्यासाठी सगळ्यांना जरा त्रास द्यावा लागतोय," रवीने प्रस्तावना केली.

झालंय काय ते सर्वांना सांगण्यासाठी चंद्रकांतनं पुढाकार घेतला, "तुम्हाला कळवल्याप्रमाणे आपल्या बॅचमधला अश्विन नवाथे एका भयंकर व्याधीशी झगडतो आहे आणि आपले काही मित्र त्याला मदत करत आहेत. सुकाणू समितीत आम्ही याची चर्चा केली आणि पुढे काय करावं या विषयी सर्वांच्या संमतीने ठरवण्याचा निर्णय घ्यावा असं ठरलं. एक मत असं आहे की आपण मेळावा स्थगित करून आधी मित्राला सांभाळूयात तर दुसरं मत असं आहे की मित्राला मदत करावीच पण मेळावा ठरल्याप्रमाणेच घ्यावा. तर बोला तुम्हाला काय वाटतं."

गणेश दाभाडेने सुरवात केली, "पण झालंय काय नवाथेला?"

रवी सांगू लागला, "मित्रांनो अश्विन नवाथे सध्या एका वृद्धाश्रमात एकाकी जीवन जगतो आहे. PhD करत असताना त्याच्या आई वडिलांचे एका अपघातात दु:खद निधन झाले. त्याचा धक्का बसून त्याने लग्न न करण्याचा निर्णय घेतला. PhD झाल्यावर त्याने जंगलाची वाट पकडली आणि एका आश्रमशाळेत शिकवायला सुरुवात केली. दहा एक वर्षापूर्वी त्याला पॅरॅलिसिस झाला. तेंव्हापासून त्याची मोठी बहीण त्याला सांभाळत होती. पण तिचेही करोनाच्या काळात निधन झाले. तिची दोन्ही मुलं अमेरिकेत स्थायिक झाली आहेत. त्यांनी मग या अनाथ मामाला वृद्धाश्रमात ठेवलं. त्याचा सगळा खर्च ती दोघं करतात. पण अश्विनला मागच्या वर्षी पाठीच्या मणक्याचा कँसर डिटेक्ट झाला. भाच्यांना त्याला अमेरिकेला नेणं

परवडत नाही त्यामुळे तो इथे एकाकी अवस्थेत होता. आपले मित्र शोधताना आम्हाला अश्विनचा पत्ता लागला. झालेल्या गोष्टीमुळे मीही खूप हादरून गेलो. मग मी आणि नंदननी त्याला नंदनच्या घरी आणलं. डॉ गांधींना दाखवलं. त्यांच्या मते या कँसरवर एक नवीन ट्रीटमेंट आता निघाली आहे पण ती खूप खर्चिक आहे. चार-साडेचार लाख रुपये खर्च येईल. तसंच ही ट्रीटमेंट सध्या फक्त गुरगावच्या मेडीपोलीसमध्ये उपलब्ध आहे. ६ महिन्याच्या अंतराने ही ट्रीटमेंट १-१ महिन्याची असेल. मी आणि नंदननी ठरवलं की आपण नवाथेची ही ट्रीटमेंट करायची. पण सुकाणू समितीला असं वाटतं की हे शिवधनुष्य आपल्या बॅचनी पेलावं. पण आत्ताची परिस्थिती लक्षात घेता आपल्या मेळाव्यावर त्याचा परिणाम होईल, त्याची मजाच निघून जाईल आणि त्यासाठी घेतलेले सर्व कष्ट वाया जातील. तेंव्हा काय करायचं ते ठरवा. निर्णय काहीही झाला तरी मी आणि नंदन, अश्विन बरोबरच रहाणार आहोत."

मीटमध्ये शांतता पसरली. त्याचा भंग सुरेश मालपाणीने केला, "मला वाटतं अश्विन हा आपल्या बॅचचा मुकुटमणी होता. किंबहुना आपली बॅच त्याच्या नावानेच ओळखली जाते. आपण सगळे 'नवाथेच्या बॅच'चे म्हणूनच ओळखले जायचो. त्यामुळे त्याच्याशिवाय गेट-टुगेदरची कल्पनाच करता येणार नाही. आपण आपले गेट-टुगेदर पुढे ढकलावे."

नंदननं आणखी इशारा दिला, "हे पहा, या ट्रीटमेंटला किती दिवस लागतील सांगता येत नाही. १ वर्ष तर नक्की लागेल, कदाचित २ वर्षही लागतील. त्यामुळे गेट-टुगेदर नक्की पुढे ढकलायचं का एखादे टोकन गेट-टुगेदर करावं त्याचा विचार करावा."

चंदन भुजबळ म्हणाला, "असं करू. आपलं गेट-टुगेदर १ वर्षासाठी पुढे ढकलू. १० वीला ४० वर्षं होण्याऐवजी ४१ वर्षं झाल्यावर गेट-टुगेदर करू. समजा तेंव्हाही अश्विन बरा झाला नाही तर टोकन गेट-टुगेदर करू."

या मध्यममार्गाला बहुतेकांनी अनुमोदन दिलं.

"पण बाहेर गावाहून, परदेशाहून येणाऱ्या लोकांच्या प्लॅनचं काय?" नंदन.

अमेरिकेहून किशोर चितळे बोलू लागला, "आम्ही ठरल्याप्रमाणे येणारच आणि जिथे अश्विन असेल तिथे गेट-टुगेदर करू. सेलेब्रेट करणं अजिबात महत्त्वाचं नाही. एकत्र भेटणं महत्त्वाचं आहे. आम्ही ठरल्याप्रमाणेच येऊ."

त्याबरोबर इतर बहि:स्थ लोकांनीही त्याची री ओढली.

बंगलोरहून हेमंत म्हणाला, "आणि मला वाटतं गेट-टुगेदर करता जेवढे काही पैसे जमले असतील ते अश्विनच्या ट्रीटममेंट साठी वापरूया. जर कुणाला ते योग्य वाटत नसेल तर त्याचे पैसे परत करा."

संपूर्ण मिटिंग आता अश्विनच्या आजारपणाने भारून गेली होती. गेट-टुगेदर रहीत करण्याची व्यवस्था मार्गी लावून मिटिंग संपली.

---- x ----

त्यानंतर पुढचे २ महिने खूपच व्यस्त गेले. डॉ. गांधीनी मेडीपोलीसशी संपर्क केला, केस नोंदवली. २ आठवड्याने अश्विनला तिथे नेण्याचे निश्चित झाले. नुकतेच जर्मनीहून परतलेले डॉ विश्वभूषण यांना ही केस दिली गेली. त्यांनी डॉ गांधींशी बोलून मधल्या काळात करायच्या टेस्ट्स आणि ट्रीटमेंटविषयी सूचना दिल्या.

अश्विन, नंदन, श्याम दिल्लीला गेले. त्यांना निरोप द्यायला बॅचचे २३ विद्यार्थी विमानतळापर्यंत बरोबर आले होते. या सगळ्याच कामात सर्वांनी जमेल तशी आणि मागून मागून मदत केली. बाबू शितोळेनं या सगळ्या प्रवासाची तिकीटं बुक केली, तो ट्रॅव्हल एजंट होता. एक पैशाचंही कमिशन त्यानं घेतलं नाही. केमिस्ट सुरेश गंधेनं सगळी औषधांची व्यवस्था केली. सिद्धार्थ मठकरीचा एक क्लायंट गुरगावला होता, त्याचे गेस्ट हाउस त्याने या लोकांच्या निवासासाठी बुक केलं, स्थानिक प्रवासासाठी गाडी उपलब्ध करून दिली. एक ना अनेक हात यासाठी पुढे आले होते.

महिन्याभरानंतर पहिली ट्रीटमेंट संपवून अश्विन परत आला. आता त्याच्या बोलण्या चालण्यात उत्साह होता. आल्यावर १ आठवडा डॉ गांधींच्या हॉस्पिटलमध्ये होता. डॉ गांधींच्या मताप्रमाणे ट्रीटमेंटचा प्रतिसाद खूपच चांगला होता. त्यांनी सर्व आवश्यक त्या टेस्ट्स संपवून २ दिवसात अश्विनला घरी म्हणजे नंदनकडे सोडले. आता नंदनला अमेरिकेला मुलाकडे जायचे होते तरी त्यानं अश्विन व्यवस्था आपल्याच घरी लावून दिली आणि देखरेख करायला रवी होता. सुहास वैद्यनं रोजच्या खाण्यापिण्याची व्यवस्था केली. मंदार पोळ रोज अश्विनला फिरायला घेऊन जायला यायचा. मोहन देशपांडे रोज अश्विनला काही न काही वाचून दाखवायला यायचा.

अशा रीतीने सर्व मित्रांनी अश्विनचा ताबा घेतला होता. पहाता पहाता ६ महिने गेले. पुन्हा मेडीपोलीसला जायची वेळ आली. डॉ गांधींनी पुन्हा तयारी सुरू केली. पुन्हा सर्व टेस्ट्सच्या चक्रातून अश्विनला जावं लागलं. ते सर्व रिपोर्ट्स मेडीपोलीसला पाठवण्यात आले. आणि आश्चर्य म्हणजे डॉ विश्वभूषण यांनी यापुढे ट्रीटमेंटला यावं लागणार नाही असं जाहीर केलं. अश्विनचा सर्वात अवघड धोका टळला होता. आता सर्व उपचार इथेच करणं सहज शक्य होतं. सर्व मित्रांचा आनंद गगनाला भिडला.

---- x ----

होता होता वर्ष गेलं आणि अश्विन खडखडीत बरा झाला. आणि बॅचमध्ये पुन्हा गेट-टुगेदरचे वारे वाहू लागले. पुन्हा मिटींग्स सुरु झाल्या.

मारुती गायकवाडनं सुरवात केली, "रामराम मित्रांनो. आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून अश्विन नवाथे खडखडीत बरा झाला. त्यानंतरच्या या पहिल्या मिटिंगमध्ये सर्वांचं स्वागत. रवी आणि नंदननी त्यासाठी खूप कष्ट घेतले. त्यांनी आता मेळाव्याची जबाबदारी दुसऱ्या कुणीतरी घ्यावी म्हणून विनंती केली आहे. मलाही असं वाटतं की त्यांना विश्रांती द्यायला पाहिजे. तेंव्हा तुमच्या सगळ्यांच्या आग्रहाखातर मी ही जबाबदारी घेण्याचे ठरवले आहे. तसेच रवी आणि नंदनच्या जागी सुरेंद्र मोहिते आणि निशिकांत ढवळे यांचा आपण समावेश केला आहे. रवी आणि नंदन यांच्यावर जबाबदारी नसली तरी त्यांनी सुकाणू समितीत रहावे अशी विनंती आहे."

नंदन, "मित्रांनो, मी आणि रवी मारूतीचे खूप खूप आभार मानतो आणि सुकाणू समितीचे सदस्य म्हणून रहाण्यास मान्यता देतो. तसेच अश्विनच्या आजारपणाच्या आधी आणि आजारपणातही सुकाणू समितीतील सर्वांनी आम्हा दोघांना जे सहकार्य केलं त्याबदल सर्वांचे मन:पूर्वक आभार. केवळ सुकाणू समितीच नाही तर आपल्या अनेकानेक विद्यार्थी मित्रांनी खूप मदत केली, मानसिक आधार दिला त्यामुळेच आपल्याला एवढी मजल मारता आली."

मारूती, "चला आता पुढच्या कार्यक्रमाचं ठरवूया. मी शाळेच्या मुख्याध्यापकांना भेटलो. तेंव्हा पुढच्या वेळच्या मेळाव्याचे आयोजन आपल्या नंतरची बॅच करत असल्याचं कळलं. मी त्या बॅचच्या मुलांशीही बोललो आणि अखेर हा माजी विद्यार्थी मेळावा एकाच दिवशी सकाळ आणि दुपारी घेण्याचं ठरलं आहे. आपल्या माजी शिक्षकांसाठीही ते जास्त सोयीस्कर आहे. त्यासाठी १३ जूनची तारीख निश्चित केली आहे. कल्पना अशी आहे की सकाळी नाश्त्यापासून जेवणापर्यंत आपल्या बॅचचा मेळावा होईल आणि जेवणानंतर नंतरच्या बॅचचा होईल. दोन्ही बॅचचं जेवण कॉमन असेल."

श्याम, "नेमके किती जणं येणार आहेत, त्याचा अंदाज जमवला पाहिजे."

"अमेरिकेतील १२ पैकी ७ जणं नक्की येणार नाहीयेत. तसंच पुण्याबाहेरच्या ४० पैकी १२ जणं येणार नाहीयेत. म्हणजे एकूण १९ जण येणार नाहीत," सुरेंद्रनं माहिती पुरवली.

मारूती, "म्हणजे आपल्याला १२० जणं येतील त्याची खात्री केली पाहिजे. दर १० मुलांचा १ गट करून त्यावर एकेक मॉनिटर ठेवला पाहिजे."

न राहवून रवी म्हणाला, “चांगली आयडिया आहे.”

मारूती म्हणाला, “चला एकंदरीत आपला मेळावा होणार. मला खूप उत्सुकता लागून राहिली आहे. आता नवीन काही विषय नसेल तर थांबूयात. आता पुढच्या शनिवारी भेटूयात. निशिकांतला काही जरुरी कामासाठी जायचंय. तेंव्हा मिटिंग संपली. इतर काही गप्पा मारायला हरकत नाही.”

निशिकांत ‘लेफ्ट’ झाला.

---- x ----

१३ जून उजाडला. १० वाजल्यापासून विद्यार्थी जमा होऊ लागले. आधी नोंदणी करून सर्वजण नाश्त्याला गेले. शाळेत पाउल टाकल्यापासूनच लोकांना काय बघू काय नको असं झालं होतं. फुटाफूटावर फोटो काढले जात होते. बरेच ओळखीचे लोक होते तसेच अनेकांची ओळखही पटत नव्हती. टक्कल, वाढलेली पोटं, दाढ्या, कॉंटॅक्ट लेन्सेस, केसांचे रंग अशा अनेक व्हेरीएबल्समुळे ओळखी पटत नव्हत्या. आणि पटल्यावर, “अरे! चम्प्या तू!!!”. “टोप्या, तू मात्र आहेस तस्सा आहेस!”. “गोंद्या आलाय का रे?” “मी तुला बाहेर ओळखलं नसतं, पांड्या!”. “महया, अरे हे दाढी बिडी काय प्रकरण आहे?” “देशपांडे सर गेल्याचं कळलं.” “मला शेखर बेंगलोरला भेटला होता.” “अरे! इथे पूर्वी भांडार होतं ना रे? आता प्रयोगशाळा झाली वाटतं.” “इथे TVची खोली होती, आता टीचर्स रूम.” अशा संवादात लोक मश्गुल होते. बरोबर साडेदहा वाजता घंटा झाली आणि सर्व विद्यार्थ्यांना वर्गात जायला सांगितले गेले. ‘अ’, ‘ब’ तुकड्यांचे वर्ग तसेच होते, तिथे आता ३ री/७ वी चे वर्ग होते. ‘क’ तुकडीच्या वर्गात आता ग्रंथालय केले गेले होते.

सर्व वर्ग भरल्यावर, राष्ट्रगीत झाले, प्रार्थना झाली. त्यानंतर दिवंगत विद्यार्थ्यांना श्रद्धांजली वाहिली गेली. मग हजेरी घेतली गेली. मग वर्गातल्या प्रत्येकाने आपली सध्याची लौकिक ओळख करून दिली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांची स्पेलिंगची परीक्षा घेण्यात आली. काही जणांचा वाढदिवस नुकताच होऊन गेला होता त्यांनी गोळ्या वाटल्या. मग सगळ्यांना मैदानावर जमायला सांगितले गेले. तिथे सर्वांची PT झाली. असं सगळं होत होत, साडेअकरा झाले. मग सगळ्यांना मुख्य सभागृहात जमायला सांगितलं गेलं.

व्यासपीठावर सध्याचे मुख्याध्यापक, काही जुने शिक्षक, सुकाणू समितीचा प्रमुख म्हणून मारूती आणि मुख्य आकर्षण म्हणून अश्विन नवाथे विराजमान होते. पार्श्वभूमीला ‘१९८३ ची बॅच उर्फ नवाथेची बॅच’ असा मजकूर असलेला फलक लावलेला होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मारूतीने केले, “माननीय व्यासपीठ आणि उपस्थित मित्रांनो, दरवर्षी ज्या बॅचला १० वी होऊन ४० वर्षं होतात त्यांचा एक माजी विद्यार्थी मेळावा शाळेत होत असतो. त्याचसाठी आपण जमलो आहोत फक्त फरक इतकाच की आमच्या बॅचला १० वी होऊन ४० ऐवजी ४१ वर्षं होताहेत. काही अडचणीमुळे आम्हाला वर्षभरापूर्वी हा कार्यक्रम आयोजित करता आला नाही त्याबद्दल आधीच दिलगिरी व्यक्त करतो. आमच्या पुढच्या बॅचनेही मनाचा मोठेपणा दाखवत या दिवशी आम्हाला हा कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी दिल्याबद्दल त्यांचे शतशः आभार. आम्हाला कल्पना आहे की शाळेनेही या कार्यक्रमासाठी सर्व तयारी पूर्ण केली होती पण तसं होऊ शकलं नाही. कारण आपल्या बहुतेकांना माहिती आहे त्यामुळे त्याची वाच्यता करत नाही. तसंच ती करायची नाही अशी सूचना मला दिली गेली आहे.

या कार्यक्रमाला गोडबोले सर, टाकळकर सर, कवीश्वर बाई आवर्जून उपस्थित राहिले त्यामुळे आम्हाला पुन्हा एकदा लहान झाल्यासारखं वाटलं. घरी आई वडील असताना जसं वाटतं ना तसंच काहीसं आज वाटतं आहे. आम्ही सगळे वयाने मोठे झालो आहोत आणि आपापल्या कामात गुंतलेलो आहोत. तरीही या शाळेने आम्हाला घडवण्यात जो मोलाचा वाटा उचलला आहे त्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही.

हे सर्व आठवत असतानाच आज आमचे अनेक गुरुजन आणि विद्यार्थी मित्र या जगात उपस्थित नाहीत त्यांची आठवण आल्याशिवाय रहात नाही.”

मग या कार्यक्रमाला उत्तर देण्यासाठी मुख्याध्यापक सातव सर उभे राहिले.

“आमच्या ज्येष्ठ आणि निवृत्त गुरुजनांना वंदन करून व तुम्हा सगळ्या विद्यार्थ्यांच्या परिश्रमाला अभिवादन करून मी काही विचार मांडतो.

पहिला विषय असा आहे की जसं मारूती गायकवाडांनी सांगितलं की तुमच्या बॅचचा हा कार्यक्रम मागच्या वर्षीच व्हायचा होता. पण मला असं समजलं की तुमच्या बॅचच्या एका मित्राला एका गंभीर आजाराला सामोरे जावं लागलं आणि तुम्ही सर्वांनी या मेळाव्यापेक्षा मित्राच्या आजाराला प्राधान्य दिलंत व मेळावा पुढे ढकलला. मला हे सगळं समजल्यावर मी अवाकच झालो. अशा प्रकारच्या सामाजिक जाणिवेचे संस्कार हे या शाळेचेच संस्कार आहेत हे माझ्या लक्षात आलं. तुमची बॅच आजही ‘नवाथेची बॅच’ म्हणूनच ओळखली जाते. अश्विन नवाथे नावाच्या एका प्रज्ञावान विद्यार्थ्याने १० वीच्या परीक्षेत निर्माण केलेले मानदंड आजही अबाधीत आहेत. त्याच अश्विन नवाथेसाठी हा मेळावा पणाला लावणाऱ्या तुमच्या सारख्या विद्यार्थ्यांनी केवळ शाळेसाठीच नाही तर समाजापुढेही आदर्शाचा मानदंड उभा केला आहे. एकीकडे नवाथेने शैक्षणिक मानदंड उभे केले तर त्याच्या बॅचने उत्तरदायित्वाचा मानदंड उभा केला आहे. मी आज या शाळेचा मुख्याध्यापक जरी असलो तरी वयाने तुमच्या सर्वांपेक्षा लहानच आहे. तेंव्हा कृपया आपल्या या छोट्या भावाच्या नमस्काराचा स्वीकार करावा.” मुख्याध्यापकांनी उपस्थित समुदायाला अक्षरशः साष्टांग नमस्कार केला. सगळे सभागृह उठून उभे राहिले. काही क्षणांची शांतता खूप काही बोलून गेली. सातव सर मग उभे राहिले. “तुमच्या बॅचच्या या अलौकिक योगदानाबद्दल शाळा या व्यासपीठाचे नामकरण ‘नवाथेची बॅच व्यासपीठ’ असे नामकरण करत आहे. आपण सगळ्यांनी जो विलक्षण बंधुभाव जागवला आहे त्याला शाळेतर्फे ही एक छोटीशी पोच.” या घोषणेसरशी सर्व सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने रोमांचित झाले. मुख्याध्यापकांच्या इशाऱ्यासरशी व्यासपीठाच्या मागचा पडदा खाली गेला आणि ‘नवाथेची बॅच व्यासपीठ’ हे नाव झळकू लागले.

कुणी काही सांगायच्या आधीच नवाथे उठला. त्या सरशी टाळ्यांचा कडकडाट झाला. हातात माईक घेऊन नवाथे कितीतरी वेळ रडतच होता. मग जरा भानावर आल्यावर त्याने सुरवात केली, “मित्रांनो, खरं तर या कार्यक्रमात मी व्यासपीठावर असण्याचं काहीच कारण नव्हतं पण तुमच्याशी बोलण्याची दुसरी कुठलीच संधी मला मिळाली नसती म्हणून मी इथे उभा आहे. मला तुमच्याशी प्रत्यक्ष बोलायचं आहे, शाळेशी प्रत्यक्ष बोलायचं आहे.” अश्विनला पुन्हा हुंदका फुटला, तो पुन्हा थांबला. “माझ्या बोलण्यात अनेक वेळा या आसवांचा व्यत्यय येईल, कृपया क्षमा करा. या शाळेतून शुचिर्भूत होऊन बाहेर पडल्यावर मी द्विज झालो, माझा दुसरा जन्म झाला. शाळा सोडल्यावर सगळीकडे मला लोक विद्याश्रमचा नवाथे म्हणून ओळखत होते. PhD होईपर्यंत माझी हीच ओळख होती आणि तो माझा एक अभिमानही होता. या शाळेनं मला आयुष्यात जगण्याचं भान दिलं, तुमच्यासारखे भाऊ दिले.” पुन्हा हुंदका. “पण आज मी माझ्या तिसऱ्या जन्माचा उत्सव साजरा करण्यासाठी इथे आलो आहे. मला हा पुनर्जन्म देणारे आपण सगळे किमयागार आहात. मला खूपच अभिमान वाटतो की मला ३-३ आई वडील लाभले. एकानी जन्म दिला, एकानी जगाची ओळख करून दिली आणि एकानी मला जगण्याची ओळख करून दिली. जगी सर्व सुखी, असा कोण आहे? याचं उत्तर मला आज सापडलं. माझ्यासारख्या एका य:कश्चित माणसासाठी आपण सर्वांनी आपल्या सदिच्छा पणाला लावल्यात आणि मला या जगात पुन्हा ओढून आणलंत. खरं सांगतो जीवनाच्या अशा टप्प्यावर तुम्ही भेटलात जेंव्हा मला जगण्याची इच्छाच नव्हती. मी अक्षरशः या जन्मातून सुटका होण्याची वाट पहात होतो तेंव्हा तुम्ही मला पदराखाली घेतलंत. तेंव्हा आता मी माझा राहिलेलोच नाही. मी आता तुमचा आहे. म्हणूनच जिच्यामुळे आपण एकमेकांचे झालो, त्या शाळेलाच मी समर्पित व्हायचं ठरवलं आहे. मी यापुढे

आपल्या शाळेत नि:शुल्क शिकवणार आहे. शाळेनं हवी ती इयत्ता, हवा तो विषय, हवे तेवढे तास मला द्यावेत. माझ्याकडून कणमात्रही कुचराई होणार नाही. माझ्या या बॅचची ही एक भेट समजा. मला कल्पना आहे की माझ्या मित्रांनी त्यांच्या कष्टाचा पैसा माझ्या उपचारांसाठी हसत हसत अर्पण केला. ती पै न पै चुकती करण्यासाठी शाळेनं मला ही संधी द्यावी एवढीच विनंती. फक्त मला पडण्याकरता होस्टेलमधला एखादा कोपरा मला द्यावा एवढी एकमेव अपेक्षा आहे." त्यानंतर किती वेळ टाळ्या वाजत राहिल्या त्याची काही मोजमापच करता आली नाही.

विनायक शं गोगटे

कणा

'कर्र्... कर्र्'... कर्र्' पांढऱ्याशुभ्रशा पसरलेल्या रांगोळीसारख्या भुसभुशीत बर्फावर चालतांना स्मिताच्या बुटांचा आवाज होत होता. अगदी काळजीपूर्वक ती एक एक पाऊल टाकत होती. एका हाताने तिने आयुषच्या दंडाचा आधार घेतला होता आणि किंचित त्याच्यावर भार टाकत, एकीकडे कलत ती चालली होती. खरंतर शिकागो काही तिला नवीन नव्हतं. पण बर्फ मात्र नवीन होता. गेल्या ३-४ वर्षांपासून ती उन्हाळ्यात २ महिन्यांसाठी आपल्या लेकाकडे, आयुषकडे येऊन राहत होती. ती शिकवायची त्या शाळेला सुट्ट्या लागलेल्या असायच्या त्यावेळी. पण यंदा मात्र आयुषचं शिक्षण पूर्ण झालं होतं. ग्रॅज्युएशन सेरेमनी दिमाखात साजरा झाला होता. आणि त्याने एक छानशी नोकरी जॉईन केली होती. म्हणून मग आता लवकर रिटायरमेंट घेऊन आयुषकडेच राहायला जावं असं तिला वाटायला लागलं होतं. एकटीने तरी आता किती काळ रहायचं ना? इतके दिवस काढलेच एकटीने. आतातरी लेकासोबत राहावं असं तिला फार वाटत असे. मग आणखी दोन-तीन महिने चक्क सुट्ट्या टाकून चांगले सहा महिने राहायचा प्लॅन करून आली होती ती.

या कायरोप्रॅक्टरच्या ऑफिसमध्ये ती आता तिसऱ्यांदा येत होती. आयुषने तिच्यासाठी दार उघडून धरलं आणि ती आत आली. गेल्या गेल्या निकोलने पुढे येऊन तिचं स्वागत केलं. मागच्यावेळी तिनेच एक्स-रे काढले होते. कायरोप्रॅक्टरचं हे ऑफिस म्हणजे एक भला मोठा हॉल होता. त्या हॉलचे साधारण पाच-एक विभाग केले होते. चारी भिंतींवर एक एक स्क्रीन होता ज्यावर सतत कोणी ना कोणी पेशन्ट्स आपल्याला या ट्रीटमेंट चा काय फायदा झाला हे सांगत होते. प्रवेश केल्या-केल्या दाराच्या डाव्या बाजूला दोन बेंच होते. एक छोटं कोट रॅक होतं. त्यावर तिने आपला अवजड कोट अडकवून ठेवला. त्याबरोबर तिला मोकळं मोकळं वाटलं. उजव्या बाजूला वेगवेगळ्या सांध्यांना व्यायाम देणाऱ्या काही मशिन्स होत्या. त्यातलं एक स्टूल फार मजेशीर वाटत होतं. त्याची सीट पुढे, मागे, दोन्हीबाजूला आणि पूर्ण गोलाकार अशी सगळीकडून स्विवेल होत होती. त्यावर बसून लोकं कंबरेला छान व्यायाम देत होती. असं सगळ्यांसमोर व्यायाम करावा लागणार की काय असं वाटून स्मिताला थोडं ऑकवर्ड वाटलं. प्रवेश केला त्याच्या विरुद्ध बाजूला एका कोपऱ्यात दोन ऍडजस्टेबल टेबल होते. त्यावरच पेशन्ट्सना तिथले डॉक्टर ट्रीटमेंट देत होते. या सगळ्या वेगवेगळ्या मशिन्सच्या एका बाजूला भिंतीला लागून डेंटिस्टच्या ऑफिसमध्ये असतात तशा दिसणाऱ्या आडव्याशा, ज्यावर आपण पाय पसरून बसू शकतो अशा खुर्च्या होत्या. खुर्चीच्या पाठीशी एक मान ठेवायला रेस्ट होती. त्यावर मान ठेवून आणि चेहेरा वर छताकडे करून एक मुलगी बसली होती. तिच्या कपाळावरून खाली लोंबकळणारा एक बेल्ट होता. त्याच्या खाली लोंबकळणाऱ्या टोकाला एक छोटा लोखंडी गोळा अडकवलेला होता. आणि तिच्या मांडीवर तिचं छोटं बाळ निर्धास्तपणे हातातल्या खेळण्याशी खेळत होतं. त्या बाळाची आई जरी कपाळावरून खाली लटकवलेलं वजन पेलत वर बघत होती तरी तिचा हात बाळाला सावरून होता. त्या निरागस बाळाला पाहताच स्मिताच्या चेहेऱ्यावर हसू उमटलं आणि तिचं दडपण थोडं कमी झालं. मग हळूच बेंचवर बसून तिने हातमोजे, स्कार्फ, टोपी असे सगळे साज उतरवायला सुरुवात केली. तोवर आयुष तिथल्या ऑफिस स्टाफशी बोलत होता. स्मिताला न कळणाऱ्या इथल्या इन्शुरन्सच्या जंजाळातून त्याने तिचा पेमेन्ट प्लॅन जमवून आणला होता. या बावीस-तेवीस वर्षाच्या आपल्या मुलाला आलेली जबाबदारीची जाणीव आणि समस्येतून मार्ग काढण्याची वृत्ती बघून तिला खूप बरं वाटलं. बारावीनंतर लगेच नीलिमा त्याला अमेरिकेत घेऊन आली होती. त्याच्या शिक्षणाची सगळी

जबाबदारी स्वतःवर घेऊन. बरेचदा तिला वाटायचं, राहीला असता तो आपल्याबरोबर अजून काही वर्ष भारतातच, तर बरं झालं असतं. आपल्याला सावरायला मदत झाली असती.

काही वेळानंतर एक पोरगेलेशी सावळीशी मुलगी आली आणि तिने बऱ्याच फॉर्म्सवर स्मिताच्या सह्या घेतल्या. डॉ. विल्यम लवकरच तुमच्याशी इव्हॅल्युएशनच्या रिपोर्टबद्दल बोलतील असं सांगून मोठ्या हॉलच्या बाजूला असलेल्या एका छोट्या हॉलवे मधून ती स्मिताला आणि आयुषला एका कन्सल्टिंग रूम मध्ये घेऊन गेली. आयुष फोनवर काही इमेल्स चेक करत होता. स्मिता ती कन्सल्टिंग रूम न्याहाळत बसली. बसायला दोन खुर्च्या, एक तपासणी साठी असतो तसा टेबल, एका टेबलावर कंप्युटर आणि त्याचा मोठ्ठा स्क्रीन. भिंतीवर एका बाजूला पाठीच्या कण्याची चित्रं, काही तक्ते, काही व्यायामाची प्रात्यक्षिक दाखवणारी, माहिती देणारी चित्रं लावली होती. तेवढ्यात डॉ. विल्यम आले. त्यांनी हसतमुखाने स्मिताशी हस्तांदोलन केले आणि तिला तिचे रिपोर्ट्स कंप्युटरवर दाखवू लागले. तिच्याच पाठीचे, झुकलेला कणा वेगवेगळ्या बाजूने दाखवणारे एक्स रे, कशामुळे असं होतं याची कारणे, त्याची टक्केवारी, उपचार काय असतात ही माहिती, आणि त्यांनी ठरवलेला ट्रीटमेन्ट प्लॅन हे सगळं पाहत-ऐकत असतांना तिला भांबावून झाल्यासारखं झालं. 'स्कोलिओसिस' हे तिच्या सततच्या पाठदुखीचं कारण आहे असं निदान डॉक्टरांनी केलं होतं. म्हणजेच काय तर तिच्या पाठीचा कणा छानपैकी एका बाजूला झुकत चालला होता, पीसाच्या झुकत्या मनोऱ्यासारखा. किंवा कधी कधी विकायला येतात ना मोठी मुळापासूनची मोरपिसं? ती उभी धरली की कशी एका बाजूला थोडी गोलाकार वळतात तसाच. किंवा अगदी लांब दांडा असलेलं गुलाबाचं फुल कसं एकीकडे कललेलं असत तसं. म्हणजे ते फूल म्हणजे आपलं डोकं. याही परिस्थितीत आपल्या मेंदूतून मजेशीर उपमा सुचाव्या याची तिला गंमत वाटली.

सह्या वगैरे असे सगळे सोपस्कार झाले आणि असं ठरलं की ३-४ महिने आठवड्यातून ३ वेळा इथे उपचार घेण्यासाठी यायचं. कायरोप्रॅक्टिक उपचार हे स्मितासाठी नवीन प्रकरण होतं. भारतात तर हे असं काही अजून तिने पाहिलं, ऐकलं नव्हतं. पाठदुखीचा तिचा त्रास कधीचाच. थोडेफार व्यायाम करणे आणि आयोडेक्स लावणे यापेक्षा तिने याकडे जास्त लक्ष दिलं नव्हतं. पण थंडीमुळे असो की अजून काही कारणाने इथे आल्यापासून जास्तच त्रास व्हायला लागला आणि आयुषनी कायरोप्रॅक्टरकडे जायचा आग्रह धरला. आजचे ते झुकत्या मनोऱ्यासारखे कुठलातरी अदृश्य आधार शोधणाऱ्या पाठीच्या कण्याचे एक्स रे पाहिले आणि वाटलं हे आतल्याआत काय झालं काही कळलं सुद्धा नाही. या झुकत्या मनोऱ्याला आता स्वतःच सावरलंच पाहिजे असं वाटलं तिला.

गेल्यावेळी जेंव्हा स्मिता इथे आली होती तेंव्हाच या प्रकाराची म्हणजे कायरोप्रॅक्टिक ॲडजस्टमेन्टची तिला थोडी भीतीच बसली होती. एकतर या ॲड्मजस्टमेंट्स चक्क हॉलमध्ये सगळ्यांसमोर होतात. त्याबद्दल तिला भलता संकोच वाटत होता. तसं म्हंटलं तर एका बाजूने उंच टेबलाचा आडोसा आहे खरा. त्यावर डॉक्टरांचा कॉम्पुटर असतो. त्यांत पेशन्टचा ट्रीटमेंट प्लॅन, पेशन्टची माहिती वगैरे पाहता येऊ शकते. आणि मुख्य म्हणजे हे ॲडजस्टमेन्ट वगैरे करतांना कुठे काही चुकीचा जोर पडला आणि हाड-बीड मोडलं तर काय अशी भीती वाटून गेली तिला. आयुष मात्र तिला खूप धीर देत होता. त्याच्या मैत्रिणीच्या आईला खूप फरक पडला असं सांगत होता, 'ही आपल्यासाठी वेगळी उपचार पद्धती आहे पण खूप वर्षांपासून चालत आलेली आहे. आणि त्यांचा अनुभव आणि ट्रेनींग इतकी चांगली असते की चुका होत नाहीत फारशा.'

डॉ. विल्यम तसे धट्टेकट्टे आणि उंचेपुरे होते. त्यांची ट्रीटमेंट देणं सुरु झालं. तिथे जवळच व्यायाम करणाऱ्या तिशी-पस्तिशीच्या गृहस्थाला त्यांनी हाक मारली, “Hey Mark, if You are free, we can get started". असं म्हणत त्यांनी मार्कला बोलावलं. मार्कसुद्धा त्याचा चालू असलेला व्यायाम सोडून तत्परतेने त्यांच्याकडे गेला. आणि त्या टेबलावर जाऊन त्यावर झोपला. पाठ ऍडजस्ट करता करता अगदी सहज त्यांचा संवाद सुरु होता. काल तुम्ही काय केलं? वगैरे जुजबी विचारपूस करत डॉक्टरांनी मार्कचे हात त्याच्या छातीजवळ क्रॉससारखे ठेवले. आणि स्वतः तसेच हात समोर धरून आपला सारा भार त्याच्यावर टाकला. आणि अगदी बोट मोडतांना जसा कडकड आवाज येतो तसा आवाज आला. स्मिता थोडी दचकलीच. तरी आयुषने सगळी कल्पना दिली होती. यामुळे पाठीच्या मणक्याची योग्य प्रकारे ऍडजस्टमेन्ट होते असं म्हणतात. स्मिताला आता मार्कची काळजी वाटू लागली. 'बरा असेल ना हा बुवा? एवढे कडकड आवाज येत आहेत'... 'ठीक असेल ना?' थोड्यावेळ शांतता होती. डॉक्टर एकाग्रतेने पुढची ऍडजस्टमेन्ट करत होते. मग मार्क अर्ध राहिलेलं संभाषण पूर्ण करत 'काल घरूनच काम केलं काही विशेष घडलं नाही' असं काहीसं म्हणाला. त्याच ते शांत स्वरातलं वाक्य ऐकून स्मिताचा जीव भांड्यात पडला. पण थोडावेळच. मग डॉक्टरांनी त्याला मान मोकळी सोडायला सांगितली आणि मान एकदा फटकन उजवीकडे आणि दुसऱ्यांदा डावीकडे फिरवली. पुन्हा स्मिता श्वास रोखून पाहत राहिली. आणि दोन मिनिटांनी पुन्हा त्यांचं संभाषण सुरु झालं. आता ते वीकेंडला काय काय प्लॅन आहेत याबद्दल बोलायला लागले. ती अशी डॉक्टर करत असलेल्या ऍडजस्टमेंटच्या प्रत्येक स्टेपवर दचकत असतांना एक असिस्टंट तिच्या प्लॅनची प्रत घेऊन स्मिताकडे आली आणि म्हणाली, " hi, I am Alex .How are you feeling today?" त्यावर हसत 'फाईन' असं उत्तर देत स्मिताने आता पुढे काय असं विचारलं. "We can go through your exercise routine first thing when you visit next time to get adjusted." मग स्मिताने सगळे रिपोर्ट्स आणि इतर कागदपत्र उचलले आणि अलेक्सला आणि निकोलला निरोप दिला. त्यांनीही उत्साहाने "सी यु नेक्स्ट टाईम स्मिटा!" असं म्हणत निरोप दिला.

स्मिताला घरी सोडून आयुष ऑफिसला निघून गेला. घरी येऊन सारखे हेच विचार तिच्या मनात घोळत राहिले. 'स्कोलिओसिस'... 'कायरोप्रॅक्टिक केअर'... . दोन्ही गोष्टी तिच्यासाठी नवीनच होत्या. साधी आपली फिजीकल थेरपीच करावी का? स्मिताला काही सुचेनासं झालं. निलीमाला विचारावं का? ही तिची नेहेमीची सवय. काही सुचत नसेल तर ती निलीमाला किंवा ताईला किंवा आयुषला फोन लावत असे. तेसुद्धा न कंटाळता स्मिताच्या मनातला गुंता सोडवायला मदत करत असत. पूर्वी ती राजेशला विचारायची. पंधरा वर्षाचा सुखाचा संसार. एखादं पान जरी हलवायचं तरी दोघे मिळून ठरवणार. अगदी जिवाभावाचं सख्य होत त्यांचं. साहजिकच सगळ्याच बाबतीत त्याच्यावर अवलंबून राहायची सवय झाली होती स्मिताला. त्याच असं अचानक अपघातात जाणं सहनच झालं नव्हतं तिला. हातातला हात, ज्याच्यावर निर्धास्त डोकं ठेऊन राहावं अशा खांद्याचा आधार खसकन हिसकावून घेतला होता नियतीने. आणि तिची अगदी भिर भिर अवस्था होऊन गेली होती. आयुष आठवीत होता तेंव्हा. तो तर अगदी केविलवाणा होऊन गेला होता. मग ताई तिच्याकडे घेऊन गेली दोन वर्ष. तिथेच स्मिताला शाळेत नोकरी लागली. आणि वरवर तरी गाडा सावरला. पण आतून मात्र कोलमडलेलीच राहिली स्मिता. मग नीलिमाने खरा आधार दिला. आयुषच्या बारावीत येऊनच राहिली ती जवळजवळ पाच सहा महिने आणि हट्टाने घेऊन गेली अमेरिकेत. आयुषही मग नीलिमाआत्यावर अवलंबून राहू लागला. कठोर निर्णय घेऊन नीलिमाने आयुषचं आयुष्य सावरलं म्हणायचं. पण स्मिता मात्र पूर्ण एकाकी झाली आणि मग या ना त्या कारणासाठी जवळच्या नातेवाईकांकडे आधार शोधत राहिली.

एक नि:श्वास सोडून स्मिता तिच्या रूममध्ये आली. तिथे ड्रेसरवर तिचा आणि राजेशचा फोटो ठेवला होता तिने. इतके वर्ष ती त्या फोटोकडे पाहत असे. राजेशशी मनातल्यामनात बोलत असे. पण आज पहिल्यांदाच तिच्या एक गोष्ट लक्षात आली. ती पूर्णपणे राजेशला रेलून त्याच्या आधारावर निर्धास्त हसत उभी होती. आणि खरंच ती निर्धास्तपणे मनाने पूर्णपणे त्याच्यावर विसंबून होती. राजेश गेला आणि तो आधार गेला. मग ती आणि तिचा कणा असाच अधांतरी राहून गेला. कुठलातरी अदृश्य आधार शोधत शोधत एका बाजूला झुकत राहिला.

"गुड मॉर्निंग स्मिटा!" स्मिताने प्रवेश केल्या केल्या निकोल, अंबर, ऍलेक्स यांनी जिथे असतील तिथून तिचं स्वागत केलं. असं स्वागत बघून स्मिताला छानच वाटलं. असं स्वागत ते सगळ्याच पेशन्टचे करतात हे माहित असलं तरी. ही ट्रीटमेंट सुरु होऊन आता एक महिना होत आला होता. आता तिला इथल्या रुटीनची सवय झाली होती. सुरुवातीला वाटणारी भिती, संकोच गेला होता. इथे येणाऱ्या काही पेशन्ट्सना आता ती ओळखायला लागली होती. तिच्या नकळत ती त्यांच्या लकबी, त्यांच्या स्वभावाचे बारकावे टिपत होती. बास्केटबॉल खेळणारी सहाफुटी उंचीची कॅथी, खेळत असतांना झालेल्या दुखापतीमुळे उपचार घेत होती. तिचं भारदस्त आणि शिस्तशीर वागणं स्मिताला आवडलं. तिच्यासारखं स्मिताच्या ओळखीत कोणीच नव्हतं. नाजूक चणीची, छोटीशी, टीपटाप आणि भराभर सगळे व्यायाम करत कुठेही न रेंगाळणारी किम, स्वतःचा व्यवसाय करणारा, त्यानिमित्ताने भरपूर सामान उचलावे लागते म्हणून पाठ दुखत असलेला बडबड्या मॅक्स, बाळाला कारसीट मध्ये घालून घेऊन येणारी सँडी. बाळ एकदा तिकडे आलं की कधी निकोलच्या कडेवर खेळ, कधी अंबर कडे जा अशी सफर करत असे आणि सँडी तोपर्यंत तिची ऍडजस्टमेन्ट करून घेत असे. ते बाळही छान सगळ्यांकडे जात असे. आज न राहवून तिने बाळाला खेळवलंच. मन प्रसन्न झालं एकदम.

आज डॉक्टर विल्यमनी ट्रीटमेंट झाल्यानंतर मशीनवर व्यायाम चालू असतांना येऊन विचारलं, “काय, फरक जाणवतो आहे का?” त्यावेळी मेंदूला ताण देऊन काय फरक पडला ते आठवायला लागली स्मिता. वरवर काही फरक वाटला नाही तरी पाठ बरीच मोकळी वाटत होती. पाठदुखी थोडी कमी झाल्यासारखी वाटत होती. पण मधून मधून ठणकायचीच पाठ. एकंदरीत थोडा जास्त मोकळेपणा आला होता चालण्यात. डॉक्टरांनी समाधान व्यक्त केलं. आणि स्मिताला समजाऊन सांगितलं की कुठलंही स्थित्यंतर हळू हळू आलेलच चांगलं. आपल्याला सहन न होणाऱ्या गतीने किंवा एकदम बदल घडले तर आपलं शरीर ते आघात किंवा trauma आहे असं समजतं आणि अजून जास्तच प्रतिकार करतं. त्यापेक्षा असे हळू हळू बदल घडत गेलेलेच चांगले. "The important thing is you notice the changes. However slow they may seem. I am happy with your progress, Smita!" दोन्ही हातांनी ‘थम्सअप’ची ऍक्शन करत डॉक्टर विल्यम म्हणाले. एकतर कितीतरी दिवसांनी कोणीतरी तिला तिने केलेल्या प्रगतीबद्दल आनंदाने सांगत होतं. आणि नवल म्हणजे साठी जवळ आलेल्या स्मिताला असं तरुणासारखं थम्सअप करून कोणीतरी प्रोत्साहन देत होतं. तिला खुद्कन हसूच आलं. भारतात तिला अगदी गंभीरपणे संबोधलं जात असे. त्यातच राजेशच्या जाण्यानंतर 'आपण बरं की आपलं काम बरं' असच तिचं वागणं झालं होतं. ट्रीटमेंटमध्ये नंतर हिप्सच्या अडजस्टमेन्टची भर पडली. मानेवर लटकवल्या जाणाऱ्या वजनांमध्ये वाढ झाली आणि व्यायामाचे प्रकार बदलले. एका प्रकारे प्रगती झाल्याची तिला खूण वाटली ही.

आज थोड्या वयस्क मैत्रिणींचा घोळका आला होता क्लिनिक मध्ये. त्यातल्या दोघींना आधी काही दुखणं झालं होतं तेंव्हा त्या इथेच येऊन ट्रीटमेंट घेऊन बऱ्या

झाल्या होत्या. त्या बरोबर मैत्रिणींना इव्हॅल्युएशन साठी घेऊन आल्या होत्या. त्यांच्या गप्पा सुरु होत्याच. त्यांनी स्मिताला सुद्धा त्यात सामील करून घेतलं. त्यांना कसा या ट्रीटमेंटचा फायदा झाला याची हकीकत आणि इथल्या गमती जमती त्यांनी तिला अघळपघळ गप्पा मारत ऐकवल्या. सगळ्या असिस्टंट्सशी आणि डॉक्टरांशी बोलून त्यांना घरी केलेल्या कुकीज देऊन मंडळी मूव्ही पाहायला निघाली. त्यानंतर लंचसाठी जाणार होती. सगळ्या सत्तरीच्या. पण उत्साह आणि आत्मविश्वास तरुणींचाच. मग त्या आपापल्या गाड्यांमधून थिएटरला जाण्याचं ठरवून निघाल्या. स्मिताचे विचारचक्र सुरु झाले. एकतर आपण पण इथल्या लोकांना असं काही तरी गिफ्ट द्यावं त्याबद्दल आणि सर्वात महत्वाचं म्हणजे इथे आपल्याला स्वतःहून आयुषला त्रास न देता कसं येता येईल याबद्दल. आयुषला बिचाऱ्याला नें-आण करावं लागतं. भारतात रिक्षा बसेसची किती छान व्यवस्था असते. मग तिने निकोल कडून बस बद्दल चौकशी केली तर तिला कळलं की इथे बसेस असतात. आपल्यासारख्या सतत जरी सुटत नसल्यातरी ठराविक वेळेला असतात. मग तिच्याकडून बसचं वेळापत्रक मागवून आयुषकडून कुठल्या स्टॉपवर चढायचं कुठल्या उतरायचं हे समजावून घेतलं. आता हळू हळू थंडी कमी झाली होती. बर्फसुद्धा बंद झाला होता. मग ज्यादिवशी वातावरण थंड नसेल त्यादिवशी बसने जाऊन बघायचं ठरलं. आयुषने बसवून दिलं आणि ती बरोबर योग्य स्टॉपवर उतरली. मागे बघते तो आयुष बस पाठोपाठ आलाच होता. तिला हसू आलं. सहावीत सायकलनीच शाळेत जाणार म्हणून त्याने ठरवलं तेंव्हा स्मिता सुद्धा 'हा व्यवस्थित जातो की नाही' म्हणून रिक्षाने त्याच्या पाठीमागे गेली होती. आता जबाबदारीची अदलाबदल झाल्याची तिला जाणीव झाली. मग स्मिता बरेचदा बसने जायला लागली. परतीची बस थोडी उशिराने येत असे. तेव्हा तिने इकडे तिकडे थोडं एक्सप्लोर करायचं ठरवलं. हे क्लिनिक ज्या ठिकाणी होतं तिथेच एक 'हॉबी लॉबी' दिसलं तिला. आयुषबरोबर काहीवेळा ती आली होती इथे. फिरत फिरत ती पेंटिंगचं सामान जिथे असतं तिथे आली आणि तिला एक कल्पना सुचली. आपण त्या क्लिनिक साठी एखादं पेंटिंग करून द्यावं का? किती दिवसात असं कॅनव्हास वर मोठ्ठ पेंटिंग केलं नव्हतं. शाळेत ती शिकवायची ते अगदी बेसिक पेंटींग असे. लहान मुलांना योग्य असं. कितीतरी वर्षांनी काहीतरी सुंदर कलाकृती करावी असं तिला वाटायला लागलं. आणि तिने सगळं सामान विकत घेतलं.

नीलिमा आणि इशिता येणार म्हणून तिने खास बेत केला होता. नीलिमाचा उत्साहाचा धबधबा आला आणि तिनेच सगळ्या घराचा ताबा घेतला. तिच्या कम्पनीतल्या गमतीजमती सांगत गप्पा रंगल्या. इशितासुद्धा आईवरच गेलीय अगदी. तिची पण तिच्या विश्वातल्या घडामोडी सांगत चिवचिव सुरु होती. हळू हळू आयुष सुद्धा त्या गप्पांमध्ये सामील झाला. आपल्यासमोर शांत शांत असलेला आयुष मस्त हसत खिदळत होता. ते इतके दिवस अमेरिकेत राहत असल्याने त्यांच्या गप्पांतले बरेचसे संदर्भ तिला लागेनासे झाले. मग आपोआप तिने श्रोत्यांची भूमिका घेतली. "काय मग कशी चाललीय कम्पनी?" नीलिमाने विचारलं. 'किती काम असतं? कसं हॅन्डल करतोस? बॉस कसा आहे? collegue कसे आहेत? जुने मित्र कुठे असतात वगैरे अशी तिची आपुलकी वजा चौकशी सुरु झाली. अचानक स्मिताच्या काळजात छोटीशी कळ उमटली. असं वाटत होत की आयुष नीलिमाचा मुलगा आहे आणि आपणच त्याच्या आत्या किंवा मावशी वगैरे. आपल्या सैरभैर काळात आपण पोराला गमावून बसलो याची खंत तिचं काळीज कुरतडत गेली. असं कसं होऊ दिलं आपण? डोळ्यात जमा होणारं पाणी दिसू नये म्हणून ती 'पाठ दुखते आहे थोडं पडते' असं सांगून तिच्या खोलीत निघून गेली. कितीतरी वेळ त्यांच्या गप्पांचा नुसता आवाज तिच्या कानावर येत होता. मनसोक्त रडून झाल्यावर मात्र तिला अपराधी वाटलं. आपण असे नैराश्याला तोंड देत होतो तेंव्हा आयुष तिथेच राहिला असता तर त्याच नुकसान

झालं असतं. निदान तो तरी सावरला, त्याच्या आयुष्यात तरी आनंद आला. तोंडावर पाणी मारून ती बाहेर जायला निघाली तेंव्हा तिच्या कानावर त्यांचा संवाद आला. "अरे बापरे एवढी फी? व्हिजिटर इन्शुरन्स कव्हर करेल असं वाटत नाही. आता काय करणार आहेस? मी पाठवते तुला पैसे," नीलिमा म्हणत होती. " नाही ग आत्तु, होईल माझ्या सेविंग्समध्ये ऍडजस्ट. पण या ट्रीटमेंटने फायदा होऊ शकतो. नाही तर ती दुर्लक्ष करेल नेहेमीप्रमाणे." हा संवाद आपल्याबद्दल आणि आपल्या कायरोप्रॅक्टिक ट्रीटमेंटबद्दल आहे हे तिला कळलं आणि ती जागेवरच थांबली.

दुसऱ्यादिवशी नीलिमा, ती, आणि इशिता शॉपिंगसाठी गेले. म्हणजे नीलिमानेच काय काय घेतलं. स्मितासाठी सुद्धा ऍक्टिव्ह वेअर घेतलं. मग बाहेर जेऊन त्या घरी आल्या. स्मिताचा स्वभाव एरवी सुद्धा शांत अबोल असल्यामुळे तिच्या मनातली चलबिचल कोणाला जाणवली नाही. किंबहुना हाच तिचा स्वभाव बनला होता. नीलिमाने बोलता बोलता विचारलं, "आता तुझ्या रीटायरमेंटला किती वर्ष आहेत अजून?" " चार आहेत." स्मिताचं उत्तर. "मग नंतर काय ठरवलं आहेस?" स्मिताने फक्त प्रश्नार्थक नजरेनं नीलिमाकडे पाहिलं. "अगं, आता कुठे आयुषला जॉब लागला आहे. आता जॉब लागला म्हणजे झालं असं समीकरण कुठेच राहीलं नाही. मुलं जॉब बदलतात, अजून चांगल्या संधी शोधतात. जोपर्यंत अशी स्थिरता येत नाही तोपर्यंत त्याला ग्रीनकार्डसाठी अप्लाय करता येणार नाही. जेंव्हा अप्लाय करेल तिथून पुढे काही वर्ष प्रोसेसिंगला. ग्रीनकार्ड मिळालं की मग नंतर सिटीजनशिप. आणि त्यानंतर तो तुझ्यासाठी ग्रीनकार्डसाठी अप्लाय करू शकेल. यासगळ्यात किती वर्ष जातील सांगता येणार नाही. मला माहित आहे तुला आयुषकडे येऊन राहायचं आहे. पण ते त्याच्या हातात आहे ना तुझ्या. राग मानू नको पण तुला तुझं स्वतःचं असं विश्व निर्माण करावं लागेल आता." स्मिताला या बोलण्याचा रागही आला नाही आणि वाईटही वाटलं नाही. हे तिच्या लक्षात आलं नव्हतं असं नाही. पण या सगळ्याला इतकी वर्ष लागू शकतात याबद्दल तिने विचारही केला नव्हता. स्वतःचं कुठलं विश्व निर्माण करा? जे विश्व मन लावून उभं केलं होतं ते नाहीस झालं होतं. त्या विश्वाचा भाग म्हणून आयुषला तिच्या मनात तिने घट्ट धरून ठेवलं होतं. त्याच्या आधाराची ती वाट पाहत होती. म्हणजे पुन्हा तिचं विश्व सुरक्षित होईल. पण हे दुसऱ्याचा आधार शोधणं काही खरं नाही असं जाणवलं तिला. आपला आधार आपणच शोधला पाहिजे. आपणच खंबीर झालं पाहिजे. कणा ताठ ठेऊन आपणच आपला आधार झालं पाहिजे आणि जमलंच तर आयुषचाही.

का कोण जाणे तिने हे सगळे विचार बाजूला ठेऊन हातात ब्रश घेतला आणि भराभर कॅनवासवर ब्रशचे फटकारे चालू लागले. जणू तिचं मन दुःखाचे, नैराश्याचे रंग टाकून उत्साहाचे, आनंदाचे समर्थ रंग निवडत होतं. जेंव्हा पेंटींग पूर्ण झालं तेंव्हा तिचं मन पूर्ण शांत झालं होतं. काहीवेळापूर्वीच्या गहिऱ्या रंगाचे सावट तिच्या मनावरही नव्हते आणि तिच्या कॅनवासवरही. पेंटिंगच्या तळाशी तिने पूर्वी ती करायची तशी लफ्फेदार सही केली आणि तिचं मन समाधानाने भरून गेलं.

आता तिची अर्ध्याहून अधिक ट्रीटमेंट झाली होती. ऍलेक्सने तिला पुन्हा काही व्यायाम करायला सांगून तिचं इव्हॅल्युएशन केलं. तिच्या शरीराची डावी बाजू आणि उजवी बाजू यात काही इम्बॅलन्स आहे का हे ती तपासत होती. सुरुवातीला जेवढा इम्बॅलन्स होता त्यापेक्षा आता कितीतरी कमी झाला होता. याचाच अर्थ पिसाचा झुकता मनोरा झालेला तिचा पाठीचा कणा हळू हळू पूर्वपदावर येत चालला होता. तिला या सगळ्या लोकांबद्दल, क्लिनिकबद्दल अगदी कुतज्ञता दाटून आली. त्यांना खरंच कल्पना नव्हती की तिच्या शरीराच्या, पाठीच्या कण्याबरोबरच तिच्या मनाचा सुद्धा बॅलन्स हळू हळू पूर्ववत येत होता. खरंतर तिने तिचं पेंटींग शेवटच्या दिवशी द्यायचं ठरवलं होतं पण तिने आधीच हे पेंटींग

गिफ्ट म्हणून डॉक्टरांना आणि सगळ्या स्टाफला दिलं. त्याचं केवढं कौतुक झालं! प्रत्येकाने हस्तान्दोलन करून धन्यवाद दिले. चित्रातल्या रंगसंगतीचं, विषयाचं कौतुक केलं. आणि अगदी सगळ्यांना दिसेल अशा ठिकाणी त्याला जागा दिली. स्मिता अशा कौतुकाने हरखून गेली. ती जेंव्हा स्कूल ऑफ आर्ट मध्ये मास्टर्स करत होती तेंव्हा तिच्या काही चित्रांची प्रचंड वाहवा झाली होती. त्यावेळीही तिला एवढं अप्रूप वाटलं नव्हतं. नंतर मात्र तिने चित्र काढणं आणि प्रदर्शनं भरवणं कमीच केलं होतं. आधी संसारात गर्क झाल्यामुळे आणि नंतर....

नेहेमी प्रमाणे स्मिता गोल फिरणाऱ्या स्टूलवर बसून व्यायाम करत होती तेंव्हा ऍलेक्स तिच्याशी गप्पा मारायला आली. "Smita, we didn't know you are quite an artist. Do you paint professionally?" "Not nowadays, but I would like to start painting again." स्मिताने मग तिला तिच्या चित्रांच्या, प्रदर्शनाच्या आठवणी सांगितल्या. तिला भरभरून बोलावंसं वाटलं. आणि ऍलेक्स पण मन लावून ऐकत होती. शेवटी जाता जाता ती सहज म्हणाली, "If it's not too much to ask, would you mind painting something for me? I wouldn't mind paying for it."

स्मिता भराभर उत्साहाने कामाला लागली. कितीतरी विषय, कितीतरी संकल्पना, भावना कुंचल्यातून कॅनव्हासवर उतरू लागल्या. कसल्यातरी अनामिक जाणिवेने भारल्याप्रमाणे तिची चित्रं पुन्हा जिवंत होत होती. इतके दिवस, वर्ष अंतर्मनात काय काय दडून बसलं होतं ते सगळं रितं झालं. मनात साचलेलं, शब्दात न व्यक्त होणारं सगळं कुंचल्यातून व्यक्त झालं. जणू तिचा त्या कॅनव्हासशी संवाद सुरु होता. त्यावर मनातलं काव्य उमटत होत. झपाटल्यासारखी स्मिता त्या रंगाच्या दुनियेत रंगून गेली.

जुलैचं स्वच्छ ऊन होतं. पक्ष्यांची मंजुळ किलबिल साथीला होती. रेशमी वारा स्पर्शत होता. आयुषने पिकनिकचा प्लॅन आखला. त्यानेच सँडविचेस, फ्रुटसॅलड वगैरे तयार केलं आणि म्हणाला, " तुझं पेंटिंगचं सामान पण घेऊन चल. खूप सुंदर तळं आहे तिथे तुला नक्की आवडेल." अतिशय सुंदर जागा होती. कुणाही चित्रकाराला मोह पडावा असा देखावा. आयुष सुद्धा उत्साहात येऊन या जागेबद्दल, त्याच्या आधीच्या पिकनिकबद्दल भरभरून बोलत होता. "आई तू हे पेंटिंग करायला लागलीस ना ते खूप मस्त झालं गं. किती टॅलेन्ट आहे तुझ्यात! मी पण विसरलोच होतो. तू खूप चित्र काढत जा. आपण इथे त्याची प्रदर्शनं भरवू. किंवा एटसी वर विकू." "हे एटसी काय?" स्मिताचा प्रश्न. खरंतर हे एटसी का काय याचं तिला काही कुतूहल नव्हतं पण आज किती दिवसांनी आयुष असं पूर्वीसारखं बोलतो आहे याचंच तिच्या मनाला समाधान वाटलं. नकळत तिचे डोळे भरून आले. आणि एखादं सुरेल गाणं ऐकावं तसं ती आयुषचं बोलणं मन लावून ऐकत राहिली, मनात साठवत राहिली.

आज तिचा ट्रीटमेंटचा शेवटचा दिवस होता. फायनल इव्हॅल्युएशन झालं होतं. ऍलेक्स म्हणाली होती आज आयुषला घेऊन या, काहीतरी बोलायचं आहे. ती आणि आयुष क्लिनिक मध्ये पोहोचले तर सगळ्या असिस्टंट्स हजर होत्या. सगळ्यांनी हसून त्यांचं स्वागत केलं आणि कन्सल्टिंग रूमकडे न्यायला लागले. स्मिता नवलाईने पहात राहिली. रिसेप्शन नंतरच्या हॉलवेच्या भिंतींवर तिची पेंटिंग्स छानशा फ्रेम मध्ये लावून प्रदर्शित केली होती. आणि या प्रदर्शनाला नाव दिल होतं 'Chiropractor's office - Impressions'. स्मिताला काय बोलावं कळलंच नाही. आयुषलाही काही समजलं नाही पहिल्यांदा. पण प्रत्येक पेंटींगच्या खाली 'स्मिता' अशी ओळखीची लफ्फेदार सही पाहिली आणि त्याच्या डोळ्यात पाणी तरळलं. स्मिताने तिने काढलेली काही पेंटिंग्स या क्लिनिकला दान केली होती. आणि त्यांना

त्याचे प्रदर्शन भरवून पैसे मिळवण्याचे किंवा ती पेंटिंग्स विकण्याचे स्वातंत्र्य दिले होते. अट अशी की त्यांनी हे पैसे कोण्या गरजूच्या उपचारासाठी वापरावे. असं तिच्या पेंटिंग्सच छोटेखानी उदघाटन झाल्यांनतर डॉ. विल्यमनी आयुषच्या हातात एक लिफाफा दिला आणि हा काही फीज मध्ये दिलेला स्पेशल डिस्काउंट आहे असं म्हणाले. स्मिताच्या हातात तिचे रिपोर्ट्स दिले. स्मिताने विचारलं, "Does it mean I am completely healed now?" त्यावर ते हसून म्हणाले, "Not completely... but enough to carry on your own". आणि स्मिताला पटलं ते. पूर्ण बरी जरी झाली नसली तरी ताठ उभं राहण्याइतकी तरी नक्कीच सक्षम झाली होती ती. आणि कणा पूर्ण ताठ होत जाणं हे हळू हळू घडत राहणार आहे.

श्रद्धा भट

(अक्षयभाषा कथा स्पर्धा- पारितोषिक प्राप्त कथा)

स्पर्धेच्या नियमानुसार शब्दमर्यादेत बसण्यासाठी या कथेमध्ये काही काटछाट केली होती. ते करण्यापूर्वीचे हे रूप.

DRAPER &KRAMER MORTGAGE CORP.

Gyan Srivastava

Residential Mortgage Lending

- Home Purchase and Refinance Loan Specialist
- Lender Credit Available to Offset Closing Costs
- Cash-out Refinancing Options Available
- Fixed/Jumbo/Adjustable-Rate Mortgages (ARMs)
- No PMI Program
- In-House Underwriting and Closing
- Investment Properties/Second Homes
- Home Equity Lines of Credit (HELOCs)
- FHA/VA/Interest Only
- Quick Turn Times

Contact me for a low rate quote and a mortgage consultation!

Mobile: 630-670-1645 gyan.srivastava@dkmortgage.com
Office: 630-268-5447 www.dkmortgage.com/gyan

701 E. 22nd Street, Suite 125 • Lombard, IL 60148

EQUAL HOUSING LENDER

Gyan Srivastava (IL:031.0027115 NMLS:287055) is an agent of Draper and Kramer Mortgage Corp. (IL:MB.0004263 NMLS:2551) is an agent of Draper and Kramer Mortgage Corp. (NMLS:2551) an Illinois Residential Mortgage Licensee located at 1431 Opus Place, Suite 200, Downers Grove, IL 60515, 630-376-2100. IL: Illinois Residential Mortgage Licensee No. MB.0004263 - Licensed by the Department of Financial and Professional Regulation, Mortgage Banking Division, 100 West Randolph, 9th Floor, Chicago, IL 60601, (888) 473-4858. 02970-01 03/2018

लेख

महाभारताचा लेखनिक - गणपती

गणपती म्हटले की आपणास गणपती विषयी अनेक कथा आठवतात. गजाननाचे वेगवेगळे अवयव त्यामागे असलेल्या बोधकथा यावर आपण विचारमंथन करू लागतो. व्यासांचे नाव ऐकताच आपल्या सर्वांना महाभारत आठवते. भगवान व्यासांना वेदव्यासही म्हणतात, कारण त्यांनीच प्रथम वेद लिहून ठेवले. भगवान व्यास हे प्रगल्भ, अतिशय कुशाग्र बुद्धीचे होते. त्यांच्या डोक्यात संपूर्ण महाभारत काव्यरूपात लिहीण्याची कल्पना आली. आजही महाभारत हे सर्वात मोठे महाकाव्य आहे.
त्यांच्या डोक्यातील ही कल्पना पानावर उतरविणे हे महाकठीण काम होते. त्यांची विचारचक्रे सुरू झाली. असे हे कठीण काम कोणता लेखनिक करेल? अनेकांचा त्यासाठी त्यांनी विचार केला परंतु त्यांना कोणी योग्य व्यक्ती सापडेना. शेवटी त्यांनी विश्वनिर्मात्या ब्रह्मदेवाचे ध्यान सुरू केले. ब्रह्मदेव त्यांच्यावर प्रसन्न होऊन त्यांच्यासमोर आले. त्यावेळी त्यांनी विचारले, "महर्षी व्यास, तुम्हाला काय पाहिजे?" वेदव्यासांनी त्यांचे दर्शन घेऊन त्यांना सांगितले की महाभारताची संपूर्ण कल्पना त्यांच्या डोक्यात आहे पण योग्य पात्रता असणारा लेखनिक त्यासाठी सापडत नाही. ब्रह्मदेवाने त्यांना सांगितले तुम्ही गणेशाची प्रार्थना करा तेच तुमचे लेखनिक होण्यास पात्र आहेत, मग ध्यानस्थ होऊन व्यासांनी गणपतीची आराधना सुरू केली.

अजं निर्विकल्पं निराकारमेकं । निरानंद मानंद मद्वैत पूर्णं ।

परं निर्गुणं निर्विशेषं निरीहं । परब्रह्म रूपं गणेशं भजेम ॥१॥

गुणातीतमानं चिदानंदरूपं । चिदाभासकं सर्वगं ध्यानगम्यं ।

मुनिध्येयमाकाशरूपं परेशं । परब्रह्मरूपं गणेशं भजेम ॥२॥

जगत्कारणं कारणज्ञानरूपं । सुरादिं सुखादिं गुणेशं गणेशं ।

जगद्व्यापिनं विश्ववंद्यं सुरेशं । परब्रह्मरूपं गणेशं भजेम ॥३॥

(वरील श्लोकांचा मराठीत अर्थ)

(गणपती कधी जन्माला आला नाही. तो अज आहे आणि निर्विकल्प आणि निराकार आहे. त्याच्यातील चैतन्य एकच आहे जे सर्वव्यापी आहे. चैतन्याचे अधिदेव श्री गणेश यांची भक्ती केली पाहिजे. निराकार आणि तरी सुद्धा साकार रूप असलेल्या सर्वव्यापी गणेशाची प्रार्थना आणि पूजन करूया.

सर्व गुणांच्या तू पलीकडे आहेस. गणेशाचे स्वरूप सच्चिदानंद आहे, आनंदरूप आहे. सर्वव्यापी असा तो केवळ ज्ञानानेच ओळखू येऊ शकतो. ऋषीमुनी ध्यान करतात तेव्हा त्यांच्या ध्यानचित्तामध्ये जे निरंजन, निर्विकल्प आहे ते चिदाकाश तूच आहेस. त्या परब्रह्मरुपी गणेशाला मी वारंवार पूजेन आणि त्याला वंदन करेन.

जी चैतन्यशक्ती या समस्त संसाराचे मूळ कारण आहे, ज्यातून सर्वकाही निर्माण झाले आहे, ज्यामध्ये सर्वकाही टिकून आहे आणि ज्या शक्तीमध्येच सर्वकाही विलीन होणार आहे ती कारणरुपी शक्तीच परब्रह्मस्वरूप श्री गणपती आहे. या जगताच्या कारणाविषयी जाणून घेणे हेदेखील एक ज्ञान आहे. ते सूक्ष्म ज्ञानसुद्धा गणेश आहे. ज्ञातासुद्धा तोच आहे आणि ज्ञानसुद्धा तोच आहे.

संपूर्ण जग तुझ्या अस्तित्वाने व्यापलेले आहे. हे गणपती, प्रत्येकजण तुला पूजितो.
जगाच्या कानाकोपऱ्यात तुझ्यावर श्रद्धा ठेवणारे लोक

आहेत. सगळीकडे तुला गुणाचे दैवत म्हणून मानले जाते. समस्त जगात तू वंदनीय आहेस. तू परब्रह्मच आहेस. त्या परब्रह्मरुपी गणेशाला मी वारंवार पूजेन आणि त्याला वंदन करेन.)

महर्षी वेदव्यासांच्या प्रार्थनेने भगवान गजानन प्रसन्न झाले व त्यांनी व्यासांना दर्शन दिले. गजाननाने विचारले, "महर्षी तुम्हाला काय पाहिजे?" महर्षी व्यासांनी त्यांना विचारले, "तुम्ही माझे लेखनिक व्हाल का? मी महाभारत सांगेन ते तुम्ही लिहून काढाल का? कृपया या माझ्या प्रार्थनेचा स्वीकार करा." गणपती हसले व म्हणाले, “मी तुमचा लेखनिक आनंदाने होईन, पण त्यासाठी माझी एक अट आहे. लिहिताना मी माझी लेखणी मध्ये थांबवणार नाही. तुमचे महाभारत सांगून होईपर्यंत आपण मध्ये थांबू नये.”

ही अट थोडीशी कठीण होती. थोडा विचार करून वेदव्यास म्हणाले, “ठीक आहे मी तुमची अट मान्य करतो, पण माझी पण एक अट आहे. मी सांगतो ते समजेपर्यंत व पूर्ण अर्थ कळेपर्यंत लिहायचे नाही.” श्री गणेशांनी ती अट मान्य केली. त्यामुळे व्यासांना मधून मधून दिवसातील नित्य कर्म करण्यास वेळ मिळणार होता. स्नान, प्रार्थना, जेवण व थोडीशी डुलकी काढण्यासाठी वेळ पाहिजे होता. त्यामुळे मुद्दाम कठीण शब्दात अतिशय खोल अर्थ असलेले श्लोक ते सांगत असत त्यामुळे गणपतीला अर्थ समजण्यासाठी किंचित वेळ लागत असे. तोपर्यंत वेदव्यास नवीन श्लोक रचत असत किंवा जेवण व विश्रांतीसाठी जात असत. अशाप्रकारे ‘महाभारत’ हे पवित्र महाकाव्य व्यासांनी रचले व भगवान गणेश यांनी लेखनिक होऊन ते लिहिले.



माधव ना. गोगावले

आठवणी

वर्ष होते १९६३. रिझर्व्ह बँकेने प्रत्येकी फक्त आठ डॉलर्स आणि ऐंशी सेंट्स आणावयास परवानगी दिली होती. म्हणून अमेरिकेंतील एका गव्हर्नरच्या सेक्रेटरीला लिहिले. तिने २०० डॉलर्स पाठवले. ते घेऊन टेक्सासला जाईपर्यंत पैसे संपत आले. दोघांना विश्वविद्यालयात नोंदणी करायची होती. बँकेत गेलो. पासपोर्ट वगैरे कागद दाखवले. ४००० डॉलर्स देण्यास तयार होते. एवढे नकोत म्हटले. आग्रह केलान् पण फक्त फी पुरते आणखी खर्चायला असे ५०० डॉलर्स कर्ज घेतले. सौभाग्यवती रोज पाच चौक आणि मी अडीच मैल शिक्षणासाठी चालत जायचो. हातात पुस्तकांची पिशवी. एक आठवड्यानंतर मी चालताना एक मोटार थांबली. मला विचारले, "तुम्ही विद्यार्थी आहात ना?" मी "हो" म्हटले. "इतके लांब चालता का?"त्यांचा प्रश्न. मी सांगितले, "चालणे हा उत्तम व्यायाम आहे." ते दोघे हसले. मोटारीत बसा म्हणाले. त्यानंतर माझे कॉलेजसाठी चालणे संपले.
एकीकडे नोकरी होती, डॉलर्स एक आणि दहा सेंट्स दर तासासाठी. थोडे पैसे वाचवल्यावर एक सायकल पाहिली पोलीस स्टेशनवर. सात डॉलरला मिळाली. जुन्या सायकलींचा सेल होता. पुढे दांडी असलेली मेन्स सायकल घेतली सगळीकडे जाणे सोयीचे झाले. लवकर जाता येऊ लागले गम्मत म्हणजे बायको पुढल्या दांडीवर बसून दोघे जाऊ लागलो की खिडक्या उघडून अमेरिकन हात दाखवीत. कारण गावात आम्ही दोघेच भारतीय. आणखी रंग म्हणजे आम्हाला अमेरिकन शाळातून बोलावणी यायची. 'भारतीय विवाह व्यवस्था, शिक्षण पद्धती' वगैरे विषयांचे वर्णन सर्वांना ऐकावेसे वाटावयाचे. हळू हळू थोडे पैसे जमा झाले. मोटार घेता येईल का पाहू म्हणून गेलो पाहावयास. संवाद असा झाला:

आम्ही- गाडी घेण्याचा विचार आहे.
तो- चार हजाराला नवी गाडी आहे.
आम्ही- जुनी गाडी दाखवा.
तो- ही गाडी एक हजाराला उत्तम आहे.
आम्ही- आणखी स्वस्त.
तो- बरं तर ती गाडी पाचशे डॉलर्सला आहे.
आम्ही आणखी खूप स्वस्त असेल तरच थांबतो.
तो- ती कोपऱ्यात शंभर डॉलर्सला आहे.
आम्ही- तर ती घेतो.
असे करून १९५४ ची फोर्ड गाडी घेतली.

आणखी एक गम्मत. दोन आठवडे गाडी चालवली. नंतर एक दिवस कॉलेजला जाताना गाडी एकदम थांबली. समोर दुरुस्तीचे दुकान होते. जाऊन विचारले तर 'गाडी आत आणा' म्हणाले. 'चालत नाही' सांगितले. त्याने बाहेर येऊन हूड उघडले दांड्या हलवून म्हणाला, "सर्व्हिसिंग केव्हा केले होते?" "सर्व्हिसिंग शब्दाचा अर्थ काय?" असे विचारले. तो म्हणाला "कशाचाही थेंब राहिलेला नाही. तेल नाही,

ब्रेकचे तेल नाही, ट्रान्समिशनचे तेल नाही.”
त्याने सर्व घातलें, पैसे फार घेतले नाही.
परमेश्वर कृपा.
अशा अनेक गमती झाल्या.

प्रभाकर जोशी

International World Sanatan Dharma Conference 2023 - Varanasi

Om Namah Shivaay!

Respectful greetings to all the esteemed ladies and gentlemen present at the International World Sanatan Dharma Conference, from Madhav Gogawale, representing Chicago, USA.

I am sincerely grateful for being invited to this grand conference by the organizers of the World Sanatan Dharma Conference, respected Professor Madhav Ratate, Shankar Mishra, Dr. Shri Ram, and Acharya Santosh Dubey.

Our Sanatan Dharma is eternal, and it will undoubtedly remain eternal. The individuals propagating this dharma have been chosen by the divine, and this is a matter of pride for all of us. In changing times, based on the foundation of knowledge, the propagation of Sanatan Dharma abroad has been carried out for many years by Maharashtra Mandal Chicago, America, to promote our culture and move it forward.

Our Sanatan Dharma is based on science and faith. Our sages, monks, and swamis, through the study and research of our Vedas and other ancient scriptures, have shown us the path of universal welfare. Taking inspiration from this, the Maharashtra Mandal Chicago has been consistently organizing various events to acquaint the people of America and especially our children and youth with the culture of Sanatan Dharma.

On the 'Adhytma Peeth' forum of the Mandal every Thursday, we are fortunate to hear discourses on various spiritual topics related to Sanatan Dharma, the Bhagavad Gita, Vedas, Upanishads, scriptures, Mahabharata, Ramayana, and the spirituality associated with great personalities in India and other countries. The residents of Varanasi can take pride in the fact that we have had the privilege of listening to Professor Madhav Ratate on our spiritual seat and historical platform. We engage in practices such as Rajyoga, yoga meditation, bhajans, and kirtans regularly. Children and youth recite various verses and hymns, such as Ramraksha and Gita, and present them in programs.

Culture is not only written in books; it is an inseparable part of our language, traditions, festivals, attire, and cuisine. The protection of culture can be achieved through the preservation of language. Therefore, every Tuesday, we have our 'Sahitya Katta' where, after the presentation of self-composed poems and articles, there is a discussion on Marathi literature. Poets, writers, musicians, and directors of our languages are invited to present their art on the literary platform.

Every Friday, the 'Itihaas Manch' presents the history of Bharatvarsh and humanity. We all know that those who forget history are never forgiven by history. A nation that forgets its history undergoes a change in its geography.

This truth is not unknown to the people of Bharatvarsha. The various fragments of Bharatvarsh show us that we had forgotten our glorious history. We were intentionally taught distorted history. To bring forth the correct facts of history, we invite historians, history professors, researchers, archaeologists, and scientists from India and other countries to the history platform. Lectures are presented on topics such as the Indus Valley Civilization, Saraswati Civilization, Ramayana, Mahabharata, Sanatan Dharma, Sanskrit, Devanagari, India's agriculture, our vibrant history, research essays, and more.

Our glorious history, the Rajputs, Marathas, Chhatrapati Shivaji Maharaj, Chhatrapati Sambhaji Maharaj, Maharana Pratap, Swami Vivekananda, and other great leaders of the Indian revolution, are discussed by historians. At the end of the lecture, history enthusiasts participate in a discussion.

Adhering to the tradition of the Sanatan Dharma, every month, according to the date, men, women, children, and senior citizens of the Maharashtra Mandal enthusiastically celebrate our festivals. Through these festivals, we discuss why we celebrate these festivals, how they became a part of our culture, and the physical and mental benefits for humanity. Emphasis is given to how the well-being of the entire world is achieved through these points.

On Saturdays and Sundays, experts present on topics related to yoga practice, yogasanas, and health. Many people in America and Western countries have portrayed an incorrect image of India, and some continue to do so. Our Sanatan Dharma is presented on what it truly is, the special knowledge it holds for the welfare of humanity, the true meaning of our traditions, and more. Until now, entertainment programs included Marathi plays and some music and dance, and our people gathered in a hall to celebrate festivals. However, in the last three years, not only in Chicago but also in other cities of America, members of the Maharashtra Mandal have been participating in local festivals, city fairs, and Independence Day programs in America. Officials from various cities have now started inviting us to participate in these events. In these festivals, we showcase Maharashtra's traditional music, Dhol-Tasha-Lezim performances, Bhagwa flag, and traditional dances. American people also join us in dancing to the beats of Dhol-Lezim. In the past three years, the Maharashtra Mandal's Dhol-Lezim and Bhagwa flag procession has contributed to the grandeur of these events 20-25 times each year.

Dharma is considered a belief. When we practice cultural beliefs, their propagation occurs, and new cultures emerge. In this changing era, our efforts aim to help our children recognize our ancient Sanatan Dharma traditions and languages. Koshish Karne waalon ki kabhi haar nahi hoti (Those who make an effort never face defeat), as we all

know from this poetry of Shri. Sohan Lal Dwivedi. Swami Chinmayananda used to say, "Catch them young." Children learn and understand more by looking at adults rather than from books. Therefore, our Mandal's volunteers actively participate in cultural programs with their relatives. In Chicago, we are also running a Marathi school for children. We are establishing an 8-foot tall majestic statue of Chhatrapati Shivaji Maharaj, the protector of Sanatan Dharma, in Chicago for the first time, in this magnitude, in a Western country. Our Sanatan Dharma considers the welfare of all human races. Keeping mental and physical strength, diet, mental balance, spiritual strength, and more in mind, the executive committee and volunteers of the Maharashtra Mandal fulfill the duty given by God with a service-oriented attitude. Sant Dnyaneshwar gave an excellent example: "The calf, even though it stays away from the cow, comes back to drink milk." Similarly, we, from foreign lands, consume the nectar of our Sanatan Dharma.

I am grateful that you invited me to this sacred event and provided me with the opportunity to share information about the activities related to the promotion of Sanatan Dharma by Maharashtra Mandal Chicago. I express my heartfelt gratitude to you and all your colleagues.

May Sanatan Dharma always remain strong and secure, and may everyone be well. With these good wishes, I take your leave. I urge all of us to come together and cheer:

"Namah Parvati Pataye, Har Har Mahadev! Jai Hind! Chhatrapati Shivaji Maharaj ki Jai! Jai Shree Ram! Vandemataram!"



Mr. Madhav Gogawale

Krishnamurti Paddhati (K.P.) Astrology – An Advanced Stellar System

Astrology is as old as the age of the Vedas. It depends on the position of the planets ascertained astronomically. It explains the celestial phenomena and the corresponding terrestrial events. True meaning of astrology is "message from the stars". By using salient principles of astrology, depending on the positions of planets in the zodiac ascertained astronomically, one can forecast events for the benefit of all.

About Prof.K.S Krishnamurti:

Late Prof. K.S. Krishnamurti (1908-1972) was born near Thanjavur town of Tamil Nadu, India. After finishing his education at St. Joseph's college, Tiruchirapalli, Prof. Krishnamurti entered the service of the Government in the Public Health Department. He studied the Hindu and Western systems of Astrology thoroughly, and found inadequacies and lack of precision of both.. Through his extensive research, Prof. Krishnamurti was able to find the missing links in the existing techniques of prediction and found a unique technique, a Padhhati known by his name, i.e. **Krishnamurti Paddhati of Astrology or KP astrology.** He had developed this technique in order to revolutionize predictions in Astrology. It is a most simple technique to predict an event with high degree of accuracy. He has published many readers and written numerous articles on K.P. astrology in various astrology magazines.

About Krishnamurti Paddhati:

KP Astrology is basically a stellar astrology in which we study *Nakshatras* or Stars and predict an event in one's life based on certain parameters. It is an advanced stellar system or *Nakshatra jyotish paddhati* for the prediction and timing of the events in one's life.

KP Astrology is not very different from Vedic Astrology. The concept of KP system or KP astrology has been derived from Vedic Astrology as well as from Western Astrology. These systems believe in 12 Zodiac Signs, hence KP Astrology also accepts this concept.

Before proceeding towards the principles of KP Astrology, let's first understand the Zodiac divisions followed in KP system:

Zodiac Divisions as per KP Astrology:

Zodiac is an imaginary circular belt in the heavens in which all planets including Sun and Moon apparently move. This zodiac is divided into *Rashis* and *Nakshatras*.

Rashi Division of zodiac: - The zodiac is divided into 12 equal parts of 30 degree each, known as **Zodiac Sign** or ***"Rashi".*** This is known as *Rashi Division* of the 360 degree zodiac. The starting point of the *Rashi Chakra* is considered as 0 degree *Mesha* (Aries), which coincides with 30 degree *Meen* (Pisces).

Nakshatra Division of Zodiac: - In Nakshatra Division system, 360 degree zodiac is divided into 27 equal parts of 13 degree 20 minutes each, known as **Nakshatra or Star**. Each Nakshatra is a group of distant stars. The first *Nakshatra* is *Ashwini* starting from 0 degree *Mesh Rashi* and the last Nakshatra is *Revati* ending at 30 degree *Meen Rashi*.

Prof. Krishnamurti had further divided each nakshatra into 9 unequal subdivisions, known as **"Sub".** Now, these 9 subdivisions of stars hold a real concept of KP Astrology. The rulers or the

planets owning these "Sub" divisions are known as **"Sub Lords"** in KP system. There are total of 249 subdivisions of the zodiac.

Some important principles of KP system:

- Any planet offers the results of the houses signified by its **starlord**, i.e. the ruler of the *Nakshatra* (star) in which that planet is placed. But the final decision, good or bad, success or failure, is indicated by the ruler of the sub-constellation (**sublord**) in which that planet is deposited. This is the most important underlying principle of KP astrology which is unique to this system and is a major deviation from the traditional astrology.
- The cuspal sublords alongwith *Dasha lords* assume greatest importance in KP system for the purpose of predicting whether an event in question will occur nor not.
- *Bhavarambha* (cusp) method has been adopted for casting horoscope.
- Western Yoga system (angular distance between planets) is considered acceptable.
- *'Drishtiyog'* of Vedic astrology system (aspects) is considered acceptable.
- This system offers a unique concept of ***Prashnakundali*** to predict *whether* the event in question will ever happen or not and when it would happen.
- There are well defined rules about which house or group of houses should be considered for analysing a particular question.
- No planet or house *(Bhava)* is completely auspicious or inauspicious.
- House Signification *(karyeshatva)* of the planets in one's horoscope assumes more importance than their nature (causality or *karakatva*).
- Shadow planets *Rahu* and *Ketu* (North and South nodes) assume great importance in this system.
- KP system follows a unique concept of Ruling Planets, i.e. the planets ruling the moment of birth or the moment of casting the prashankundali in KP horary astrology. Ruling planets have a big role in predicting and timing of the events, rectification of birth time etc.
- Sun and moon transits and *Dasha-Antardasha* significations are considered for timing of the events, i.e. to ascertain when the event will take place.

KP horary astrology *(Prashna Jyotish)*:

There are mainly two branches in KP astrology – Natal astrology and horary astrology. Natal astrology is concerned with the life of the native. A chart is made out for the moment of birth and particular place of birth. From such chart, one can broadly read temperament, peculiarities, longevity, fortune, marriage, prosperity or adversity etc. But much depends on the accuracy of recording correct time of birth.

The horary astrology or *Prashna jyotish* is perfect and most useful in answering the queries of the querist. Applying the principles and parameters correctly, the astrologer can offer correct, clear and precise predictions without confusion.

Generally, the queries or the questions are about the current matters confronted by the querist, such as admission to the desired college, recovery from illness, marriage, getting new job, change of job, purchase/sale of property etc. and therefore to give accurate predictions on such queries based on his/her natal chart is not possible. Also, in many cases, correct birth time is not available.

In this system, the astrologer takes the question from the querist and also a number from 1 to 249. Since there are overall 249 subdivisions of the zodiac, each number is associated with one subdivision of the zodiac. The astrologer then casts the *prashnakundali* taking the ascendant corresponding to the given number and the current position of the planets at the time of casting the *prashnakundali.* Then by applying the principles and parameters, the astrologer can accurately predict whether the event is going to take place or not and also the timing of the event.

Some people may argue that the number given by the querist is a matter of chance and he/she could have given any other number. Mr. Krishnamurti explains that the querist cannot give any number other than what he/she has given, because it is based on his/her past karma and the future results he/she is destined to get, just as the birth at particular moment is not a matter of chance but an effect of past karma based on divine law.

Mr. Krishnamurti writes in his 6th reader that "horary astrology is as rational and as scientific as any other branch of astrology and it is the sublime art of foreseeing events from the positions of planets at the moment when the astrologer seriously propounds a question asked by the querist about an important matter."

Astrologer Arvind Bhat

(*Mr.Arvind Bhat is a practicing KP astrologer from Mumbai, India. He also teaches KP astrology online.)*

मोठे बाबा

सत्तर आणि ऐंशीच्या दशकामध्ये, मी मोठी होत असताना, माझ्या लक्षात आले की आपल्या 'पगडी' ह्या आडनावाभोवती एक मानाचे वलय आहे. आणि ते आपले आजोबा पद्मभूषण सेतुमाधवराव पगडी यांच्यामुळे तयार झाले आहे. इतिहासाची त्यांची ज्ञानसाधना, सशोधकाची वृत्ती, अफाट वाचन आणि लेखन आणि उत्कृष्ट वक्ते म्हणून त्यांनी महाराष्ट्र गाजवला. आम्ही नातवंडे त्यांना 'मोठे बाबा' म्हणायचो. आमच्यासाठी ते फक्त आमचे आवडते, रंगवून रंगवून पोटभर गोष्टी सांगणारे आजोबा होते.. पण ते इतिहासावर बरेच लिहितात हे माहिती होते. त्यांचा व्यासंग आणि माणसांचा संग्रह करण्याची आवड, ह्यामुळे आमच्या घरात माणसांची कायम वर्दळ असायची. येणारी माणसे सुद्धा वेगवेगळ्या क्षेत्रातली दिग्गज मंडळी असायची. आणि आजोबांच्या घरात शिरल्यावर, समोर गप्पा मारत कधी पूर्व मुख्यमंत्री वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक, सांगीतकार नौशाद, लोकसत्तेचे सांपादक विद्याधर गोखले, भीमसेन जोशी, दुर्गा भागवत इत्यादी लोक तासचे तास गप्पा आणि चर्चा करत बसलेले असायचे. घरात पैशाची श्रीमंती नव्हती, पण संस्कृतीची श्रीमंती जरूर होती. आल्या गेल्याला, माझी आजी दही पोहे आणि पूड चटणी कालवून द्यायची. कल्पना करा, आज कोणाच्या घरी मुख्यमंत्री, गृहमंत्री किंवा सुरक्षामंत्री स्टीलच्या वाटीतून दही पोहे खात बसतील का??? तो काळच फार गोड आणि साधा होता. आम्हाला सुद्धा येणाऱ्या जाणाऱ्यांची पर्वा नसायची कारण ही मंडळी कोण आहेत आणि किती मोठी आहेत, हे समजण्याचं वय नव्हतं.

एकदा भाषणात पूर्व मुख्यमंत्री अशोक चव्हाण म्हणाले, "माझे वडील शंकरराव चव्हाण गमतीने म्हणायचे, की पगडी आपले जावई आहते बरं का, त्यांना नाराज करायचे नाही!" कारण आज्जीच्या माहेरचे काही नातेवाईक चव्हाणांच्या राजकीय बालेकिल्ल्याच्या भागात राहायचे म्हणे! काय कोणास ठाउक, पण लक्षात आले की ही मंडळी एकमेकांशी खूप आपुलकीने वागायची. त्यात काहीही राजकीय हितसंबंध नव्हते, कारण आजोबांचे मन कायम शिव छत्रपतींच्या पावलांजवळ नतमस्तक होते. त्यांच्याकडे येणारे लोक फक्त त्यांचे ज्ञान, माहिती देण्याची रंजक पद्धत, यामुळे भारावून त्यांच्याकडे यायची. ते IAS ऑफिसर होते आणि मंत्रालयात उच्च पदावर होते, पण शेवटी त्यांनी आवड म्हणून चक्क 'Archives' विभागात बदली करून घेतली जिथे कुठल्याही अधिकाऱ्यांना जायची काडीचीही इच्छा नसायची. तेथूनच ते रिटायर झाले आणि उरलेले संपूर्ण आयुष्य मोगल - मराठा इतिहासाचा अभ्यास करण्यात घालवले.

अत्यंत सचोटीने काम आणि दमडीचा गैरव्यवहार न करण्याची वृत्ती असल्यामुळे, ते निवृत्त झाले तेव्हा ही चांगली माणसे आणि लोकांचे प्रेम, एवढीच त्यांची पुंजी होती. त्यांच्यासाठी ती भरपूर होती. सुदैवाने पेन्शन होते, राहणीमान साधे होते, आणि त्यांच्या मुलाने त्यांना श्रावण बाळासारखे सांभाळले. त्यामुळे त्यांचे उर्वरीत आयुष्य अत्यंत सुखासमाधानात गेले. आयुष्याच्या सुरवातीला विद्यार्थी म्हणून उपाशीपोटी काढलेले दिवस, नंतर निझामाच्या राजवटीत झालेला भयानक मानसिक छळ , अपत्यांचे मृत्यू, मुलींचे वैधव्य, हे सगळे मागे टाकून परमेश्वराने नदान त्यांचे वृद्धापकाळ तरी अतिशय चांगला दिला.

त्यांच्या व्यस्त आयुष्यात देखील त्यांनी आम्हाला नातवंडे म्हणून कायम वेळ दिला. त्यांचे आयुष्य तसे भन्नाट गेले. सांगण्यासारखे अनेक किस्से त्यांच्याकडे कायम असायचे. काही आठवणी अजूनही लक्षात आहेत.

(बऱ्याच गोष्टी मी अतिशय लहान असताना ऐकल्या होत्या, तयामुळे काही तपशील लिहिण्यात माझ्याकडून चूक होणे शक्य आहे. त्याबद्दल आधीच दिलगिरी व्यक्त करून ठेवते!) स्वातंत्र्य पूर्व चळवळींच्या अनेक घटनांना ते साक्षी होते. आजही अंगावर काटा येणारी एक आठवण म्हणजे त्यांनी पाहिलेली चंद्रशेखर आझादांची पोलिसांशी झालेली शेवटची चकमक आणि त्यात त्यांचा मृत्यू! आजोबा अलाहाबाद विद्यापीठात एम ए करत होते. साधारण १९३०-३१ चा काळ असावा. आजोबा लेक्चर अटेंड करण्यासाठी विद्यापीठाच्या दिशेने चालत जात होते. त्यांनी बघितले की एका बागेच्या चोहोबाजूंना पोलिसांनी घेराव घातला होता आणि बंदूक घेऊन नेम धरून होते. आजोबांना एक बुटकासा, काळसर, जाडसर मुलगा दिसला. तो एका झाडामागे लपला होता आणि मध्येच डोकावून तयाच्या हातातले पिस्तूल झाडून मागे जात होता. आजोबा थबकून बघत उभे राहिले. तेव्हा एका पोलिसाने त्यांना हाताने बाजूला होण्याचा इशारा केला. आजोबा वर्गात पोचले. आणि काही मिनिटांच्या आत विद्यार्थी सगळ्या वर्गात घुसून लेक्चर बंद पाडू लागले. "आझाद मारा गया, आझाद पोलीस के साथ फायरींग में मारा गया' असे म्हणून एकच कोलाहल झाला. आणि आता बघितली ती इतिहासात कायमची नोंद होईल अशी घटना होती, हे आजोबांच्या नंतर लक्षात आले. ते ही घटना कधीही विसरले नाहीत.

अलाहाबादच्या आधी, आजोबा बनारस हिंदू विश्व विद्यापीठात होते. तेथून त्यांनी आपली पदवीपर्यंत शिक्षण घेतले होते. परिस्थिती अत्यंत हलाखीची होती, पण अभ्यास करायची जिद्द दांडगी! आजोबा अन्नछत्रात जेवायचे, नाहीतर उपाशी पोटी पाणी पिऊन झोपायचा प्रयत्न करायचे. आयुष्यात त्यांनी पुढे कधीही सणासुदीचे उपास केले नाहीत. तयांचे म्हणणे होते की माझ्या वाट्याचे सगळे उपास मी विद्यार्थी दशेत पूर्ण केले आहेत! आमच्या घरात एक नियम कटाक्षाने पळाला जायचा की प्रतयेकाने पानात वाढलेले निमूटपणे खायचे आणि केलेल्या पदार्थाला कधीही नावे ठेवायची नाहीत. हा दंडक आजोबांनी आणला कारण ते म्हणायचे, मी इतके दिवस भुकेने तडफडत काढले की मला अन्नाच्या प्रत्येक घासाची जाणीव आहे. त्यामुळे आपल्याला अन्न मिळते आहे हीच इतकी मोठी गोष्ट आहे की नावे ठेवणे दूरच राहिले!

ह्या संदर्भात आजोबा त्यांचे जीवश्च कंठश्च मित्र, बाबू जगजीवनराम यांची आठवण काढायचे. जगजीवनराम पुढे काँग्रेसचे मोठे राष्ट्रीय नेते झाले आणि विरोधी पक्षनेते म्हणून तयांनी लोकसभेत काम केले. शिकताना ते आजोबांच्या वर्गात होते. आजोबांच्या लक्षात आले की हा मुलगा तर आपल्याहीपेक्षा दरिद्री दिसतो आहे. बाबू अंग चोरून एकटाच मागच्या बाकावर फाटके कपडे घालून बसायचा. एक दिवस दुपारी घरी जाताना आजोबा त्याच्याशी गप्पा मारत जात होते. मध्येच त्यांना तहान लागली. बांबूची झोपडी वाटेतच होती. आजोबानी त्याला विचारले, तुझ्या घरी जाऊन आपण पाणी पिऊया का?" बाबू काही क्षण गप्प बसला. मग म्हणाला, "मैं अछूत हूँ. तुम मेरे घर पानी पियोगे?" आजोबा म्हणाले, "अर्थात!" आजोबाना घेऊन जगजीवनराम त्यांच्या झोपडीत गेले तेथे फुटलेली मातीची भांडी सोडून काहीही नव्हते. झोपायची सुद्धा व्यवस्था नव्हती. आजोबा घटाघटा फुटक्या खापरीतून पाणी प्याले आणि कृतज्ञ झाले. पुढे बाबूजी उप-पंतप्रधान सुद्धा झाले. आजोबांना आपल्या मित्राचे कायम कौतुक वाटत राहिले.

आजोबा पूजापाठ करायचे नाहीत, पण त्यांची ईश्वरी शक्तीवर प्रचंड भक्ती होती. आपल्यापेक्षा काहीतरी खूप मोठे वरचे आहे, ह्याबद्दल त्यांची खात्री होती. ते अतिशय तर्कनिष्ठ आणि व्यावहारिक होते, पण त्यांचे काही अनुभव विलक्षण होते. त्यामुळे त्यांचा ईश्वरी आणि राक्षसी अशा दोन्ही शक्तींवर विश्वास होता. आपल्याला दिसते त्यापुढे एक जग असते, ह्याबद्दल

तर त्यांची खात्री होती. त्याला कारण असे झाले, की ते एकदा आसिफाबाद मध्ये दौऱ्यावर होते. ते तेलंगाण्यात कलेक्टर होते. कलेक्टर असल्यामुळे शेतकऱ्यांशी बोलणे, गावकऱ्यांची चौकशी करणे, ह्या गोष्टी त्यांना गरजेचे वाटायचे. त्यांना दौरा करण्यासाठी सरकारी गाडी आणि ड्रायव्हर असायचा. एक दिवस प्रवास करताना आजोबा एका देवळापाशी थांबले. दुपारची वेळ होती आणि त्यांनी आपले जेवण बांधून आणले होते.
आजोबा आत बसले. गाडी आणि ड्रायव्हर बाहेर थांबले होते. आजोबांच्या अचानक लक्षात आले की त्यांच्या शेजारी एक शेतकरी म्हणावा असा माणूस बसला होता. आपण आता तर इथे एकटे होतो, मग हा माणूस इथे अचानक असा कसा आला? हा विचार करून आजोबांना नवल वाटले. पण ते त्याचाशी बोलू लागले आणि हवा पाण्याची, शेतीची चौकशी केली. शेतकऱ्याने त्याला भाऊबंदकीचा किती त्रास होतो आहे हे सांगितले.

जिमनीवरून वाद चालू होता. शेतकरी म्हणाला, "साहेब, असाच माझा गळा चिरून मला जमिनीत गाडले आहे हो इथेच! हे बघा, मी दाखवतो." त्याचे हे बोलणे ऐकून आजोबांना भोवळ आली. जाग आली तेव्हा शेतकरी शेजारी नव्हता. आजोबा बाहेर आले आणि ड्रायव्हरला विचारले, "आता इथून कोणी माणूस बाहेर पडला का?" ड्रायव्हरने नकार दिला. देवळातून बाहेर पडायला दुसरे दार नव्हते. हे ऐकून आजोबाना फणफणून ताप भरला. ते ताबडतोब गाडी करून पुढे निघून गेले आणि पुढे ताप उतरायला दोन दिवस लागले. तेव्हापासून आजोबानी कानाला खडा लावला आणि नम्रपणे ठरवले, की आपल्या दिसते आणि समजते, ह्या पलीकडे खूप वेगळे जग आहे. दैवी शक्तीबद्दलचा हाच त्यांचा विश्वास आम्हा सगळ्यांमध्ये उतरला आहे.

इतिहासकार सेतुमाधवराव पगडी यांच्यावर लिहायला लागले तर आठवणींचे खंड तयार होतील. पंडित मदन मोहन मालवीय यांच्याशी त्यांची भेट, रूझवेल्टच्या पत्नींना भेटण्याची संधी, हैद्राबाद पोलीस ऍक्शनच्या आधी कत्तल करणाऱ्या रझाकारांच्या टोळ्यांना चुकवून मध्यरात्री बायको मुलांना घेऊन पळ काढण्याची ती भयानक रात्र, असे अनेक प्रसंग आम्ही त्यांच्याकडून ऐकले आणि मनात साठवून ठेवले. इतिहासकारांच्या तोंडून इतिहासाची पाने उलगडत जाणे आणि आपण जोडीने त्यांचे वाचन करावे, ह्याहून सुखद अनुभव तो दुसरा काय?

वैदेही पगडी - फणसळकर

My Ganapati Bappa and I

Today, I was talking to my friend and sworn brother Abhijeet when we went into our memory lane; our jobs in Pune, bachelor lives, and rental apartments and how we used to celebrate the Ganapati festival.

Maharashtra, Marathi Manus, Mi Marathi!!! Many acquaintances ask me about my native place in India and get surprised. I am married to a Marathi manus and celebrate all Marathi festivals in Maharashtra Mandal Chicago. How's that?

Although I was not born in Maharashtra, but my all loved ones are Marathi and from Maharashtra. My first ever love for a Maharashtrian was Late Lata Didi. Who in the world wouldn't love her voice, simplicity and kind nature! Then, I was always fascinated by city of Mumbai. But after graduation, when it was time to decide the job location, Mumbai was too big for a girl like me. So we decided to pursue my professional career in Pune.

In very first year of my Pune life, I felt like celebrating Ganeshotsav by Ganapati sthapana in my apartment. So many questions came in my mind, how will I perform Sthapana? How will I do puja everyday for 10 days on office days? How will I do Ganesh Visarjan? But as they say when there is a will there is a way. I just decided and started the preparation. I found a good Purohit who performed murti sthapana. I was able to do puja every day. And after 10 days, Abhijeet offered to perform murti Visarjan on my behalf. Since then I never looked back. Every year I welcome Ganapati Bappa and perform all rituals for 10 days.

Even after we moved to USA, that same year, we were very fortunate to perform Ganesh Puja in Bloomington Normal Marathi Mandal as a newly married couple.

I usual hear; once a girl marries, she has to adopt groom's culture. But with me, this was not the case. I can say I first fell in love with Maharashtra, Maharashtrians, hence universe did this conspiracy for me to get married to a Maharashtrian boy.

The best part is that it is cascading to the next generation, our daughter. During her school's Curriculum night, we saw a small Ganesh murti in her school locker. May Vighnaharta remove all the obstacles for her!

Ganapati Bappa Moraya!!

Shipra Athanikar

कविता

चंद्र तोच रहाणार

कवीच्या कवितेतला
प्रेमाच्या प्रतिकातला
लहानग्यांच्या स्वप्नातला
चंद्र तोच रहाणार !

माणसाने त्यावर ठेवला पाय,पाठवले विक्रम लॅन्डर
चालवले जरी प्रज्ञान रोवर
तरी माणसांच्या मनावर त्याचंच अधिराज्य रहाणार
चंद्र तोच रहाणार !

प्रेमाच्या आणाभाकांत
दूर गेलेल्या जवळच्या माणसात
रात्रीच्या गडद अंधारात
करत आपली साथ संगत
चंद्र तोच रहाणार !

विज्ञान त्याचे खड्डे दाखवेल
विषम वातावरण सांगेल
पण मनात वसलेला चांदोबा
कधीच नाही जाणार पुसला
चंद्र तोच रहाणार !!

©अश्विनी कुंटे

मन-अवकाश

अनंत क्षण हे सुंदर पक्षी
फडफड करुनी उडून जाती
रानामधल्या काजळ छाया
मग एकांती कुजबूज करती

मळभ दाटते चहूकडे का
दिशा साऱ्याच झाकोळल्या
दुःख वादळी गडगडले अन्
वेदना विजेसम लखलखल्या

मन अवकाशी सूर्य तळपला
लाखो किरणे त्या आशेची
तरळत जाते इंद्रधनू ते
कमान रेखी मग स्वप्नांची

लाल जांभळ्या भाव वेदना
का आभाळी विस्कटती
कुशीत घेउन नीज शांतवे
चंद्र चांदण्या मग जोजवती

सुख दुःखाचे चक्र चालले
दिवसामागे ये रात्र जशी
खेळ मनाचा अविरत चालू
बघत रहावे होउन साक्षी

श्रद्धा भट

धुसर वाट

आयुष्याची धुसर वाट
खाच खळग्यांची
दगडा मातीची
डोंगर द-यांची
धुकं झालं दाट...

ब्रम्हांडाचा शोध
संपला....
आयुष्याची पानं
उलटत गेली
दुडदुडतं बालपण,
अवखळ किशोरावस्था
उत्साही तरूणपण
प्रगल्भ प्रौढावस्था...

आणि पान स्थिरावलं
वेग मंदावला..
जरावस्था..पान शेवटचं
धुसर वाट
होत गेली
दाट... दाट..

सौ. प्रतिभा जोशी

ओठांमधली गाणी

नाही आपण आशा लता
नाही किशोर रफी
तरीही सहज मन मंदिरी
आलापी घेते सुफी..

गाण्यासाठी नसते वय
नसते कसले बंधन
शब्द गंध सुरावटीतून
अविरत होते मंथन..

गाणे इतके तरल
गाणे कितीक हळवे
सोनसकाळी पांघरावे
जणू सूर्यकिरण कोवळे

नदी किनारी सागरतीरी
निरव, निशब्द शांतता
सहज गीत उमलते
जसे फूल कळीचे होता..

थेंब ,थेंब सरी सरी
नादब्रह्म अनाहत लय
सुरासुरांतून गुंफत जाते
भावविभोर मुग्ध वलय..

डोंगरमाथा , दरीखोऱ्यातून
जसे खळखळणारे पाणी
तशीच सहज अलगद येतात
ओठांमधली गाणी...

हरिनाम

बीज मंजिरीचे
मातीत सहज रुजावे
तैसे हरी नाम जपावे
वाणीत ||

कृष्ण मेघांत जैसे
भरून जल यावे
तैसे हरी नाम झिरपावे
देहात ||

तेजोमय ज्योतीने जैसे
तिमीरास झाकोळावे
तैसे हरी नाम प्रकाशावे
चित्तात ||

कालिंदी भट

झिजविला देह

चंदनाचे खोड
सहाणेवर उगाळले
एव्हढेसे उरले
झिजून॥१॥

झिजविला देह
बनले चंदनाची उटी
देवाच्या ललाटी
विराजले ॥२॥

घरातल्या आजीने
न्हाऊमाखू घातला
बाळ वाढविला
कष्टाने ॥३॥

सुना सांभाळल्या
घराचा कणा बनली
कष्टाने झिजली
सासूबाई. ॥३॥

देशाच्या स्वातंत्र्यास्तव
कारागृही झिजला
प्रज्वलित जाहला
क्रांतीवीर॥४॥

कन्याशाळा उभारण्या
ज्योतीबांनी झिजविला देह
लेकी सुनापण
शिकविल्या ॥५॥

देशाचे अलोट प्रेम
प्राणही पणास लाविले
नाही नमले

परशक्तीपुढे ॥६॥

नित्य झिजवी देह
नांगरता मोठे शेत
सर्वांसी ज्ञात
शेतकरी ॥७॥

संसारासाठी सतत
झिजती मायबाप
कष्ट पोहोचती
देशासाठी॥८॥

ध्येयवेडे मन
खर्ची घाली जीव
तोच जगी अमर
कीर्तीवंत ॥९॥

नीला जोशी

क्षणस्थ

वसंतातल्या सायंकाळी
बसलो असता मागील दारी
रम्य द्दश्य हे पडले डोळा
प्रसन्न सुंदर सृष्टी सोहळा

हिरव्या हिरव्या लांब भुईवर
चमचमणारे थवे काजवे
रंगीबेरंगी फुलझांडातून
बागडणारी फुलपांखरे

ससे धावती इकडुनी तिकडे
शिवाशिवीचे खेळ फाकडे
हिरव्या झाडावरुनी पक्षी
ताना घेउनी संथ फडफडे

आसमंत होता भरलेला
मातीच्या मंद सुगंधाने
क्षितीजावरती पुसटत होता
रंग तांबडा संथपणे

असे वाटले अशा क्षणाला
आनंदातच तृप्त भिजावे
सुंदरतेच्या निर्मात्याचे
नम्र मनाने स्मरण करावे

जयंत बेलसरे

Sketch by Anjali More



शब्दकोडे

उभे शब्द्-

1. वयापरत्वे हे गाठीशी येतात
2. ज्याला भिती वाटते आहे असा
3. ह्या प्रांताची शूर राणी प्रसिद्दध होती
5. एखादी वस्तु किती जड आहे ते मोजणारे यंत्र
6. डोळ्यात
7. रानात
8. लज्जेने बावरत (असलेली)
12. अडखळत
13. अनेक वेळा
14. उसापसून बनणारा गोड पदार्थ
15. माठ
16. ह्या नियतकालिकाकचे नाव!
21. चहुकडे पसरला (सुवास)
23. पूर्ण मास भराचा काळ
24. भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह
25. भौमितिक दृष्ट्या xy-प्रतलातला निश्चित संकलक
26. मिळावा, प्राप्त व्हावा
27. लिपी
31. खेळातील प्रतिस्पर्ध्यांनी आळीपाळीने करण्याच्या क्रिया किंवा काळ, खाद्यपदार्थ वाढण्यास वापरण्यात येणारा एक मोठा चमचा



आडवे शब्द्

1. दुर्घटना
4. रामदासस्वामी हा शब्द ऐकताच लग्नमंडपातून पळाले
7. ओळखीचा फायदा घेणे, ____ लावणे
9. मोठे स्वयंपाकघर
10. (विशेषत: मुसलमान राजांच्या) राण्या व त्यांचा दासी परीवार

11. १९६१ साली ह्या गायकाला महाराष्ट्र शासनाचे पहिले 'सर्वोत्क्रुष्ट मराठी गायक' पारितोषिक मिळाले
13. उत्तर
15. एक शेंग, याच्या दाण्याची उसळ करतात
17. मोठा कालखंड
18. वाहत्या पाण्याचा आवाज
19. एक पेय
20. मुंबईचे एक उपनगर
22. इच्छा
25. बाहेरच्या बाजूला नसलेला
28. मेहेनतीने मिळवलेले
29. अंत:करणापासून दिलेला (निरोप/संदेश/उपदेश)
30. पादत्राणे
32. चांदोबा चांदोबा ___ का?
33. दारूच्या गुत्त्यात पेय देणारी!

संकलन - अभिजित रायरीकर

पाककृती

Falooda

• 1 1/4 cup milk reduced to 1 cup with 2 tablespoons sugar
• 1/4 cup cooked falooda sev
• 2 teaspoons soaked and drained sabja seeds
• Rose jelly cubes/ rooh Afza syrup
• Ice cream
• Chopped nuts
• Cherries

Instructions

• Add 2 tablespoons sugar to 1 1/2 cup milk and simmer for 10 minutes. Cook falooda sev as per package instructions and set aside.
• Chill the milk for an hour or two.
• Soak sabja seeds in water for 1 hour, strain and set aside.
• To layer falooda, chill the glass for 30 minutes.
• First add some soaked sabja seeds. Next add 1/4 cup chilled milk.
• Add sev, jelly and some milk again in layers. You can make as many layers as you want.
• Finally top with some ice cream if using and garnish with nuts. Serve falooda immediately.

Recipe by Chi Town Angat Pangat Food helpers

कटलेट्स - कोणत्याही भाज्यांचे - शॅलो फ्राय ३

साहित्य: फ्रीजमध्ये असतील त्या, असतील तेवढ्या सगळ्या भाज्या. साधारण २ पाऊंड्स. थोड्या कमी जास्त पण चालतील.(गाजर, कोबी, बीटरूट, फरसबी, मटार, कोणत्याही भाज्या)

कोणतीही कंद भाजी- सुरण, रताळ, बटाटा.(सुरण किंवा रताळ उत्तम)

कोणताही मसाला - चाट मसाला,, पावभाजी मसाला, कांदा लसूण मसाला, तंदुरी चिकन मसाला कोणताही असेल तो मसाला.

मैद्याची पाण्यात चालून केलेली पातळ पेस्ट.

रवा किंवा ब्रेड क्रम्ब्स आणि तळायला तेल.

कृती: असतील त्या भाज्या धुवून एका मोठा पातेल्यात ठेवून ते पातेलं कुकरमध्ये ठेवा आणि ३ शिट्ट्या करा. थोड्या वेळाने गरम गरम भाज्या स्मॅश करून त्यात घरात असलेला मसाला घाला, तिखट, मीठ आणि थोडासा लिंबाचा रस घालून हे मिश्रण छान एकत्र करावं. समजा हे मिश्रण सैल वाटलं तर त्यात थोडेसे कोरडे पोहे घालावेत (२ चमचे). पोहे घातल्यावर

मिश्रण लगेच कोरड होतं. ह्या मिश्रणाचे छान ओव्हल शेपचे कटलेट्स करून मैद्याच्या पेस्टमध्ये घोळवून रव्यात किंवा ब्रेड क्रम्ब्समध्ये कोट करावेत आणि मध्यम flame वर हलक्या तेलात दोन्ही बाजूनी खरपूस तळावेत. सगळे अगदी आवडीने खातात.

कांद्याच्या उभ्या चकत्या, टोमॅटो सॉस आणि मस्का लावलेल्या ब्रेड स्लाइस बरोबर सर्व्ह करावेत.

विशेष टिप: बटाटा न वापरता केलेले कटलेट्स, डायबेटिस, कॉलेस्ट्रोल असणाऱ्या मंडळींना पण ताव मारून खाता येतात.

स्वस्थ रहा, मस्त खा!

अपर्णा खळदकर.

Cabbage Kofta Curry

Ingredients	Measure
Green Cabbage (grated)	2 cups
Onion	1 medium size
Tomato	1 medium size
Coriander leaves + Green Chili paste	As per taste
Ginger Garlic paste	1 tsp
Besan (Gram flour)	4 tbsp
Curry Leaves	4-6
Turmeric powder	1/4 tsp
Coriander powder	1/4 tsp
Red chili powder	1/4 tsp
Mustard seeds	1/4 tsp
Asafetida	1/4 tsp
Garam Masala	1/4 tsp
Salt	As per taste
Oil	1 tbsp
Water	2 cups

Method:

Kofta Balls-

1. Grate green cabbage and squeeze the water completely from it.
2. Add 2 tbsp besan, turmeric powder, coriander powder, red chili powder and salt and mix well with grated cabbage.
3. Make small kofta balls to fit into Appe pan.
   IMP Tip: As we add the salt in grated cabbage, the mixture will release water and it may become soggy. So, fry or cook the balls immediately.

- Spray oil on appe pan and put the kofta balls in it. Cover the lid and allow them to cook for 3-4 min and flip the balls. Cook them until golden brown.

- If appe pan is not available, you can deep fry the kofta balls until golden brown.

Curry

1. Make a paste of onion, tomato, coriander-green chili paste and ginger garlic paste. Add water as needed.
2. Heat oil in a pan.
3. Once the oil is hot, add mustard seeds, asafetida, curry leaves.
4. Once seeds start spluttering, add 2 tbsp besan. Roast besan for a few seconds.
5. Add the curry paste and mix it well with besan. Cover the lid and let it cook for 10-15 min.
6. Once the oil starts separating, add water. Cover the lid and let it cook again for 10 min to get thicker consistency.
7. Add kofta balls in curry and serve hot.

Shipra Athanikar

Rice Fara

Ingredients	Measure
Cooked rice	2 cups
Rice flour	1.5 cups
Tomato	1 medium size
Onion	1 medium size
Green Chili	2 - chopped
Red Chili	1 whole
Curry Leaves	3-4
Coriander leaves	For garnishing
Sesame seeds	1/4 tsp
Mustard seeds	1/4 tsp
Asafoetida	1/4 tsp
Turmeric powder	1/4 tsp
Salt	As per taste

Method:

1. In a mixing bowl, mash cooked rice (new or left over) well.
2. Add rice flour in the bowl and knead well. Add water if required and make a soft but firm dough. Keep the dough aside for 15 min.
3. Grease some oil on palms and make thick cylindrical 'French Fries' like shapes.
4. In a pan, heat the oil. Add mustard seeds, sesame seeds, asafoetida, curry leaves, whole red chili, and chopped green chili. For kids, you may exclude red chili and green chilies.
5. Add finely chopped onion and tomato in the pan and sauté for 3-4 min. Add turmeric powder. For mild spice version kids, you may exclude this step.
6. Add salt to taste. Then add 1 cup water in the pan.
7. When water comes to a boil, add rice fara (cylindrical shapes) in the pan. Cover the lid and let it cook for 8-10 min in medium flame or until fara is cooked.
8. Garnish with chopped coriander leaves.

Shipra Athanikar

स्वानुभव

महाराष्ट्र मंडळ शिकागोचा पाच किलोमीटर धावणे वा चालणे स्पर्धा उपक्रम- एक ऐतिहासिक घटना

ह्यावर्षी महाराष्ट्र मंडळ शिकागो कार्यकारिणीने जागतिक पितृदिनाच्या (Father's Day) दिवशी प्रथमच पाच किलोमीटर (5K) धावण्याची/चालण्याची स्पर्धा आयोजित करून आणखी एक मानाचा तुरा मंडळाच्या शिरपेचात खोवला. 'महाराष्ट्र मंडळ शिकागो'च्या कार्यकारिणीने गेल्या अडीच वर्षांपासून, वर्षातून फक्त चार-पाच नाटके किंवा गायन यासारखे नेहमीचे कार्यक्रम करण्याच्या ठराविक साच्यातून बाहेर पडत वीसपेक्षा अधिक वेगवेगळे उपक्रम मराठी समाजासाठी सुरू केले आहेत. त्यातच या अभिनव उपक्रमाची भर पडली. या उपक्रमाचे हे पहिलेच वर्ष असूनही त्याला भरपूर प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे यात इतर अमराठी मंडळे व स्थानिक अमेरिकन लोकसुद्धा सहभागी झाले होते, हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते. हीच महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या उपक्रमांच्या यशस्वितेची खरी पोच पावती होती.

महाराष्ट्र मंडळ शिकागो केवळ मराठी लोकांसाठीच आहे असे नाही तर सर्वांनाच आपल्या मराठी संस्कृतीची ओळख करून देत आहे व अमेरीकन समाजात आपला ठसा उमटवत आहे.
रविवारी सकाळी, उत्साहवर्धक हवामानात 'बसे वुडज् पार्क - रोलिंग मेडोज'च्या (Busse Woods Park - Rolling Meadows) भव्य धावपट्टीवर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. शिकागो परिसरातील सर्व लोकांसाठी ही स्पर्धा खुली होती. मंडळाच्या या पहिल्या वहिल्या स्पर्धेत शंभराहून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला. स्पर्धेच्या आयोजनासाठी आणि तयारीसाठी विशाल नवलकर व त्यांच्या चमूने कित्येक आठवडे आधीपासून खूप मेहनत घेतली होती. स्पर्धेसाठी भव्य मोठी जागा निवडणे, शहर व सार्वजनिक उद्यानाची (park district) परवानगी घेणे, परिपत्रक तयार करणे, निमंत्रणे पाठविणे, स्पर्धेसाठी प्रायोजक (स्पॉन्सर) मिळविणे, स्पर्धकांची नोंदणी करणे, जलपान, नाश्ता व खाण्याची व्यवस्था करणे, स्पर्धकांसाठी पदके (मेडल्स), प्रत्येक गटातील विजेत्यांसाठी करंडक व पारितोषक चषक (Trophies) आणणे, या कार्यक्रमानिमित्त वाटल्या जाणाऱ्या खास शर्टांची आकर्षक रचना (डिझाइन) करणे, स्पर्धेदरम्यान सर्वांची देखभाल करणे अशा अनेक बारीक-सारीक गोष्टींची त्यांनी सुंदर व्यवस्था केली होती.

स्पर्धेच्या दिवशी स्पर्धकांना खास भारतातून मागविलेले टी-शर्ट व त्यावर लावण्यासाठी मोठे ठळक अक्षरातले स्पर्धक क्रमांक दिले गेले. ज्या ठिकाणी स्पर्धा सुरू होणार होती तेथे प्रायोजक, स्वयंसेवक आणि आयोजक जमले होते. जर स्पर्धेदरम्यान कोणाला शारीरिक इजा झाली, तर प्रथमोपचारासाठी फिजिओथेरपिस्ट देखील तेथे उपस्थित होते.

स्पर्धेचे नियम व इतर सूचना दिल्यावर कधी एकदा स्पर्धा सुरू होते याची सर्वजण आतुरतेने वाट पाहत होते. मंडळाच्या सजावट चमूने सुंदर व आकर्षक असा फलक (Board) तयार केला होता. बहुतेक सर्व स्पर्धक आपले फोटो त्या फलकासमोर काढत होते.
या प्रसंगी बालमित्रांनी छान राष्ट्रगीते म्हंटली. अमेरिका व भारताचे राष्ट्रगीत झाल्यावर स्पर्धा सुरू झाली. "गेट... सेट... रेडी" असा स्पर्धा सुरू होण्याचा हुकूम आयोजकांकडून मिळताच दहा वर्षांच्या बालकांपासून ते सत्तर वर्षे वयापर्यंतच्या स्पर्धकांनी धावण्यास अगर चालण्यास सुरुवात केली. त्यात काही मुरलेले, मॅरेथॉन स्पर्धेत भाग घेतलेले अनुभवी स्पर्धकही होते. धावपट्टीवर काही ठिकाणी जलपान व शीतपेयांची सोय

केली होती. प्रेक्षक टाळ्या वाजवून स्पर्धकांना प्रोत्साहन देत होते.
आपापल्या शारीरिक क्षमतेप्रमाणे सर्व स्पर्धक धावत किंवा चालत होते. ज्या ठिकाणी स्पर्धा संपते त्या ठिकाणी अनेक प्रेक्षक व आयोजक आनंदाने जल्लोष करत त्या सर्व स्पर्धकांचे कौतुक करत होते. प्रत्येकाला अखेरची रेषा ओलांडण्यासाठी खास दोरी लावली जात होती. प्रत्येक स्पर्धक ती रेषा ओलांडण्याचा आनंद घेत होते. पाच किलोमीटर पूर्ण केल्यानंतर प्रत्येकाला खास बनविलेले पदक देण्यात येत होते. दमलेल्या स्पर्धकांसाठी खास शीतपेये, फळे व इतर पदार्थ अल्पोपहार म्हणून ठेवले होते.

अडीच वर्षापासून मंडळाचा कुठलाही कार्यक्रम असला तरी त्यात सगळे आयोजक खेळीमेळीने एकमेकांची चेष्टामस्करी करत आनंदी वातावरणात कार्यक्रम साजरे करतात. हा कार्यक्रम पण त्याला अपवाद नव्हता. सजावटीचा चमू आणि खाद्यपदार्थांचे प्रायोजक देखील स्पर्धेच्या आनंदी वातावरणात सहभागी झाले होते. शेवटच्या स्पर्धकाने स्पर्धा पूर्ण केल्यानंतर ज्याची सर्वजण वाट पाहत होते तो बक्षीस वितरणाचा कार्यक्रम सुरू झाला. मंडळाचे अध्यक्ष प्रसाद अथणीकर व मुख्य आयोजक विशाल नवलकर आणि चमू यांनी प्रायोजकांना धन्यवाद दिले, आणि त्यांना आपल्या उपक्रमाबद्दल माहिती देण्यास सांगितले. एकल विद्यालयाचे ज्येष्ठ स्वयंसेवक व विभागीय अध्यक्ष डॉक्टर निशेंदु बक्षी यांच्या हस्ते स्पर्धेच्या वेगवेगळ्या गटातील विजेत्यांना पारितोषके व चषक देण्यात आले. या प्रसंगाला उत्साहवर्धक संगीताची साथ होती. एकंदरीत वातावरण अगदी जल्लोषमय झाले होते.

यशस्वी विजेते स्पर्धकांची नावे:

१८ वर्षाखालील युवा गट - अजय विरामिथु
१९ ते ६० वर्षे पुरुष गट - विरामिथु करूप्पूसामी
६० वर्षेवरील पुरुष गट - माधव ना.गोगावले
१८ वर्षाखालील युवती गट- धितिक्षा
१९ ते ६० वर्षे महिला गट - रत्नांगी निलेश मालपेकर
६० वर्षेवरील महिला गट - ज्योती माधव गोगावले

बक्षीस वितरण समारंभानंतर सर्व स्पर्धक व स्वयंसेवकांनी पिझ्झा, चहा, शीतपेये आणि फळांचा आस्वाद घेत परस्परांशी संवाद साधला. या स्पर्धेसाठी एकल विद्यालयाचे स्वयंसेवक, अन्य तीन संस्थांचे प्रायोजक, महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य आणि स्वयंसेवक सभासदांनी वेगवेगळ्या आघाड्यांवर केलेल्या मदतीमुळे, महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या इतिहासातील हा पहिला वहिला कार्यक्रम यशस्वी होण्यास मोलाची मदत झाली.
जागतिक पितृदिन (फादर्स डे), मस्त आल्हाददायक हवामान, उन्हाळ्याची सुट्टी अशा अनेक गोष्टींमुळे

स्पर्धेतील विजेते

कार्यक्रमास कितपत प्रतिसाद मिळेल, अशी आयोजकांना काळजी लागली होती, परंतु शुभ संकल्प, सर्व कार्यकर्त्यांची सकारात्मक वागणूक, लागेल तेथे झटून कामे करत मनापासून एकमेकांना मदत करण्याची प्रवृत्ती

स्पर्धेतील वेगवेगळ्या गटातील विजेते

या सगळ्या सकारात्मक गोष्टींमुळे शंभराहून अधिक स्पर्धकांची पाच किलोमीटर धावणे वा चालण्याची ही स्पर्धा यशस्वीरीत्या धूमधडाक्यात पार पडली.



माधव ना. गोगावले

महाराष्ट्र मंडळ शिकागो-पिकनिक

सोनसळी ऊन, गर्द वनराई, सुखद हवा आणि हिरवळीवर रंगलेला मेळावा.....अगदी सोन्यासारखा म्हणावा असा दिवस होता, महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या वार्षिक पिकनिकचा! आदल्यादिवशी चक्रीवादळ येऊन गेलं होतं त्यामुळे हवामानाचा अंदाज चुकवून अचानक पाऊस किंवा वादळ येईल की काय ही धाकधूक होतीच. पण निसर्गाने साथ दिली आणि दिवसभर असंच सुंदर, सुखद वातावरण टिकलं.

सकाळी लवकर येऊन सर्व volunteers नी सगळी तयारी केली होती. नाश्ता, चहा कॉफीची जय्यत तयारी होती. Registration च्या टेबलाच्या बाजूला हिरवळीवर 'चमक धमक' टीमने खूप सुंदर आणि कल्पक प्रॉप्स उभे केले होते. एका बाजूला शिवाजी महाराजांचे पोस्टर लावले होते. २६ ऑगस्टला होणाऱ्या सोहोळ्यात महाराजांच्या मूर्तीची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी निधी गोळा करण्यासाठी निरनिराळी रोपे आणली गेली होती. बघता बघता ही सर्व रोपे मंडळातल्या सदस्यांनी घेतलीसुद्धा!

मोठमोठ्या गर्द हिरव्या झाडांनी परिसर वेढला होता. थोडं आत गेल्यावर काही उतरत्या छपरांची सुबक shelters होती. एका मोट्ठ्या, हिरवळीने व्यापलेल्या जागेला एका बाजूने pergola आणि खुली shelters यांच्या रचनेने वेढलं होतं. फरसबंदी चौरसाकृती जागा, त्यावर पिकनिक बेंच,आणि वर सुंदर उतरते छत अशी सुबक shelters उंच, हिरव्या झाडांच्या पार्श्वभूमीवर शोभून दिसत होती. निसर्गाच्या सौन्दर्याला compliment देत चार shelters जोडणाऱ्या चौकामध्ये एक सुंदर Sculpture असलेला कारंजा होता. त्यातलं उसळणारं पाणी जणूकाही सगळ्यांच्या उत्साहाचं प्रतीकच होतं. एका बाजूला पक्की Shelters तर दुसऱ्या बाजूला एक तंबू ठोकला होता. जिथे म्युझिक सिस्टिम आणि ढोल-ताशाचे सामान होते. अलीकडील बाजूला किचनचं शेल्टर, पलीकडील बाजूला खेळ घेण्यासाठी जागा. अशा चहुबाजूनी वेढल्या गेलेल्या हिरवळीवर मंडळी गप्पा मारत उभी होती.

सगळे volunteers आनंदाने मंडळींचे स्वागत करत होते. फूड टीमने अतिशय चविष्ट नाश्त्याची सोया केली होती. चहा, कॉफीचा आस्वाद घेत घेत सगळेजण त्या निसर्गरम्य ठिकाणी पिकनिकचा आनंद लुटत होते. काहीवेळाने युथ टीम मधील मुलांनी अमेरिकन आणि भारतीय राष्ट्रगीते गायली. त्याचा मान राखत सर्वजण उभे राहून त्यांना सामील होत राष्ट्रगीत गात होते. बऱ्याचजणांना यावेळी आपले शाळेचे दिवस आठवले असतील.

पुढील कार्यक्रमाच्या तयारीसाठी 'चमक धमक' टीम आणि फूड टीम झटत होती. सर्व कार्यकर्त्यांची लगबग, आलेल्यांच्या गप्पा यामुळे वातावरण खूप उत्साही झालं होतं. 'आम्ही सारे गवय्ये' टीमने एका तंबूत म्युझिक सिस्टीमची व्यवस्था केली होती. काहीवेळाने 'आम्ही सारे गवय्ये' मधील मंडळींनी एकामागोमाग कॅरिओके वर धमाल गाणी गायला सुरुवात केली. बऱ्याचजणांनी यात उत्स्फूर्तपणे भाग घेत गाणी गायली. नकळत अनेकांची पावले त्या गाण्याच्या तालावर पडायला लागली. सर्वजण त्या तंबूसमोर गाण्याच्या तालावर उत्स्फूर्तपणे नाचत होती. Volunteers सुद्धा आपल्या कामात break घ्यायची संधी मिळाली की मधून मधून यामध्ये भाग घेत होते.

जेंव्हा आयोजकांनी गेम्सची तयारी सुरु केली तेंव्हा सगळ्या वयोगटातल्या सदस्यांनी खूप उत्साहाने त्यात भाग घेतला. एकमेकांना प्रोत्साहन देत हसत खेळत सगळे खेळ मजेत पार पडले. अगदी मॅचच्या वेळी असते तसे वातावरण होते. पिकनिक आणि गेम्स हे समीकरण नेहेमी धमाल आणते हेच खरं.

फूड टीम आणि 'Chi town अंगत पंगत' टीमने 'Masterchef' ही एक अभिनव live पाककृती तयार करण्याची स्पर्धा आयोजित केली आहे. त्याची पात्रता फेरी या पिकनिकमध्ये होती त्यात सदस्यांना 'बटाटा' हा घटक वापरुन एखादी चविष्ट पाककृती तयार करून आणायला सांगितली होती. परीक्षक आलेल्या पाककृती चाखून 'Master Chef'च्या पुढच्या फेरीत त्यांचा प्रवेश झाला की नाही हे ठरवणार होते. ज्या पाककृती यासाठी आल्या होत्या त्या कल्पक आणि अभिनव होत्या. आनंदाची गोष्ट म्हणजे या सगळ्या पाककृती परिक्षकांच्या पसंतीस उतरल्या आणि अंतिम फेरीसाठी पात्र ठरल्या. निकाल जाहीर झाल्यावर सगळ्यांनी टाळ्या वाजवून स्पर्धकांचे अभिनंदन आणि कौतुक केले.

एका शेल्टरमध्ये रानमेवा म्हणून एक कल्पक snack दिल्या जात होता. या रानमेव्यात चिंचा, कैरी, काकड्या अशा खास भारतातल्या उन्हाळ्यातल्या खाऊंचा समावेश होता. संगीत, नृत्य, खेळ यासगळ्यामध्ये वेळ कसा गेला कळलेच नाही आणि जेवणाची वेळ झाली. अगदी व्यवस्थितपणे volunteers नी एवढ्या मोठ्या संख्येने आलेल्यांची व्यवस्था केली. पदार्थ अगदी चविष्ट होते आणि फूड टीमचे volunteers अगदी सुहास्यवदनाने सर्वांना वाढत होते. मोकळ्या हवेत, निसर्गरम्य परिसरात, इतके चविष्ट पदार्थ सगळ्यांशी हसत खेळत, गप्पा मारत खाणे हा खूप आनंदाचा अनुभव होता.

जेवणानंतर स्वादिष्ट फालुदा देण्यात आला. त्याचा आस्वाद घेत सभोवताली चाललेल्या कार्यक्रमाचा आनंद सदस्य लुटत होते.

पोटभर जेऊन तृप्त आणि ताजेतवाने झाल्यावर 'आम्ही सारे गवय्ये' टीमनी पुन्हा एकदा ज्यावर पाय थिरकायला लागतील असं संगीत सुरु केलं. आणि बघता बघता 'ढीपाडी ढिपांग' टीम मधल्या सदस्यांनी समोरच्या मोकळ्या जागेत 'फ्लॅश मॉब' डान्स सुरु केला. सगळ्यांचं लक्ष त्या सुनियोजित आणि तालबद्ध अशा डान्सने वेधून घेतलं. बरेचजण उत्स्फूर्तपणे त्यांना सामील झाले. काहीजणांनी तिथे ट्रेंडिंग गाण्यावर नाचून रील्ससुद्धा बनवले.

यावेळी आधी झालेल्या खेळांमध्ये जे अंतिम फेरीत पोहोचले होते त्यांचे कौतुक करून त्यांना बक्षिसं देण्यात आली.

यानंतर 'साहित्यकट्टा' आणि 'आम्ही सारे गवय्ये' तर्फे एक आगळा वेगळा कार्यक्रम सादर झाला. २०२१ मध्येसुद्धा पिकनिक मध्ये 'साहित्यकट्टा'चा कार्यक्रम झाला होता त्याची बऱ्याचजणांनी आठवण काढली. यावेळी 'साहित्यकट्टा'ला भारतातून आलेले प्रथितयश पाहुणे लाभले होते. प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक आशिष मुजुमदार यांनी बऱ्याच चित्रपटातील व इतर प्रसिद्ध गाण्यांचे संगीत दिग्दर्शन आणि नियोजन केले आहे. महाराष्ट्रात गाजत असलेल्या 'सोबतीचा करार' या कार्यक्रमात वैभव जोशींच्या रचनांना त्यांनी संगीत दिले आहे. गझल हा त्यांचा आवडता संगीतप्रकार असल्यामुळे त्यांचा गझलचा बराच अभ्यास आहे. त्यांनी 'आशयाना गझल' हा कार्यक्रम सादर केला. त्यात त्यांनी गझलची सौंदर्यस्थळे उलगडून दाखविली. नवीन मराठी गझल, त्यातील बारकावे आणि ती गातांना काय महत्वाचे

आहे हे त्यांनी रसिकांना प्रात्यक्षिकासह दाखवले. हा कार्यक्रम खूप दर्जेदार आणि रंजक होता. दर्दी रसिकांची दाद घेत हा कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमानंतर बरेचजण पाहुण्यांशी बोलत आणि त्यांच्याबरोबर फोटो घेत थांबले. एकाबाजूला फूड टीम सर्वांना कलिंगड आणि भेळ देत होती. आणि एकदम ढोल ताशाच्या आवाजाने परिसर दुमदुमून उठला. एकंदरच वातावरणात जल्लोष होता. ढोल ताशा आणि लेझीमचे खूप जोशपूर्ण सादरीकरण झाले.

ढोल ताशाचा स्वर कानात घुमत असतांनाच हळू हळू कार्यकर्त्यांची आवराआवर सुरु झाली. सदस्य आणि volunteers पुन्हा एकदा सेल्फी, ग्रुप फोटो घेत एकमेकांचा निरोप घेऊ लागले. अतिशय सुंदर आणि उत्साही दिवसाची, धमाल पिकनिकची अशा रितीने एका आनंदी 'नोट'वर सांगता झाली. महाराष्ट्र मंडळ शिकागोचे विविध कट्टे आणि ग्रुप्स या पिकनिक निमित्त एकत्र आले. या वेगवेगळ्या ग्रुपमधल्या volunteers नी मिळून मिसळून एकमेकांना सहकार्य करत ही पिकनिक यशस्वी केली. सर्व सदस्यांसाठी आणि volunteers साठी हा दिवस भन्नाट, आनंदाचा आणि आठवणीत राहील असा ठरला असे म्हणायला हरकत नाही.

श्रद्धा भट

असं म्हणतात की एखादी संस्कृती खऱ्याअर्थाने जपायची असेल तर त्या संस्कृतीतल्या पाककला, साहित्य, कला, संगीत आणि नृत्य इत्यादींची जपणूक करावी. या पिकनिकच्या निमित्ताने महाराष्ट्र मंडळ शिकागोने हे कार्य ते कसे समर्थपणे करत आहे याची झलक दाखविली हे निश्चितच!

MMC Master Chef Cooking Competition

Namaskar Mandali!

Last Sunday, on 23rd July 2023, we all witnessed our first ever Master Chef cooking competition. In spite of being the first time, it was a highly appreciated and successful event. We had six finalists and everyone got prizes for their cooking skills and awesome dishes. Big thank you to *Quicklly* and their team for sponsoring the ingredients for this competition.

We have winners of our first MMC Master Chef competition. Thank you Rekhatai Deodhar, Samar Jain and Aparna Khaladkar for carrying the complex and heavy load of judging the awesome dishes and coming up with the prize winners.

Winner: Pallavi Patil
1st Runner Up: Ulka Nagarkar
2nd Runner Up: Vidya Shinde
Grocery Gift Hampers: Madhuri Parhad, Kabori Patil, Vidyatai Kasture.
Congratulations to all the winners!!
Behind this successful Master Chef event, it was a team of tireless organizers and volunteers. Thanks to Shipra Athanikar for ideating this new kind of event for MMC. Thanks to Pradnya Joglekar, Aparna Khaladkar and Manisha Pandit for ably supporting, brainstorming and planning this Event. Thanks to Urmila Damle, Manisha Pandit and Sameer Kulkarni to navigate the

Event with their emcee script and skills. Thanks to Ashwini Kunte and Pallavi Betsur for assisting all the chefs during this competition.

Thanks to Bhaskar Shedage, Usha Shedage, Priyesh Deshpande, Sheetal Deshpande, Bhagwat Shinde, Manoj Joshi, Ashish Nagarkar, Mandar Joglekar, Manoj Kunte, Pallavi Betsur and Aryan Joglekar to setup the venue with tent, canopy, sound system and videography. Thanks to Shipra Athanikar and Aparna Khaladkar to pick up the snacks and tea for everyone. Thanks to Rajesh Hatkar for managing the finances for this event and sponsorship with *Quicklly*.

Thanks to Ratnangi Malpekar, Sameer Bongale, Sheetal Deshpande, Manoj Joshi, Pradnya Joglekar and Ulka Nagarkar to represent 2023 Executive Committee members and Trustees, friends and family members attending and cheering for the contestants during the event.

I want to give a special shout out for Madhuri Parhad and Pallavi Patil to believe in the concept and be the first participants

for the Qualification Round at the MMC Picnic. They encouraged other members to participate in the event via Wild Card Entries.

Warm Regards,

Prasad Athanikar

MMC Nrityangan

Hello Everyone!!

On Sunday, we had another success story written for MMC. Our own Ketki Deshpande came up with the idea of *Nrutyangan*, an in person Dance show: first time in Mandal and what a way to start it! We had almost 15+ dancers to perform on different dance forms, themes and styles. We had some wonderful youth dancers too. Although we missed male dancers this time, but the ladies and girls were so awesome that I am sure that the men and boys will surely participate next time. Our Chief Guest, Mrs. Sheetal Dhanani, had all praise for the dancers and their choreography.

Thank you Swati Rayarikar to provide important helping hand, backstage.

Thank you Sameer Bongale to book the cozy and compact facility for our first show.

Thank you Pradnya Joglekar, Rajesh Hatkar and his sister Shipla Pitale, Sheetal Deshpande, Prajakta Joshi to handle the food serving after the show.

Thank you Mitesh Kambli and Ratnangi Malpekar to handle photography and videography for the event.

Thank you Manoj Joshi to handle sound and lights for the event. He is a pro now.

Thank you Rajesh Hatkar and Shipra Athanikar to manage registration for the event. Thank you Priyesh Deshpande to manage online ticketing system.

Overall it was a successful event!! Kudos to all dancers and volunteers!! Hope to see you all in the next event.

Warm Regards,

Prasad Athanikar

मंडळाच्या ज्येष्ठ नागरिकांचे स्नेहसंमेलन

स्नेहसंमेलन म्हटले की जुने स्नेही बऱ्याच कालावधी नंतर एकत्र येतात, नवीन मित्र- मैत्रिणी मिळतात, गाठीभेटी होतात आणि सहाजिकच आनंद लुटता येतो. तसाच अनुभव अनेकांना त्यादिवशी आला. महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या ज्येष्ठ नागरिकांचा (MMC Forever Young Group) पहिला वहिला स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम १२ ऑगस्ट, २०२३ रोजी मौज मस्तीत पार पडला.

५५ पेक्षा जास्त सदस्यांनी त्यासाठी नावनोंदणी केली होती. कदाचित कमी लोक येतील असे आयोजकांना सुरुवातीला वाटले होते परंतु ज्येष्ठ नागरिकांच्या सक्रिय सहभागाने सर्वांनाच चकित केले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश खूप वर्षानंतर अनेकांच्या भेटी-गाठी घडवून आणणे हा होता.

खास भारतातून तयार करून आणलेले कोस्टर संमेलनाला आलेल्यांची नोंदणी करताना दिले जात होते. नावनोंदणी नंतर आयोजकांनी सजविलेल्या आकर्षक फोटोबूथमध्ये फोटो काढून प्रत्येकजण इतर जेष्ठ नागरिकांच्या बरोबर गप्पागोष्टीत रंगून गेले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आपापली थोडक्यात ओळख करून देतांना सर्वांनी 'आपण भारतातून अमेरिकेत कधी आलो, अमेरिकेतील आपला विशेष अनुभव आणि भारतातील कोणत्या गोष्टीची उणीव भासते' याबाबत सांगितले.

जेवणासाठी हरडा पार्टीत असतो तसा खास खमंग मराठी भोजनाचा बेत होता. ज्वारी व बाजरीच्या मऊ भाकरी, वांग्याचे भरीत, कढी भात, मिरचीचा ठेचा, पापड, काकडीची कोशिंबीर आणि खीर याचा सर्वांनी मिटक्या मारत आस्वाद घेतला.

जेवणानंतर काही गमतीचे खेळ सुरू झाले. जणू काही पुन्हा एकदा आपल्यातील बाल्य जागृत झाले आहे असे.

सर्वांना यावेळी वाटले. महिला विरुद्ध पुरुष असे गट करून प्रत्येकाने गाण्यांच्या अंताक्षरीत हिरीरीने भाग घेऊन, भान विसरून त्याचा मनमुराद आनंद लुटला.

'संगीत चेंडू' या मजेदार खेळात संगीत थांबल्यावर आपल्या हातात चेंडू राहू नये अशी प्रत्येकजण कसोशीने काळजी घेत होता. ज्याच्या हातात संगीत थांबल्यावर चेंडू राहील ती व्यक्ती खास जुन्या काळातील मराठी उखाणे घेत होती. त्यात कितीतरी नवे-जुने उखाणे ऐकण्यास मिळाले.

दुपारचा चहा व नाश्ता झाल्यावर मनोरंजनाचा कार्यक्रम झाला. त्यात काही जणांनी आवडीची गीते सादर केली, महाराष्ट्र मंडळावर केलेला पोवाडा गायला आणि काही चुटकुले सांगितले. महाराष्ट्र मंडळाच्या 'आम्ही सारे गवय्ये' या समूहातील गायकांनी खास

१९६० - ७० च्या दशकातील प्रसिद्ध गाणी गाऊन सर्व श्रोत्यांना त्यांच्या आठवणीतल्या त्या काळात नेले. अगदी अमिन सयानी सारखे निवेदन करत एक एका कलाकाराने अतिशय मधुर आवाजात गाणी गायली.

छान अशा मैफिलीने कार्यक्रमाची सांगता झाली. नंतर या कार्यक्रमाबाबत अनेकांनी आपल्या सुंदर प्रतिक्रिया दिल्या. असा कार्यक्रम महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीने वर्षातून एकदा तरी 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन (World Senior Citizens' Day)'

याच्या जवळपास करावा असे आवर्जून सांगितले गेले.



माधव ना. गोगावले

MMC मंगळागौर

MMC 2023 मंगळागौर

२९ ऑगस्टच्या मंगळवारी जमल्या MMC च्या मैत्रिणी,
खेळू या, नाचू या, आणि गाऊ या मिळून गाणी!

योग आलाय २०२३ची मंगळागौर साजरी करायचा,
श्वेता, मनीषा, भाग्यश्री, अश्विनीने विडा उचलला सर्वांना आनंद द्यायचा!

खूप केली तयारी, venue सुद्धा ठरला,
कारण एकच ध्यास त्यांना, सर्वांना एकत्र आणायचा!

कारपूल ची लिस्ट मोठी, लाटणे, sunglasses, तांब्या, सुपाची यादी,
नटणार, सजणार, नऊवारी नेसणार, नथ घालून मिरवणार,
आज आम्ही साऱ्या जणी.

मस्त आहे बेत, उसळ, भाजी, मसालेभात, शिरा, आणि चहाचा,
या सर्व सुगरण 'अन्नपूर्णांना', नमस्कार आम्हां सर्वांचा!

आज खेळणार आम्ही मंगळागौरीचे special खेळ,
बघता बघता कळणार नाही कसा गेला वेळ

एकच मागणं देवीला, राहू देत ही अशी नाती,
एकमेकींवर विश्वास आणि प्रेम, हीच आमची ख्याती!

रत्नांगी निलेश मालपेकर

'एका लग्नाची पुढची गोष्ट' - अनुभव

काल आम्ही प्रशांत दामले आणि कविता लाड यांचं "एका लग्नाची पुढची गोष्ट" हे नाटक शिकागो येथे पाहिलं. खरंतर जेव्हापासून या नाटकाची तिकिटं काढली होती तेव्हापासूनच मन २० वर्ष मागे गेलं होतं. काल आम्ही पुन्हा तेच मॅजिक अनुभवलं. शाळा-कॉलेजमध्ये असताना आपल्यापैकी अनेकजण नाटकात काम करतात. आपण मराठी भाषा शिकतो आणि मग त्यातच व्यक्त होतो. पुढे काही कारणाने आपण देशापासून लांब राहतो आणि हळू हळू सगळी मराठी नाटकं पाहण्यापासून वंचित राहतो. पण मला जगभरातल्या मराठी मंडळांचे आवर्जून कौतुक करावेसे वाटते. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि आपल्या लाडक्या मराठी रंगकर्मींमुळे भारताबाहेर राहूनही अनेक मराठी नाट्यरसिकांची इच्छा पूर्ण होते.

'एका लग्नाची गोष्ट' हे नाटक पाहून खूप मोठा काळ निघून गेला. पण आमच्या मनात मात्र अजूनही तीच अवखळ हसणारी मनी आणि तोच 'ती परी अस्मानीची' हे रोमँटिक गाणं म्हणणारा मन्या आहे. प्रशांत दामले आणि कविता लाड यांच्या ऑनस्टेज केमिस्ट्रीपुढे शाहरुख खान आणि काजोल यांची ऑनस्क्रीन जोडीही फिकी पडेल. या दोघांचा या वयातला फिटनेस कितीतरी तरुण मुला-मुलींना लाजवेल.

आम्ही जसे दर्जेदार नाटकांमुळे घडत गेलो तशीच आमची पुढची पिढी घडेल का? असा प्रश्न मला नेहमी पडायचा. एक आठवडा आधीपासून प्रशांत दामले यांच्या नाटकाबद्दल भरभरून बोलूनही माझ्या मुलाचा विश्वास बसत नव्हता. पण जेव्हा कालचं नाटक पाहून घरी येताना तो फक्त सुपरहिट गाणी 'ती परी अस्मानीची' आणि 'मला सांगा सुख म्हणजे नक्की काय असतं?' गुणगुणत होता तेव्हा मराठी भाषेची ताकद पाहून मन तृप्त झालं. पुढच्या पिढीला हा अविस्मरणीय अनुभव दिल्याबद्दल शतश: धन्यवाद.

श्रीरंग गोडबोले यांचे मंत्रमुग्ध करणारे शब्द, अशोक पत्की यांचं सुमधुर संगीत आणि आपली वन अँड ओन्ली लाडकी ऑनस्टेज जोडी यांनी माझ्या मुलावरही भुरळ घातली. दर्जेदार आणि चपखल लिखाण करणाऱ्या अद्वैत दादरकर यांचे मनापासून कौतुक करावेसे वाटते. मराठी भाषेत शाब्दिक कोट्या करण्याची जी जादू आहे ती आम्ही रसिकांनी काल पुन्हा अनुभवली त्याबद्दल धन्यवाद.

आम्हाला हा अनुभव दिल्याबद्दल शिकागो मराठी मंडळ आणि नाटकातले सगळे कलाकार यांचे मनःपूर्वक आभार. प्रशांत दामले आणि कविता लाड तुम्ही असेच चिरतरुण राहा हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

गायत्री वर्तक

Sketch by Anjali More



शब्दकोडे- उत्तर

1 अ	प	2 घा	त		3 झा		4 सा	5 व	धा	6 न
नु		ब		7 व	शी	8 ला		ज		य
9 भ	टा	र	खा	ना		10 ज	ना	न	खा	ना
व		ले		11 त	12 ल	त		का		त
	13 खु	ला	14 सा		ड		15 म	टा	16 र	
17 त	प		18 ख	ळ	ख	ळा	ट		19 च	हा
	20 दा	21 द	र		ड		22 का	23 म	ना	
24 लो		र		25 आ	त	26 ला		हि		27 व
28 क	मा	व	ले	ले		29 भा	व	ना	पू	र्ण
स		ळ		30 ख	31 डा	वा		भ		मा
32 भा	ग	ला	स		व		33 बा	र	बा	ला

अन्य

निखळलेले तारे

गेल्या काही महिन्यात आपल्याला सोडून गेलेल्या दिग्गजांना महाराष्ट्र मंडळ शिकागोतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!

लेखिका,
BMM 'वृत्त' च्या माजी संपादिका

सुलोचना लाटकर
प्रसिद्ध मराठी अभिनेत्री

रवींद्र महाजनी
प्रसिद्ध मराठी अभिनेते

सीमा देव
प्रसिद्ध मराठी अभिनेत्री



कार्यक्रम

Maharashtra Mandal Chicago
2023
Fitness Club Presents
Fall 2023 Trekk - 21 Oct 2023
Place - Sag Valley Yellow Trail
Time- 8:30 AM
Trek Distance - 8 miles or 4 miles.
FEES - Not Applicable
T Shirts for CSM 350 Ceremony
This is a free event, however MMC; recommends buying CSM 350 T shirt earnings of which would be used for CSM 350 ceremony
Registration Link
https://forms.gle/DDpR34KxtbRDdQeJ9
***This is a free event , MMC is only going to provide Fruit Bars at the conclusion of the trek.
***This is a trek. so everyone is expected to carry their own food ,water , Caps and sun screen and take care of Mother Nature by keeping the trail clean.
For Queries - Contact Vishal Navalkar/Rahul Visal/Prasad Athanikar.

Maharashtra Mandal Chicago 2023
Picnic at St. James Farm, Warrenville IL
9:30-10:30 breakfast..
10-11 MMC Master Chef Qualification Round
12:30-1:30 Lunch
3:30-4:30 Live Chat snacks
Kho Kho
Lagori
PIC-COLLAGE


MAHARASHTRA MANDAL
CHICAGO
महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२३
अध्यात्मपीठ
गुरुवार २१ सप्टेंबर २०२३
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
प्रमुख उपनिषदे व गीताप्रणीत संदेश
वक्ते: प्राचार्य मुकुंद दातार
व्याख्यान ३
ईशावास्य उपनिषद
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे,
ऊर्मिला दामले, अनिरुद्ध दामले, प्रसाद अथणीकर

MAHARASHTRA MANDAL
CHICAGO
महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२३
अध्यात्मपीठ
गुरुवार २७ जुलै २०२३
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
गुरु चरित्र निरूपण भाग २
॥ श्रीगुरुचरित्र ॥
प्राध्यापक विजया नेमळेकर
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे,
ऊर्मिला दामले, अनिरुद्ध दामले, प्रसाद अथणीकर


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२३
अध्यात्मपीठ, साहित्यकट्टा, आरोग्यधाम, आणि चिरतरुण (Forever Young)
या समूहांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही सहर्ष सादर करत आहोत
सुखी माणसाचा सदरा
मुलाखत आणि संवाद
(रविवार, १६ जुलै, २०२३, सकाळी ९ वाजता - शिकागो स्थानिक वेळेनुसार)
(रविवार, १६ जुलै, २०२३, संध्याकाळी ७.३० वाजता - भारतीय वेळेनुसार)
डॉ. आनंद नाडकर्णी
YouTube - https://www.youtube.com/c/MaharashtraMandalChicago
आयोजक: अध्यात्मपीठ, साहित्यकट्टा, आरोग्यधाम, आणि Forever Young Group प्रशासक

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२३
अध्यात्मपीठ
गुरुवार दिनांक १३ जुलै २०२३
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
ब्रह्मविद्येचा प्रकाश योग
मेधा कावतकर
* शांतिमंत्र
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे,
ऊर्मिला दामले, अनिरुद्ध दामले, प्रसाद अथणीकर,

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२३
साहित्यकट्टा सहर्ष सादर करत आहे
बोलका कट्टा
अमेरिका, कॅनडा आणि महाराष्ट्रातील आघाडीच्या
सशक्त मराठी कवींचे संमेलन
महानंदा मोहिते
शशिकांत तिरोडकर
नितीन देशमुख
डॉ. मीनाक्षी पाटील
समीर जिरांकलगीकर
दीपा मिट्टीमनी
अश्विनी कुंटे
माधव गोगावले
डॉ. महेश केळुसकर
डॉ. सुजाता महाजन
श्रद्धा भट
रवि: ८ ऑक्टो. २०२३, स. ९ वा. (शिकागो वेळेनुसार)
सं. ७.३० वा. (भारतीय वेळेनुसार)
आयोजक
माधव गोगावले, समीर कुलकर्णी, श्रद्धा भट, अश्विनी कुंटे, मिलिंद साळी, प्रसाद अथणीकर
https://www.youtube.com/c/MaharashtraMandalChicago

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२३
'साहित्यकट्टा' चे आयोजक सहर्ष सादर करत आहेत
कथाकथन
मंगळवार ५ सप्टेंबर, २०२३, रात्री ८.०० वाजता
(शिकागो स्थानिक वेळेनुसार)
बुधवार ६ सप्टेंबर, २०२३, सकाळी ६.३० वाजता
(भारतीय वेळेनुसार)
मैत्री बँकिंगशी
वंदना धर्माधिकारी
सौ वंदना विजय धर्माधिकारी
YouTube -
https://www.youtube.com/c/MaharshtraMandalChicago
आयोजक: माधव गोगावले, श्रद्धा भट, अश्विनी कुंटे, समीर कुलकर्णी, मिलिंद साळी, प्रसाद अथणीकर


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२३
'साहित्यकट्टा' चे आयोजक सहर्ष सादर करत आहेत
कथाकथन
मंगळवार १५ ऑगस्ट, २०२३, रात्री ८.०० वाजता
(शिकागो स्थानिक वेळेनुसार)
बुधवार १६ ऑगस्ट, २०२३, सकाळी ६.३० वाजता
(भारतीय वेळेनुसार)
डॉ. निशिकांत श्रोत्री
YouTube -
https://www.youtube.com/c/MaharshtraMandalChicago
आयोजक: माधव गोगावले, श्रद्धा भट, अश्विनी कुंटे, समीर कुलकर्णी, मिलिंद साळी, प्रसाद अथणीकर

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२३
'साहित्यकट्टा' च्या 'बोलका कट्टा' कार्यक्रमांतर्गत आम्ही सहर्ष सादर करत आहोत
मराठी नाटकांतील सौंदर्यस्थळे
मराठी नाटकांच्या सुवर्ण काळातील एक धावती सफर
निखळ मनोरंजनाची
९० मिनिटे
श्री. चंद्रशेखर ठाकूर
जुनी नाटकं, कलावंत, अभिनय, लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, याविषयीच्या रोचक आठवणी आणि त्यावर खुसखुशीत शैलीत विवेचन अगदी संवादासह.
श्री. चंद्रशेखर ठाकूर
सौ. अलका वठारकर
रविवार, २७ ऑगस्ट, २०२३, सकाळी ९ वाजता (शिकागो स्थानिक वेळेनुसार)
रविवार, २७ ऑगस्ट, २०२३, संध्याकाळी ७.३० वाजता (भारतीय वेळेनुसार)
YouTube - https://www.youtube.com/c/MaharshtraMandalChicago
आयोजक: माधव गोगावले, श्रद्धा भट, अश्विनी कुंटे, समीर कुलकर्णी, मिलिंद साळी, प्रसाद अथणीकर

Maharashtra Mandal Chicago 2023
Bhramangatha group presents
"The most magnificent creature in the entire world, the tiger is"-
Jack Hanna. आणि असं हे व्याघ्रदर्शन जर लहान वयातच करायला मिळालं असेल
तर किती भाग्याची गोष्ट आहे.
जयदीप भट
मग चला मंडळी, या २३ मे ला, आपले सदस्य, जयदीप भट, आपल्याला सांगणार
आहेत, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, त्यातील वन्यजीव आणि व्याघ्रदर्शनाचे अनुभव'
भ्रमणगाथा टीम
कविता कुलकर्णी, प्रसाद अथणीकर, वैशाली बेलसरे
आणि रत्नांगी निलेश मालपेकर


Maharashtra Mandal Chicago 2023
Bhramangatha
कुटुंबासोबत, मित्र-मैत्रिणींसोबत तर फिरण्यात मजा आहेच पण स्वतःची
संगत enjoy करायची म्हणजे खूपच वेगळा अनुभव. चला मंडळी,
भ्रमणगाथाच्या जून २७ च्या भागात ऐकू या, आपल्या भाग्यश्री गुप्तेच्या
तब्बल चार 'Solo' ट्रिप्स बद्दल 8pm CST
Bhagyashree Gupte
"Sometimes the best journeys are those that start when we do not
plan, turn out how we do not expect and take us places we do not
know."


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२३
"साहित्य कट्टा" च्या "बोलका कट्टा" कार्यक्रमांतर्गत आम्ही सहर्ष सादर करत आहोत
काव्यधारा
रविवार, २५ जून, २०२३, सकाळी ९ वाजता (शिकागो स्थानिक वेळेनुसार)
(रविवार, २५ जून, २०२३, संध्याकाळी ७.३० वाजता भारतीय वेळेनुसार)
भरत दौंडकर (शिरूर)
लता ऐवळे (सांगली)
नितीन देशमुख (अमरावती)
अरुण पवार (परळी वैजनाथ)
YouTube - https://www.youtube.com/c/MaharshtraMandalChicago
आयोजक: माधव गोगावले, श्रद्धा भट, समीर कुलकर्णी, अश्विनी कुंटे, मिलिंद साळी, प्रसाद अथणीकर

Maharashtra Mandal Chicago 2023
" Bhramangatha "
'गुगलवरून साभार'
चला मंडळी २५ जुलै रोजी सायं. ८ वाजता सफर करू या भारतातील पूर्वेच्या राज्यांची. आसाम, नागालँड आणि मेघालय!
आणि ही सफर घडवणार आहेत, आपल्या सदस्या, सिम्पल पाळेकर.
MMC भ्रमणगाथा टीम
कविता कुलकर्णी, वैशाली बेलसरे, प्रसाद अथणीकर आणि रत्नांगी निलेश मालपेकर

धन्यवाद

पुढच्या वर्षी लवकर या...